# माणूस

१५ जानेवारी ६६

मकर संक्रमण


ईश्वर सारे बरे करील....खुदा हाफीज़, खुदा हाफीज़'



चाळीस पैसे

न खरो न च भूयसा मृदुः पवमानः पृथिवीरुहानिव ।
स पुरस्कृतमध्यमक्रमो नमयामास नृपाननुद्धरन् ।।

कालिदास [ रघुवंश – अष्टमसर्ग – अजवर्णन ]



अती कठोर नाही; फार मृदुही नाही. जसा सोसाटयाचा वारा वृक्षांना गदगदा हलवितो, पण उन्मळून टाकीत नाही, तसा तो 'मध्यमक्रमी' राजा (अज) आपल्या शत्रूंना नमवीत असे; पण त्यांना सिंहासनावरून खाली खेचीत नसे




वर्ष पाचवे : अंक सोळावा : १५ जानेवारी १९६६
किंमत चाळीस पैसे : वार्षिक वर्गणी दहा रुपये
संपादक : श्री. ग. माजगावकर
पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. : दूरध्वनी : ५७३५९.

## नेहरू, शास्त्री आणि नंतर....

या दोघांनी मध्यममार्गाने राजकारणाचा रथ वाहून नेला.

हा मार्ग अनुसरणारा, कुठल्याही गटाचे वा वादाचे जोखड अडकवून न घेणारा, अलिप्त व अनाग्रही वृत्तीचा व कुणाच्याही आहारी न जाणारा नेता पुढे येणे ही एक अवघड गोष्ट आहे. कारण तशा व्यक्ती केंद्रस्थानी आज फारच थोड्या आहेत. त्यातच हे नेतृत्वाच्या निवडीचे कार्य सुरू असताना अमेरिकन उपाध्यक्ष श्री. हंफ्रे व रशियन पंतप्रधान श्री. कोसिजिन यांचेही मुक्काम दिल्लीत वाढल्याचे वृत्त आहे. या सर्व ओढाताणीच्या शर्यतीवाबत अनेक अंदाज आज बांधले जात आहेत, अनेक भविष्ये वर्तविली जात आहेत. पण मोरारजी आणि मेनन ही शास्त्रीयुगात अस्तंगत झालेली दोन राजकारणी टोके पुन्हा वर येण्याची शक्यता अगदीच डावलून चालणार नाही. एक तर मध्यममार्गी नवा नेता हवा; नाहीतर दोन टोकांच्या परस्परविरोधी ताणातून मध्यमक्रम निर्माण होईल. कारण त्याशिवाय लोकशाही नाही, स्थिरता नाही. —सं.

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबावतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यांतील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## सुवर्णमध्य ....



## निरोप ....

नेहरू गेले तेव्हा एखादा देवदूत आपल्यातून निघून जावा तसे झाले; शास्त्रीजी गेले आणि घरातलाच एक वडीलधारा माणूस अचानक गेल्याचे तीव्र दुःख सर्वांना जाणवले.

'माणूस' तर प्रथमपासूनच एक 'अस्सल' माणूस म्हणून शास्त्रीजींकडे पाहात होता हे वाचकांना आठवत असेलच. भारताच्या चालू परिस्थितीत, गटबाजी आणि पक्षोपपक्ष यांच्या रस्सीखेचीत सर्वांना योग्य ते स्थान देऊन, कोणाच्याही आहारी न जाता मध्यममार्गाने भारतीय राजकारणाचा रथ ओढून नेण्यास सर्वतोपरी योग्य असा नेता शास्त्रीजींच्या रूपाने भारताला लाभला अशीच 'माणूस'ची धारणा होती. १ सप्टेंबर १९६४ च्या 'माणूस' पाक्षिकाच्या पहिल्याच अंकात शास्त्रीजींना अभिवादन करताना 'माणूस'ने लिहिले होते:

"शास्त्री समन्वयी आहेत. डावेही नाहीत; उजवेही नाहीत. मधला व्यवहारी सुवर्णमार्ग ते पत्करतात. पण मधला म्हणजे दुबळा, अनिश्चित, कोणताच निर्णय ठामपणे न घेण्याचा अप्रतिकारी मार्ग नव्हे. हा मार्ग आचरण्यास सर्वात अवघड. उजवी-डावीकडचे ताण सतत सहन करून, मधल्या वाटेवरून ठामपणे प्रगतीची वाटचाल चालू ठेवण्यास निग्रहाचे बळ विशेष अवश्य. शास्त्रीजींजवळ ही निग्रहशक्ती भरपूर असावी. पंजाबातील कैराँ टोळीचा बंदोबस्त हे अधिकारग्रहणानंतरचे पहिलेच उदाहरण. आणि देशातील काळा पैसा बाहेर काढण्यासाठी बड्या बड्या धेंडांच्या तिजोऱ्यांवर छापे घालण्याची उघडलेली नवी मोहीम हे ताजे उदाहरण"

हे अभिवादन आहे शास्त्रीजी पंतप्रधान होऊन तीन महिनेही पूर्ण उलटले नव्हते, त्यांचे नेतृत्व नवीन व अस्थिर होते त्या सुमाराचे-पंधरा महिन्यांपूर्वीचे. त्यानंतर तर त्यांची कसोटी पाहणारे एकाहून एक कठिण प्रसंग त्यांच्यावर गुदरले आणि



शास्त्रीजींनी या सर्वांना तोंड दिले, त्यातून आपल्या समन्वयशक्तीने मार्ग काढला. पहिलाच पाठीमागचा वार भाषिक प्रश्नावर अन्नमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् यांनी गेल्याच फेब्रुवारी महिन्यात केला होता. पण नाक मुठीत धरून या गृहस्थांना मंत्रिमंडळात पुन्हा यावे लागले. कॉंग्रेसच्या बंगलोर अधिवेशनात त्यांनी अंतस्थ विरोधकांचा पूर्ण पाडाव करून कॉंग्रेस संघटनेवरील आपली पकड चांगलीच मजबूत करून ठेवली. सामोपचारी वृत्ती ठेवूनही किती तडकाफडकी निर्णय घेण्याची शक्ती त्यांचेपाशी होती हे अखेरीस घडलेल्या कृष्णम्माचारी प्रकरणानेही सर्वांच्या चांगलेच प्रत्ययास आले. गेल्या सप्टेंबर महिन्यातील भारत-पाक संघर्ष हा तर त्यांच्या अठरा महिन्यांच्या कारकीर्दीतील सुवर्णक्षणच ठरला. तोपर्यंत केवळ ' धीरपुरुष ' म्हणून ओळखले जाणारे शास्त्रीजी त्या क्षणापासून ' वीरपुरुष 'ही ठरले आणि वीराला प्राप्त होणारे सर्व मानसन्मान देशानेही त्यांना स्वयंस्फूर्तीने बहाल केले. कुठलेही झगमगाटी गुण जन्मतःच परमेश्वराने दिलेले नसताना चारित्र्य आणि लोककल्याणाची तळमळ या श्रेष्ठ नैतिक गुणांच्या बळावर सर्वसाधारण परिस्थितीतील माणूसही केवढ्या उच्च पदवीला जाऊ शकतो त्याचे शास्त्रीजी हे मूर्तिमंत प्रतीक होते. या नैतिक बळामुळेच ते जनसामान्यांना चटकन् 'आपले' वाटले,'घरगुती' वाटले, त्यांच्या निधनाने घरातलाच माणूस जावा अशा दुःखाने भारतीय जनता व्याकुळ झाली.

## ताश्कंद

ताश्कंद ही या ' थोर माणसा 'ची अखेरची आठवण. ताश्कंदला शास्त्रीजी निघण्यापूर्वी ' माणूस 'ने गेल्या १ जानेवारी अंकात असे लिहिले होते–

" रशियाचा पुढाकार आणि अमेरिकेचा पाठिंबा ही वैशिष्टयपूर्ण पार्श्वभूमी असल्याने ताश्कंद बैठकीत काश्मीर प्रश्नाचा विचार मुख्यतः चीनच्या संदर्भातच होण्याची शक्यता अधिक आहे...... अमेरिकेप्रमाणेच रशियालाही चीनच्या वाढत्या


धोक्यापासून भय आहे, त्या दृष्टीने चीनविरुद्ध लष्करी व राजनैतिक फळी उभी करण्याची तीव्र गरज आहे. चीनविरुद्धच्या या व्यापक जागतिक हालचालीत काश्मीरचे स्थान मध्यवर्तीच आहे. या मध्यवर्ती प्रश्नाबाबत भारत–पाक सलोखा घडवून आणून चीनला शह देणे, पाकिस्तानला पुन्हा आपल्या गोटात खेचून चीनला एकाकी करणे असा रशिया–अमेरिका यांचा ताश्कंद बैठकीमागील संयुक्त उद्देश असणे स्वाभाविक आहे......"

हा उद्देश कितपत साध्य होणार, पाकिस्तानची वर्तणूक किती बदलणार हे काळ ठरवीलच. आपण आशावादी राहू या. पण शास्त्रीजींनी देशाचे अंतिम हित डोळ्या-आड न होऊ देता आपल्या सदसद्विवेकबुद्धीला स्मरून ताश्कंदला सलोख्याचा प्रयत्न केला, असणार, रशिया–अमेरिकेच्या संयुक्त दडपणांना तोंड दिले असणार यात शंका घेण्याचे कारण नाही. कारण त्यांचा पिंड हा अस्सल देशभक्ताचाच पिंड होता. 'ईश्वर सारे बरे करील; खुदा हाफिज, खुदा हाफिज' हे या जुन्या धार्मिक संस्कारात वाढलेल्या देशभक्त मुत्सद्याने पाक अध्यक्षांशी बोलताना उच्चारलेले अखेरचे शब्द होते. आपणही याच भावनेने व याच शब्दात या धर्मप्रवण देश-भक्ताचा शेवटचा निरोप घेऊ.

**श्री. ग. मा.**

---

## त्रैराशिक सोडवा......





हैद्राबाद येथील ४६ वे

# मराठी साहित्य संमेलन

वि. शं. पारगांवकर

गाडी नामपल्ली स्टेशनवर थांबली, आणि खाली उतरणाऱ्या उतारूंच्या गर्दीचा एकच डोंब उसळला. पहाटेचे सव्वासहा वाजले होते. उतारूंच्या आवाजाने स्टेशनचे परिसर भारून गेले होते. हजारो शब्द दुसऱ्या हजारो शब्दांत मिसळून गेले होते. शब्दांच्या अर्थाने फक्त ध्वनीचे रूप घेतले होते. सारा गोंगाटच गोंगाट होता. इतक्यात गोंगाटाला भेदून काही शब्द कानांशी येऊन भिडले आणि त्यांचा अर्थ मनात उलगडला. आमचे मन कृतज्ञतेने भरून आले. ते शब्द होते. "४६ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आलेल्या प्रतिनिधींचे आम्ही स्वागत

करतो. " स्टेशनवरील लाऊड स्पीकरमधून ते शब्द बाहेर पडत होते. एरवी तेलगू, हिंदी आणि इंग्रजी भाषांतून येणाऱ्या आणि जाणाऱ्या गाड्यांची माहिती देणाऱ्या हैद्राबाद स्टेशनवरील लाऊड स्पीकर्समधून आज मराठी वाणी बाहेर पडत होती. आणि वाटत होते, आपण पुन्हा पुण्याच्या स्टेशनवरच तर उतरलो नाही ना ? त्या पुन: पुन्हा प्रक्षेपित होणाऱ्या एकाच वाक्याने मराठी मने जिंकली होती.

हैद्राबाद येथे उगवणाऱ्या २५ डिसेंबरच्या सकाळने मराठी प्रतिनिधींच्या मनांतील परकेपणाची भावना पुसून टाकली, आणि काही वर्षांपूर्वी निजामाची आणि आज आंध्र सरकारची राजधानी असलेले हैद्राबाद हे शहर पुणे, मुंबई, सोलापूर आणि नागपूरच्या लोकांना आपलं वाटू लागलं.

रस्त्यावरून चालताना शाही रस्त्यांचा डौल नजरेत भरत होता. ते सीमेंटचे रुंद, भव्य रस्ते, दुतर्फा असलेली मोठमोठी दुकाने, आकाशाला चिकटवलेल्याप्रमाणे भासणाऱ्या निऑन साईन्सच्या जाहिरातींचे फलक, हिरव्या रंगाच्या दुमजली बसेस या साऱ्यांचे वेगळेपण नजरेत भरल्याशिवाय राहात नव्हते. रस्त्यांतून फक्त एकच गोष्ट मनाला खुपत होती, ती म्हणजे दोन–दोन सवाऱ्या जिवाच्या कराराने खेचीत नेणाऱ्या सायकल रिक्शांकडे पाहून. ही गरीब माणसे पोटासाठी दिवसभर अक्षरश: आतडी पिळवटून काम करीत होती. त्यांच्या नशिबाने रस्ते अतिशय सुंदर होते, हेच त्यांतल्या त्यात एक समाधान.

२५ तारखेला दुपारीच साहित्य संमेलनाला सुरुवात होणार होती. संरक्षणमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणाने ती सुरुवात होणार होती. संरक्षणमंत्र्यांच्या सोयीप्रमाणे ही वेळ पूर्वी ठरल्यापेक्षा अगोदर घेतली होती, ही गोष्ट आमच्या मनाला रुचली नाही. व्यक्ती कितीही मोठी असली, तरी ती संस्थेपेक्षा कशी मोठी होऊ शकते याची जाणीव निदान आपल्यासारख्या महान (!) लोकशाही देशात तर असायलाच हवी.

## साहित्यिक–मानवी मनाचे संशोधक !

यशवंतरावजींची भाषणे मी पूर्वी ऐकली आहेत. थोडक्यात पण अतिशय मार्मिक बोलण्याची त्यांची कला अभिनव आहे. या दृष्टीने निदान त्यांचे भाषण उत्तम होईल म्हणून मनात उत्सुकता होती पण तिथेही संरक्षणमंत्र्यांनी आमची निराशा केली.

साहित्यिकांच्या मनाला दिलासा देईल, निदान त्यांना शासकीय पातळ्यांवरील जबाबदाऱ्यांचे सम्यक् दर्शन घडवील अशा भाषणाची अपेक्षा राजकारणी व्यक्तींपासून समाज करीत असतो. लेखकही समाजाचा एक जबाबदार घटक असल्यामुळे त्याच्या अपेक्षादेखील फारशा निराळ्या असण्याचे कारण नाही.

ना. चव्हाणांच्या भाषणाचा मतितार्थ असा की, गेल्या काही महिन्यांत सीमेवर

घडलेल्या सशस्त्र इतिहासाने भारतीय जनतेत भावनिक एकतेची जी जाणीव निर्माण झाली, तिची जोपासना करून तिचे संवर्धन करण्याचे कार्य लेखकांनी करायला हवे असे ते म्हणाले. याशिवाय, ते असेही म्हणाले की, राजकारण व साहित्य हे एकमेकांना पोषक व मार्गदर्शकच असायला हवे. आजच्या काळात या दोन्ही बाबी एकमेकींपासून अलग करताच येणार नाहीत. साहित्याने आणीबाणीच्या काळात समाजाला स्फूर्ती, चैतन्य व सामर्थ्य द्यावयाला हवे. साहित्यिकाने इतिहासावर टाकलेली ही जबाबदारीच आहे वगैरे.

साहित्यिकांच्या जबाबदाऱ्यांविषयी व्यासपीठांवरून आणि दैनिका-मासिकांतून निरनिराळ्या व्यक्तींकडून निरनिराळे आदेश आजवर दिले गेले आहेत. असे आदेश देत असताना साहित्याच्या स्वभावाकडे आणि साहित्यिकांच्या स्वत्वाकडे डोळसपणे पाहिले गेले असल्याचे दर्शन आजवर क्वचित्‌च घडले आहे. वास्तविक पाहता भाषिक ऐक्य, भावनात्मक एकता वगैरे वगैरेंच्या ज्या नवीन समस्या राजकारणी लोकांनीच निर्माण केल्या आहेत, त्यांकडे समस्या म्हणून साहित्यिक पाहूच शकत नाही. जगातला जिवंत माणूस आणि त्याचं मन ह्याच एकमेव विषयात साहित्यिकाला रस असतो. मग तो निग्रो असो, युरोपियन असो, रशियन असो किंवा अगदी पाकिस्तानी असो, तो मित्र असो किंवा शत्रू असो साहित्यिकाला त्याच्यातील चैतन्याचे आवाहन असते. साहित्यिकाचं मन हे राजकारणी लोकांचं, समाज सुधारकांचं किंवा शिक्षण शास्त्रज्ञांचं मन असत नाही तर ते त्याचं स्पष्टीकरण करायचंच झालं तर संशोधकाच्या मनाशीच त्याचं साम्य असतं. संशोधकाची जी प्रतिज्ञा असायला हवी तीच प्रतिज्ञा साहित्यिकाची असते आणि संशोधकांना जसे जाती, भाषा, देश यांच्या सीमांचे बंधन असू शकत नाही, तसेच, साहित्यिकांचे असते. तेव्हा जसे एखाद्या संशोधकाला, "तुम्ही राष्ट्राची अस्मिता जागृत करण्याचं काय केलं पाहिजे. तुम्ही राष्ट्रात भावनात्मक ऐक्य निर्माण होईल अशा रीतीचं कार्य आपल्या संशोधनाद्वारे केलं पाहिजे." असं सांगणं जितकं अप्रस्तुत आहे, तेवढंच ते साहित्यिकाला सांगणंदेखील आहे, याची जाणीव निदान समाजातील जबाबदार व्यक्तींना होणे आवश्यक वाटते.

आता हेच पाहा : भाषावार प्रांतरचनेचं तसंच संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच उद्दिष्ट हे राजकारणी लोकांचं होतं. आणि साहित्यिकाचा बेगडी मुलामा लावलेल्या प्रतिभाशून्य साहित्यिकांनी आपल्या स्वत्वाची प्रतारणा करून मागील काही साहित्य संमेलनांच्या व्यासपीठावरून आणि अध्यक्षपदावरूनदेखील या भाषावार प्रांतरचनेचं स्तोम माजविलेलं होतं. काही लब्धप्रतिष्ठित जुन्या प्रवृत्तीच्या साहित्यिकांनी तर "आमच्या बुलंद आवाजामुळेच संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाले ! " अशा गर्वोक्तीच्या डरकाळ्या फोडलेल्या आहेत. परंतु, मला त्यांना असं विचारायचं आहे की, हे भाषावार प्रांतरचनेचं त्यांचं स्तोम दुर्दैवानं शंभर

टक्के यशस्वी झालं असतं तर आज हैद्राबादसारख्या शहरात मराठी साहित्य संमेलन भरू तरी शकलं असतं काय ? पुणे, मुंबई, नागपूर, कोल्हापूर वगैरे ठिकाणीच त्याला तेच ते चेहरे आणि त्याच त्या पेशवाईच्या आणि भोसलेकालीन वास्तू पाहात राहावं लागलं असतं. मग हैद्राबाद येथे आपण पाहिलेलं सर सालार-जंग नावाच्या एका व्यक्तीने जमविलेल्या जगातील निरनिराळ्या भागांतील सुंदर आणि मौल्यवान वस्तूंचे प्रदर्शन आपण या निमित्ताने पाहू शकलो असतो काय ? तसेच, चारमिनारसारखी यवन संस्कृतीची छाप असलेली भव्य वास्तू, पत्थर गट्टी-सारखी निराळ्या संस्कृतीचे दर्शन घडविणारी वस्ती, किंग कोठी, सुलतान बाजार, ॲबिड रोड, हुसेन सागर, एक ना दोन, किती तरी निराळ्या, अनुपम सौंदर्याने नटलेली ठिकाणे साहित्यिकांना पाहायला मिळाली असतील आणि ती पाहात असताना एका नव्या चैतन्याचा साक्षात्कार त्याला झाला असेल, त्या चैतन्यापाठी-मागचे मानवी मन हुडकून, उलगडून पाहण्याची इच्छा त्याला झाली असेल, त्याची सर तुलनाबाह्य आहे.

## वा. लं. चे भाषण... विवाद्य मुद्दे

प्रा. वा. ल. कुलकर्णी यांचे अध्यक्षीय भाषण मात्र खूपच चांगले झाले. प्रा. वा. ल. कुलकर्णी हे आजच्या तरुण पिढीच्या साहित्यविषयक आशाआकांक्षांचे प्रतिक बनलेले आहेत. या वर्षीच्या अध्यक्षीय निवडणुकीच्या निमित्ताने संमेलनाला एक जबाबदार व्यक्ती मिळाली याचे समाधान सर्वांनाच वाटत होते. वा. ल. कुलकर्णी यांचा साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनच मुळी रसिक आणि प्रतिभावंत वाचकाचा आहे. त्यांची टीकानिर्मिती हीदेखील एक कलाकृतीच असते. कोणत्याही कला-कृतीशी प्रथम एकरूप होणे, तिच्यातील कलात्मक सौंदर्यात, जीवनानुभूतींच्या साक्षात्कारात, निवेदनाच्या अभिनवतेत स्वतः न्हाऊन निघून त्या कलाकृतीची अभिजात प्रतिज्ञा समीक्षकाच्या भूमिकेवरून इतरांपर्यंत पोचविणे हे कार्य ते अत्यंत निष्ठेने आणि तितकेच स्वतःवर पडलेल्या जबाबदारीचा क्षणभरही विसर न पडू देता आणि कलाकृतींवर यत्किंचितही अन्याय न होऊ देता करीत आलेले आहेत. टीकाकाराची भूमिका ही किती अवघड असते, जोखमीची असते आणि धाडसाची असते हे निराळे सांगण्याची गरज नाही. लेखक आणि टीकाकार यांच्यांतील हाड-वैर सुप्रसिद्ध आहे. परंतु वा. ल. कुलकर्णी यांनी ही वैरभावना सहजपणे जिंकलेली आहे इतकेच नव्हे तर मराठी लेखकांची एक पिढीच्या पिढी वा. लं. ची मित्र बनलेली आहे याचा साक्षात्कार हैद्राबाद येथील संमेलनाच्या वेळी प्रत्यक्ष पाहाव-याला मिळाला.

त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून लेखकांना आणि रसिक वाचकांना जे मार्गदर्शन केले ते फार मौलिक आहे. त्या भाषणातील सर्वच मुद्दे अविवाद्य होते असे नाही. काही विवाद्य मुद्दे आताही मला स्मरतात. परंतु वा. ल. हे प्रयोगवादी

परिवर्तनशील टीकाकार असल्यामुळे त्यांच्या तोंडून अथवा लेखणीतून जन्मलेले वाक्य हे ब्रह्मवाक्य आहे एवढी इतर टीकाकारांप्रमाणे अट्टाहासाची भूमिका त्यांची नसल्यामुळे प्रत्यक्ष चर्चेतून त्यांची त्या त्या मुद्यांवरील मते अधिक विस्ताराने समजावून घेता येतील.

कवितेच्या दुर्बोधतेविषयी बोलताना, स्वत: कवींनीच आपल्या आशयाचा अथवा आपण करीत असलेल्या अभिव्यक्तिपाठीमागच्या घडपडीचा अर्थ सांगावा, असे प्रा. कुलकर्णी म्हणतात. आजची कविता अतिशय खासगी रूप घेऊन अवतरत आहे आणि अनेक कारणांमुळे तिच्यातील सौंदर्य आणि अनुभूती अगम्य होत आहे ही वा. लं. ची भूमिका मान्य करूनही, स्वत: कवींनीच तिचे स्पष्टीकरण करावे ही त्यांची इच्छा व्यवहार्य नाही असे वाटते. हयात असणाऱ्या कवींच्या बाबतीत कदाचित् हे शक्य होईलही; परंतु सर्वांनाच सर्व काळी या रसास्वादाच्या कुबड्या बाळगणे कसे शक्य आहे ?

तसेच, इतर कथा, कादंबरी वगैरेंच्या बाबतीत ते असे म्हणतात की, " आजचे सर्वच मराठी ललितलेखन एका महत्त्वाकांक्षेने झपाटलेले आहे. ही महत्त्वाकांक्षा म्हणजे अधिकाधिक तरतरीत होण्याची, तरतरीत दिसण्याची. ह्या सर्वच लेखनांत एक कौतुकास्पद हुशारी मला दिसत आहे...खऱ्याखुऱ्या आत्मविस्मृतीचा मला तरी या लेखनांत आज अभाव दिसत आहे. "

मला वाटते ज्या तरतरीतपणाला वा. ल. दोष म्हणून उल्लेखितात, तो तरतरीतपणा आजच्या कलानिर्मितीच्या प्रक्रियेतील एक अविभाज्य घटकच आहे. धोतर नेसून टेनिस खेळणे आणि टेनिसचा खास पोषाख घालून टेनिस खेळणे यांतला जो फरक तोच आजच्या कलेचा आत्मा आणि आविष्कार यांच्यामध्ये आहे, असे मला वाटते.

परंतु, हे काही मुद्दे सोडले तरी वा. लं. चे भाषण अप्रतिम झाले यात शंकाच नाही. विवेकवर्धिनीच्या आकारात आकर्षक शामियाने ठोकून यजमानांनी संमेलनासाठी अत्यंत सुंदर जागा तयार केली होती. कमीत कमी दहा हजार लोक बसू शकतील एवढी सोय तेथे होती. जवळच कॉलेजच्या इमारतीत प्रतिनिधींची राहण्याची व्यवस्था केलेली होती. हैद्राबादी जनतेने प्रचंड बहुसंख्येने संमेलनाला हजर राहून ते यशस्वी केले. या संमेलनाला एकच गालबोट लागले, ते म्हणजे आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या तथाकथित विनोदी (!) भाषणाचे. हल्ली आचार्य भाषणाऐवजी व्यासपीठावरून पाचपन्नास वेंगरूळ गोष्टी ठोकून देतात आणि विनोदाऐवजी इनोद करतात. शिवाय, त्यांचे दुसरे वैशिष्टच असे की, हल्ली आचार्य हे चालते बोलते आचार्य राहिलेले नसून त्यांच्याच कुठल्या तरी एका शेवटच्या भाषणाची, सतत लावून लावून झिजलेली रेकॉर्डच होऊन बसलेले आहेत. त्यांच्या विनोदाच्या नावाखाली होणाऱ्या शिवराळ आणि अश्लील कोटयांनी हैद्राबाद येथील

सभ्य लोक हैराण झाल्याचे दिसले. तेथील एका धीट महिलेने तर, " अत्रे ! आपले भाषण ऐकत असताना आम्हांला लाज वाटत आहे ! " असे ओरडून सांगितले. तसेच, ' पदनाम कोश ' आणि ' बदनाम कोश ' या नेहमीच्याच भंकस कोटीने त्यांनी पदनाम कोशावर हल्ला चढविला तेव्हादेखील आचार्यांना तेथे जोराचा विरोध झाला. परंतु आचार्यांचे हे विनोदी दुखणे इतके विकोपाला गेलेले आहे की, त्यावर आता दुसरातिसरा काहीही उपाय नाही, असेच म्हणावे लागेल.

हैद्राबाद येथील संमेलनातील एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे ' १९४७ नंतरची कथा ' हा परिसंवाद होय. या पाच भाषांतील कथावाङमयाचा आढावा घेणारे त्या त्या भाषेतील कथावाङमयाच्या अभ्यासकांनी १९४७ नंतरच्या कथेच्या विकासाचा आढावा घेतला. मराठी कथेवर श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांचे इंग्रजीतून भाषण झाले. ही चर्चाही चांगली झाली.

हैद्राबाद शहराचे दर्शन घेत घेत तीन दिवस चाललेला सोहळा २७ तारखेस संध्याकाळी संपला. या निमित्ताने हैद्राबादला आलेल्या लोकांना या संमेलनाचा जसा विसर पडणार नाही, तसाच या सुंदर नगरीचाही पडणार नाही असा विश्वास वाटतो. ☐

☐

# साहित्य संमेलनातील भाषणे

## एक प्रतिक्रिया

### प्रा. आनंद यादव

साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्री. वा. ल. कुलकर्णी आहेत ही बातमी समजल्यावर संमेलनाविषयी मनात उत्सुकता निर्माण झाली. पूर्वी आलेला अनुभव मनावरून पुसून टाकून संमेलनाला पुन्हा जायचे असा निश्चय केला आणि त्याच उत्साहाने हैद्राबादेत जाऊन पोचलो.

पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमासाठी प्रचंड जनसमुदाय प्रचंड मंडपात बसला होता. साहित्याविषयीचे लोकांचे प्रेम पाहून उत्साह अधिकच वाढला.

अगोदर स्वागताध्यक्ष आणि आंध्रचे मुख्यमंत्री यांची भाषणे झाली. त्यानंतर उद्घाटनाचे भाषण करण्यासाठी भारताचे संरक्षणमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण उभे राहिले. भाषण अत्यंत चांगले आणि आटोपशीर झाले. पण तीन भाषणांत बराच वेळ

निघून गेला. या तीनही भाषणांच्या वेळी सभामंडपात आणि स्टेजवर अत्यंत शांतता होती. स्टेजवरील प्रत्येक (साहित्यिक, विद्वान, पुढारी) व्यक्ती कानांचा प्राण करून, अंग अवघडले तरी तसेच ठेवून भाषण ऐकत होती.

आणि मुख्य कार्यक्रम झाल्यावर समारोपासाठी एखादा वक्ता उभा राहतो तसे श्री. वा. ल. कुलकर्णी उभे राहिले. वास्तविक, ते साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांचे भाषण होते. त्याच्यासाठी खास वेळ ठेवणे आवश्यक होते; पण आरंभीच्या भाषणात बराच वेळ गेल्यामुळे श्रोत्यांच्या मनाची अशी अवस्था झाली होती की, आता हे 'शेवटचे' भाषण आहे. एवढे झाले की झालेच, असे समजून श्रोते आपापल्या ग्रुपमध्ये सभामंडपातच गप्पागोष्टी करू लागले. स्टेजवर कोण कुठे बसले आहेत याची माहिती परस्परांस करून देऊ लागले. चर्चा सुरू झाल्या. मोठ्याने हसणे होऊ लागले. स्टेजवरही असेच. यशवंतरावांशी गप्पा, चर्चा, ओळखी, त्यांच्या स्वाक्षऱ्या, बाहेर जाऊन अंग मोकळे करून येणे आदी 'स्वतंत्र कार्यक्रम' होऊ लागले.

या गोंधळात 'वा. लं.' चे भाषण सुरू झाले. सभामंडपातील गडबड-गप्पांत एकही शब्द व्यवस्थित ऐकू येईना. नंतर तर लोक सरळ उठून बाहेर जाऊन गप्पा-गोष्टी, चहापान, धूम्रपान, ओळखी-हस्तांदोलन करू लागले...'वा. ल.' अक्षरशः भाषण पुढे रेटू लागले. मला तरी क्षणभर वाटले की, वा. लं. नी ते भाषण लिहून आणले होते म्हणूनच शेवटपर्यंत (तेव्हा काही उतारे गाळून) त्यांना वाचणे शक्य झाले. तोंडी भाषण त्यांना त्या गोंधळात करावे असे वाटले असते किंवा नाही, याची दाट शंका येते. शेवटी हा 'प्रचंड' जनसमुदाय साहित्यिकाच्या नशिबातला नव्हताच याची जाणीव झाली. वास्तविक भाषणातील विचार साहित्य-दृष्ट्या अत्यंत मोलाचे आणि महत्त्वाचे होते. पण याची जाणीव त्या वेळी किती जणांना झाली ?

दुसरे दिवशी सकाळी 'आजची कविता : अपेक्षा आणि अडचणी' या विषयावर चार–पाच (टीकाकार व कवी) वक्त्यांचा परिसंवाद होता. या परिसंवादाला कोणी हजर राहतील किंवा नाही, या शंकेमुळे पु. ल. देशपांडे यांचे भाषण आरंभी ठेवले. "डोंबाऱ्याच्या खेळातील ढोलके बडवून लोक जमवण्याचे काम मी करीत आहे," अशी स्पष्ट कबुली पु. लं. नी त्याच भाषणात दिली. परिसंवादाशी या भाषणाचा काहीही संबंध नव्हता म्हणूनच या परिसंवादाच्या वेळीही पूर्वीप्रमाणेच अनुभव आला. पु. लं. चे भाषण संपल्यावर 'प्रचंड' जनसमुदाय सभामंडपातून गप्पागोष्टी करू लागला. आत–बाहेर जाऊ–येऊ लागला. आणि पूर्वीच्याच गोंधळात परिसंवाद चालू झाला.

प्रचंड जनसमुदायाला जमवणाऱ्या प्र. के. अत्रे यांचे भाषण दुसऱ्या दिवशी ठेवले होते. त्या भाषणाचे प्रयोजन मला अजूनही समजले नाही. अत्रे आपल्या नेहमीच्या प्रथेला धरून 'बोलत' चालले होते आणि लोकही हसत वाहात चालले होते.

त्याच दिवशी संध्याकाळी मांडलेल्या ठरावांवर तर काही विद्वान वक्त्यांनी इतकी भाषणबाजी करून घेतली की, त्या गडबडीत मुख्य विषय कोणता हे शोधून काढावे लागले. ' मराठी भाषा लवकरात लवकर शासन-व्यवहारात यावी ' अशा आशयाचा ठराव. आणि राजकारण, पदनामकोश, भाषेचे संकेत आणि रूढी, चालू सरकारची अकार्यक्षमता यांवर भाषणबाजी चालली होती. ' मराठी भाषा मुंबई रेडिओ केंद्रावर पूर्ण वेळ यावी ' अशा आशयाचा ठराव आणि ते रेडिओकेंद्रच लोकांच्या ताब्यात द्यावे म्हणून भाषण. या भाषणात वेळ खुशाल निघून चालला होता. सभामंडपात श्रोत्यांच्याऐवजी ' बालके ' बसली आहेत, असे समजून त्यांच्या सहनशीलतेवर सूड घेतला जात होता. (बिचारे लोकही ऐकत होते.) या भाषणांनी इतका वेळ खाल्ला की, आजपर्यंत संमेलनांतून अवश्य होणारा (कसा का असेना पण ) कवि संमेलनाचा कार्यक्रम रद्द करावा लागला.

अध्यक्षीय समारोपाचे उत्कृष्ट भाषण झाल्यावर तर मंडपात बसलेल्या श्रोत्यांना पकडून शेवटी दोन वक्त्यांनी आभाराची (का कसली तरी) भाषणे ठोकली. ही भाषणे दोन-तीन तास चालली. त्यांचे प्रयोजन काही कळत नव्हते. (त्यांतील एक तर ' कीर्तन ' ह्या प्रकाराला फारच जवळचे होते.)

**फर्स्टक्लासच्या भाड्याची सोय -**

अशा भाषणबाजीमुळे आणि नियोजनामुळे साहित्य-संमेलनाच्या मंडपाला ' लग्नमंडपाचे ' स्वरूप आले. वास्तविक, साहित्यसंमेलनांत राजकीय पुढाऱ्यांची भाषणे ठेवावयाची असतील तर ती स्वतंत्ररीत्या ठेवावीत. त्यांच्यासाठी प्रचंड जनसमुदाय जमेलही पण त्या ' प्रचंड जनमुदायासमोर ' ' साहित्यविषयाची ' भाषणे ठेवून त्या भाषणाला हास्यास्पद स्वरूप देऊ नये आणि साहित्य विषयावर बोलणाऱ्या वक्त्यांची केविलवाणी अवस्था करू नये. विनोद ऐकायला येऊन करमणूक करून घेणारे श्रोते आणि कवितेसारख्या विषयावरील विचार ऐकायला उत्सुक असणारे श्रोते यांच्यांतला फरक निदान साहित्यसंमेलनाच्या मंडपात तरी केला जावा. तसेच, साहित्यसंमेलनाच्या साहित्यविषयावरची भाषणे आणि चौकाचौकातून किंवा शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्यासमोर होणारी भाषणे यांत फरक असतो. ह्या गोष्टीची जाणीव संमेलनांत बोलणाऱ्या प्रत्येक वक्त्याने ठेवावी आणि आपली भाषणे मुद्देसूद, विषयाला धरून, जमल्यास लिहून आणून करावीत. (कवितेसंबंधीच्या परिसंवादातील एक वक्ता तर परिसंवादापूर्वी गंमतीने मला असे म्हणाला की, " असल्या परिसंवादात बोलण्यास होकार द्यायचा म्हणजे फर्स्ट क्लासच्या भाड्याची सोय करून घ्यायची. " आणि त्या वक्त्याचे भाषण स्वतंत्ररीत्या कितीही मौलिक विचार सांगणारे असले, तरी परिसंवादाच्या विषयाशी त्या भाषणाचा फारच थोडा संबंध होता ही गोष्ट इथे नमूद करावी असे वाटते.

अशा प्रकारच्या भाषणांमुळेच की काय, जमलेले लोक गप्पा-गोष्टींत रंगत

असावेत, जागेवरून उठून जाऊन बाहेर चहापान करीत असावेत असे वाटते अनेक क्षेत्रातील विषयांवरील भाषणे एकाच वेळी ठेवली गेल्याने अनेक प्रकारचे श्रोतेही येतात आणि त्यांच्या विषयांची भाषणे संपली की, सभामंडपात गोंधळ उडतो. हा गोंधळ' नियोजनपद्धतीमुळेच होतो. कित्येक वेळा हुशार नियोजक आकर्षक विषय आरंभी ठेवून श्रोत्यांच्या झुंडीच्या झुंडी बोलावतात आणि मग मूळ विषयाला सुरुवात करतात; तसा प्रकार प्रस्तुतच्या संमेलनात बहुधा झाला असावा. अशा प्रकाराला कंटाळून मग काही निष्ठावान साहित्यिक संमेलनाला येतच नाहीत. काहीजण येऊन 'शहरची हवा' चाखायला निघून जातात. तर काही घडपड्या रसिकांची त्या प्रचंड जनसागराच्या लाटांवर एकलकोंड्या वाहात चाललेल्या नारळासारखी अवस्था होते. ते बिचारे वाट चुकून आडरानात आल्यासारखे चेहरे करून हिंडत, ऐकत असतात.

संमेलनात याच संदर्भात आणखी एक गोष्ट जाणवली. खास निमंत्रण गेलेले वक्ते आणि साहित्यिक पाहुणे सोडले तर साहित्याकडे आस्थेवाईकपणे पाहणाऱ्या रसिकांची, नव्या दमाच्या साहित्यिकांची, अभ्यासकांची, भाषेच्या प्राध्यापकांची केविलवाणी अवस्था होते. साहित्यसंमेलनात आपल्या काही अपेक्षा, अडचणी यांवर चर्चा होईल, असे त्यांना वाटत असते. पण अशा स्वरूपाचे सर्व लोक एकत्र येतील, आपल्या काही अडचणी सांगतील, विचारविनिमय करतील, अशा स्वरूपाचा कार्यक्रमच आखला जात नसतो. मग हे लोक घोळक्या घोळक्यांनी कुठेतरी उभे राहतात, चर्चा करतात, ओळखी करून घेतात. पण हे सगळे संमेलनाच्या बाहेर (संमेलनाच्या बाहेर तरुण कवींचे एक समेलन तर फारच सुरेख झाले,) पण असे घडून येणे प्रत्येक वेळी शक्य नसते. यांच्यासाठी चाकोरीबाहेर जाऊन जुन्या-नव्यांचा वाद-संवाद घडवणे अत्यंत आवश्यक आहे. अध्यक्षीय भाषण आणि परिसंवाद यांच्याबरोबर अशा पद्धतीनेही वैचारिक देवघेव होणे अत्यंत जरुरीचे असते. साहित्यातील वर्तमान पिढीला त्यातून काहीतरी नेमके मिळण्याची शक्यता असते. असे जेव्हा मिळेल तेव्हाचेच 'साहित्यसंमेलन' यथार्थ होईल. नाहीतर तो लग्न, मुंज, सत्कार, यांच्या सोहळ्याप्रमाणेच एक सोहळा ठरेल. ●

# विचार धारे

समीर

**• चीनचे लाल कोडे**

लाल चीन ही भारतापुढील सर्वांत गंभीर समस्या आणि जगापुढचे सर्वांत मोठे प्रश्नचिन्ह का आहे ? त्या देशात क्रांतिकारकांच्या पहिल्याच पिढीच्या हाती अजून सत्ता आहे हे तर याचे कारण नसेल ? डॉ. हू या चिनी तज्ज्ञाने गेल्या आठवड्यात दिल्लीत आधुनिक चीनच्या अंतरंगाचा मागोवा घेताना ही शक्यता प्रकट केली. डॉ. हू हे अमेरिकेच्या कोलंबिया विश्वविद्यालयात प्राध्यापक असून दिल्ली विश्वविद्यालयात चीन-अध्ययन विभाग सुरू करण्याच्या कामी साहाय्य करण्यासाठी दिल्लीला आले आहेत.

चीनच्या धोरणाचे मूल्यमापन करताना एक मूलभूत मुद्दा लक्षात ठेवला पाहिजे. तो म्हणजे तेथे अजून क्रांतिकाल चालू असून, ज्यांनी ही क्रांती प्रत्यक्ष घडवून आणली तेच अजून सत्ताधिष्ठित आहेत. या महत्त्वाच्या कारणामुळेच चिनी साम्यवाद्यांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन "आपल्याहून फार भिन्न आहे." चीन आणि रशिया यांच्यांतील संघर्षाचे रहस्यही यांतच आहे. या दोन देशांत क्रांतिकारकांच्या दोन निरनिराळ्या पिढ्या सत्तेवर असल्यामुळे त्यांच्या दृष्टिकोनांत फरक आहे.

एकीकडे लाल चीनच्या तत्त्वज्ञानात पहिल्या पिढीचा ' जोष ' आहे, तर दुसरीकडे चिनी इतिहासापासून साम्यवादी चीनला तीन गोष्टी मिळाल्या आहेत. त्या म्हणजे सांस्कृतिक श्रेष्ठतेची दृढ भावना, विस्तारवादी वृत्ती आणि खोलवर रुजलेली वैफल्याची भावना. सांस्कृतिक अहंकार चिनी राष्ट्राच्या मनोवृत्तीचे एक अविभाज्य अंग आहे, आणि त्यांच्या हातून घडणाऱ्या बऱ्याच गोष्टींचा उगम या अहंकारात आहे. चीनच्या भूगोलानेही या वृत्तीची जोपासना केली. "चीनच्या सरहद्दीवर कुठल्याही काळी दुसरे कुठलेही मोठे संस्कृतीचे केन्द्र नव्हते, आणि भारतीय संस्कृती हिमालयाच्या पलीकडे होती; त्यामुळे दीर्घ काळपर्यंत चीनने आपल्या संस्कृतीचा लाभ शेजाऱ्यांना दिला. पण या देवाणीबरोबर घेवाण होऊ शकली नाही."

मात्र चीनच्या या सांस्कृतिक विस्तारवादात हल्लीच्या पाश्चिमात्य साम्राज्यवादात हमखास असणारा आर्थिक शोषणाचा भाग नव्हता. सांस्कृतिक वरचढपणाबरोबर काही प्रमाणांत राजकीय नियंत्रणही होते. त्यामुळे ' मांडलिक राज्यां 'ची प्रथा पडली व तीत कोहिमा, तिबेट, आसाम, ब्रह्मदेश इत्यादी देशांचा वेळोवेळी समावेश झाला. सतराव्या शतकात मांचू वंश सत्तेच्या शिखरावर असताना चीनच्या

भोवती ही आंतरराष्ट्रीय प्रभावळ होती.

पण मग आगबोटी आल्या, त्यातून पाश्चिमात्य लोक आत घुसले व १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत सर्व परिस्थिती पालटली. चीनची प्रभावळ हिरावून घेण्यात आली व स्वत: चीनला एका ' निम-वसाहती ' ( " सेमी-कॉलनी ") चा निकृष्ट दर्जा प्राप्त झाला. अशा रीतीने आत्मप्रौढीच्या लांबलचक परंपरेवर पोसलेल्या एका राष्ट्राला नामोहरम करण्यात आले. त्यानंतरच्या काळात चिनी लोकांची आपल्या मानहानीची, आपल्यावरच्या दडपणाची आणि अतिक्रमणाची बोचक जाणीव वाढतच गेली.

आणि आता प्रथमच चीन " एक संघटित, राजकीय दृष्टचा स्थिर, आर्थिक दृष्टचा प्रगतिमान आणि लष्करी दृष्टचा सुसज्ज राष्ट्र " म्हणून पुन: वर आला आहे. साहजिकच चीन आता विस्तारवादी झाला आहे. गेलेला प्रदेश नव्हे तर हरपलेला आंतरराष्ट्रीय मान पुन: मिळविणे व एकूण एवढचा मोठ्या देशाला साजेल असा सन्मान प्राप्त करणे हे आता चीनचे निर्धारित ध्येय आहे. याच्या जोडीला स्वत:च्या हितासाठी शेजारच्या देशांना आपल्याला हव्या असणाऱ्या सामाजिक व राजकीय साच्यात बसविण्याची ईर्ष्याही आहे. चीन हा एक अत्यंत असंतुष्ट देश असून त्याला पूर्वीच्या बऱ्याच गोष्टींचा वचपा काढायचा आहे हे लक्षात ठेवले तरच, चीनने जगापुढे उभ्या केलेल्या समस्येची पूर्ती करता येईल.

पण, या सर्व गोष्टींमुळे चीनच्या भारतविषयक वृत्तीचा अन्वयार्थ लागतो काय ? या प्रश्नाचे मात्र या चिनी तज्ज्ञाजवळ उत्तर नाही. " भारताचा विचार केला तर चिनी नेत्यांच्या मनात काय आहे, हे मला खरोखरीच सांगता येत नाही. भारताला दूर लोटण्याचे त्यांना अजिबात काही कारण नाही. हे एक फार मोठे कोडे आहे. "

### ● शाकाहाराचा महिमा

माणूस शाकाहारी आहे, की मांसाहारी ? ' इंटरनॅशनल व्हेजिटेरियन युनियन ' चे अध्यक्ष वुडलॅंड केहलर नुकतेच दिल्लीला भेट देऊन गेले. त्यांच्या मते मांसाशन हे माणसाला अनैसर्गिक आहे. थंड प्रदेशांत मांसाहाराची आवश्यकता असते असे म्हणणे निरर्थक आहे. " अमेरिकेत एका उंच ठिकाणी हिवाळ्यातले उष्णतामान गोठण्याच्या बिंदूच्या ४५–५० अंश खाली जाते, त्या ठिकाणी मी शाकाहारावर तीन वर्षे काढली व मला काही झाले नाही. "

युरोपमध्ये शाकाहाराची लोकप्रियता वाढत आहे. " आइसलॅंडमध्येदेखील शाकाहारी संघटना आहे. जगात एकदम सगळे लोक शाकाहारी झाले तरी मोठासा प्रश्न उद्‌भवणार नाही. गुरांना चरायला जेवढी जमीन लागते, त्यापेक्षा खूपच कमी जागेत भाज्या पिकविता येतात.

" आजच्या अणु-युगातली सर्वांत मोठी समस्या क्रौर्य विरुद्ध दया ही आहे. बाकी सर्व गौण आहे. "

●

# हरदासबुवा

मधु कुलकर्णी

संध्याकाळच्या वेळेला कृष्णेच्या डोहावर लाटा सुटलेल्या असायच्या आणि डॉक्टरांच्या सोप्याला बैठक रंगलेली असायची. दहा-पाच माणसं आजूबाजूला जागा धरून बसलेली असायची, आणि मध्ये हरदासबुवा पानं जमवीत असायचे. वास्तविक, अनंत रोगांनी जर्जर झालेली व मेटाकुटीला आलेली माणसं औषधांचा वास घेत बसलेली असायची ती जागा. पण फावल्या वेळेला त्याच जागेवर हरदासबुवा गप्पा-गोष्टींचा दरबार उभा करीत. स्वत: मिशीतल्या मिशीत हसल्यासारखं करून इतरांना गदगदून हसायला लावीत. तिथं बसलेल्यांपैकी कुणालाही ते खर्चीं टाकत. आणि खर्चीं पडलेला तो स्वत:ही खळखळून हसायला लागे. लग्न होऊन चार वर्षं झाली तरी घरात पाळणा का हालत नाही म्हणून भानुदास जोशाची ते हजेरी घेत. आणि साठी उलटत आली तरी वर्षाचा पाळणा अजून कसा चुकत नाही, म्हणून नारायणराव कुलकर्ण्यांची बुवा मनमुराद चेष्टा करीत, त्यांना परोपरीचे उपाय सुचवीत ! पिढीजाद इस्टेट काळाच्या आणि कायद्याच्या ओघात वाहून गेली तरी नारायणरावांना गावात 'मालक' म्हणतात. हरदासबुवा त्यांना खाली मान घालायला लावीत. आणि मग खाली मान घालूनच 'मालक' लाजत आपण हल्ली अंगणात बाजल्यावरच झोपत असल्याचे सांगत ! तरीही हरदासबुवा त्यांना तसे मोकळे सोडत नसत. मग काय, पातळाशेजारी धोतर वाळत घातल्यामुळं असं होतंय काय ते विचारीत ! 'मालकां'जवळ मग उत्तरच नसे. ते ओशाळून विचारात पडल्यासारखे करीत.

बंकट काका चहासाठी कसा सतत हपापलेला असतो, याचं साग्रसंगीत वर्णन बुवांनीच केलेलं असतं. जाकूजाकाका हे त्यांचं नावही बुवांनीच ठेवलेलं असे. या जाकूजाकाकाचा प्राण जायच्या वेळी त्याचं तोंड उघडं पडलं की, एक घमेलंभर चहा त्याच्या उघड्या तोंडात ओतला तर तो पुन्हा उठून पळू लागल्यावर कसा दिसेल, याचं चित्र हरदासबुवा दिलखुलास रंगवत. गावातलं देशपांड्यांचं एक घराणंच कसं काळंशार आहे हे त्यांच्या तीन पिढ्यांचं उदाहरण देऊन बुवा पटवून देतात. त्या घराण्याचा रंग जन्मजातच इतका तुकतुकीत काळा आहे की, त्यांच्यां-

तल्या कुठल्याही माणसाच्या अंगावर खडूची रेघ ओढली तर ती नक्की पांढरीखड उठेल हा कयास हरदासबुवांनीच बांधलेला असे. त्याच देशपांड्यांचा थोरला मुलगा गणपती आपल्या थुलथुलीत गोऱ्या बायकोजवळ उभा राहिला की, कसा भातावर कावळा बसल्यासारखा दिसतो हा शोधही त्यांनीच लावलेला असे. नरसिंहपूरच्या कृष्णेच्या घाटावर आयुष्यातल्या चार घटका तरी स्वतःचं वय विसरून जाणारे हरदासबुवा इतरांनाही आपली वयं विसरायला लावीत.

आपल्याकडे व्यावसायिकांचीही कोष्टकं आहेत. रस्त्यावरून जाताना समोरून प्रत्यक्ष क्लिओपात्रा जरी आली तरी खाली मान घालून, कान पाडून, नाकासमोर जाणारा माणूस नक्की मास्तर आहे हे ओळखावं, थोडी डगळ कापडं घालून अगदी

**धोतराचा पिळा खांद्यावर टाकून घाटावरून येताना बुवा सासुरवाशिणीला विचारतील– "काय ग, या खेपेला घरचं का बाहेरचं..." ती हसत सांगेल...'मुलगा'.**

कातरवेळेला फिरायला गेल्यावर.

केवळ जी. आर. मेमो, सँक्शन, इनवर्ड आणि डिस्पॅच या महान् विषयावरच गप्पा मारणारी माणसं रेव्हेन्यूतलीच आहेत असं खुशाल समजावं. आणि तोंड उघडी असूनही काही न बोलता एखादं टोळकं रस्त्यानं चाललेलं असलं तर ते पोस्टांतलं असावं हें कुणीही सांगावं. कीर्तनकार म्हटला, की त्यानं बसायच्या वेळेला गुडघ्यावर हाताचा रेटा देऊन 'श्री हरी, श्री हरी' म्हटलं पाहिजे. बसल्यावर उभ्या गुडघ्यावर डोक्याचा रुमाल ठेवून टकलावरून हात फिरवता फिरवता 'गोविंद गोविंद' म्हटलं पाहिजे. आणि उठायच्या वेळेला 'हरे राम' म्हटलं पाहिजे, अशी लोकांची कल्पना असते. खाजगी गप्पांत थोडेसे शिथिल बोलणारे हरदासबुवा म्हणूनच लोकांना विचित्र वाटतात. पण डाळिंबी जरतारी रुमाल आणि लांब अंगरखा, करवतकाठी धोतर आणि कोरेकरकरीत जरीचे उपरणें कपाळावरचे

केशरी गंध आणि गळयातला गुलाबांचा हार या थाटात कीर्तनासाठी उभे ठाकलेले बुवा खरोखरच कीर्तनकार म्हणूनच शोभून दिसतात.

बुवांच्या आवाजाच्या दुधात मिठाचा खडा टाकण्याची करामत परमेश्वरानं केलेली आहे. लोक त्याला घोगरा म्हणतात. पण त्याच आवाजाची फिरकी सहजा-सहजी षड्जावर नेऊन झारदार स्वरांतून सोन्याचं सूत काढण्याची करामत बुवांनी करून दाखविलेली आहे. मिशा लोकमान्य टिळकांसारख्या आणि वर्ण देशस्थी, उंच, सडसडीत अंगलटीचे बुवा कीर्तनासाठी उभे राहिले की, पूर्वरंग रंगायलाच लागतो. नृसिंहजयंतीचे दिवशी हरदासबुवा नरसोबाच्या देवळात जन्मकाळाची कथा तन्मयतेनं सांगत असतात, आणि दरवर्षी त्या दिवशी दिवस बुडताना खुद्द परमेश्वराला जन्म घ्यावाच लागतो, अशी बालपणी आमची श्रद्धा असे. बुवांनी एखादे आख्यान लावले की त्या त्या कथेतली माणसं आम्हांला भेटूनच गेल्यासारखे वाटे. सगळे रस त्यांच्या उपरण्याच्या शेवटात बांधून ठेवलेले असत. पूर्वरंगात भल्याभल्यांना हसून हसून लोळावं लागे. आध्यात्माचा खरा अर्थ न समजलेली काही म्हातारी-कोतारी माणसं आणि कशातलंच काहीही न समजता देवाचं नाव आलं की, भाविकपणानं हात जोडणाऱ्या बायका बुवांच्या कीर्तनात टारगटपणाच जास्त म्हणून नाक मुरडतील. कारण, यांना देवाचं नाव मुखावर आलं की, गहिवरणारा आणि उपरणं डोळयांना लावणारा कीर्तनकार हवा असतो. पायांत चाळ बांधून तसलं नाटक हरदासबुवांना आयुष्यात कधीही जमलेलं नाही. पेटीतून निघालेला स्वर चिमटीनं धरून बुवा शास्त्रशुद्ध केदार उभा करतात, आणि कीर्तनासाठी आलेला महिलावर्ग भांबावल्या-सारखा त्यांच्या मुखाकडे पाहात राहतो! आधुनिकीकरणाच्या आजच्या युगात साक्या, दिंड्या आणि लयदार कटाव हरदासबुवांनी जतन करून ठेवले आहेत. तीन मिनिटांच्या मेणाच्या तबकडीतल्या गाण्याच्या आजच्या काळात बुवांसारख्यांनी कीर्तनाच्या पीठावर रागदारी जिवंत ठेवली आहे.

इस्लामपूरच्या रस्त्यावरच एकदा बुवा भेटले होते. समोर आल्याबरोबर,

" काय प्रोफेश्वर, हक्काची पळवाट का कायदेशीर कामचुकारपणा ? " असं त्यांनी विचारलं होतं. ' सुटी की रजा ' या दोन शब्दांचे पर्याय त्यांनी वापरले होते. मग त्यांनी माझी इकडची तिकडची चौकशी केली होती. रस्त्यावरच बराच वेळ बोलून झाल्यावर निघताना त्यांनी विचारलं होतं, " तत्त्वज्ञान ऐकायचंय ? या मग आज बँकेत. "

नोटांच्या पुडक्यांत डोकी खुपसून बसणारांच्या कमर्शिअल चौकोनात सॉक्रेटिस कधी जन्मला म्हणून माझ्याबरोबरचा मित्र दचकला होता. पण दिवसभर चलनी धावपळ चाललेल्या त्या वास्तूत रात्री गाण्या-बजावण्याला किंवा कीर्तनप्रवचनाला मुक्तद्वार असते, हे अवघ्या इस्लामपूरला माहिती होते. त्या दिवशी रात्री बँकेचा हॉल तुडुंब भरून गेला होता. उदबत्त्यांचे झाड पेटले होते. पेटीचे स्वर सगळीकडे

व्यापून राहिले होते. आणि तबल्यावर बाबालाल होते. बुवांच्या पहिल्या अभंगाचे तोंडच बाबालालनी असे उचलले की, ऐकणाराचं काळीज जरासं वरती जाऊन खाली यावं. बुवा मध्येच थांबले. बाबालालच्या पाठीवर हात ठेवून 'इस्लामपूरचं रत्न' म्हणून उल्लेख केला. एका कसलेल्या कलावंताकडून दाद मिळाल्यामुळं त्या जातिवंत कलावंतानंही मग लवून शुक्रिया आदा केला होता–

आणि मग बुवांनी गांभीर्याने 'अहं ब्रह्मास्मि' च्या विषयाला स्पर्श केला होता. 'मी' परब्रह्माचा अंश' आहे. भक्त आणि परमेश्वर यांच्यांत द्वैत नाही. भक्त परमेश्वरामध्ये विलीन होतो, मिळून जातो. त्यासाठी बुवांनी एक गोष्ट सांगितली–

"मुंबईला असताना मुलगा आणि कलत्रा समवेत गेटवे ऑफ इंडियावर फिरायला गेलो. माणसांची यात्रा भरलेली. मुलांची इच्छा आणि कलत्राचे कौतुक म्हणून भेळ घेतली. समोर एक फेरीवाला आला. त्याच्याकडे पांढऱ्याशुभ्र बाहुल्या होत्या. अर्भकाचे कुतूहल म्हणून दोरी बांधलेली त्यातली एक बाहुली त्याला घेऊन दिली. पुढे मग चिरंजीवाने समुद्रातली नाव पाहिली. आणि बसायचा हट्ट घेतला. कलत्रालाही नौकायनाचे डोहाळे लागले असावेत, असे चर्येवरून वाटले. खिसा चाचपीत नावेत बसलो. समुद्रात दूरवर गेलो आणि चिरंजीवाने बाहुलीचा दोरा गळ बाहेर काढावा तसा, पाण्यातून बाहेर काढला. टोकाला बाहुली नव्हती. मुलगा रडू लागला. बाहुली कुठाय विचारू लागला. त्याला काय सांगू ? मिठाची बाहुली मिठाच्या पाण्यात विरघळून गेली. एकरूप झाली. ती आता बाजूला कशी काढता येणार? अद्वैत असे असते...बोला...सीताकान्त, स्मरण जयजय रा..."

बुवांची खूपच भ्रमंती झालेली आहे. तिचा ते कीर्तनात उपयोग करून घेतात. कोकणात अनुनासिके कशी स्वस्त असतात, याची अनेक उदाहरणे दिलेली असतात. पण देवगडच्या मुक्कामात हातोडी विसरल्यावर तबलजी 'बुवा घोण्टाळा झाला', असे म्हणतो. या उदाहरणाने सर्वांवर मात केलेली असते. भ्रमंतीतल्या अनुभवांचा ते कधी कधी व्यवहारातही उपयोग करून घेतात. सातारला ते एकदा चिकट केळकरांकडे उतरले होते. नावावरून केळकरांचा काटकसरी चेंगटपणा लक्षात यावा. पहिल्या दिवशीच जेवायला बसल्यावर बुवांनी हैदराबादकडची एक गोष्ट सांगितली होती. तिकडे जावई घरी आला की, मोठमोठ्या पराती बाहेर काढतात. जावयाला त्यांत बसवून आंघोळीला घालतात. आंघोळ झाल्यावर तेच पाणी कपडे धुण्यासाठी वापरतात. कपडे धुऊन झाल्यावर त्याच पाण्याने भांडी घासायची आणि भांडी घासून झाल्यावर तेच पाणी बागेतल्या झाडांना घालतात ! बुवांनी केळकरीणबाईंना ही गोष्ट ऐकवली होती, आणि मुक्काम हलेपर्यंत पोटभर जेवण मिळवले होते.

बुवांना कीर्तनासाठी मंदिरच लागते अशी अट नाही. गणेशोत्सवात आदल्या दिवशी झालेल्या मेळ्याचे स्टेजही त्यांना चालते. 'मेळा' या नावावर अश्राप

मुलांमुलींना कमर आणि खांदे लचकवून अक्षरशः 'नंगानाच' करविलेल्या त्या स्टेजला बुवांचे पाय लागतात. आणि विराट जनसमुदायासह त्या स्थळाला मंदिराचे गांभीर्य येते. खऱ्या अर्थाने सार्वजनिक ठिकाण असलेल्या या पीठावर बुवा सामाजिक विषय घेतात.

—वतनदारीत Stability ला महत्त्व होते. लोकशाहीत Stability ला महत्त्व नाही, पण आज पुढे आलेला माणूस आणखी पुढे यावे म्हणतो. बंगला बांधावा म्हणतो. मोठी इस्टेट करावी तो म्हणतो. म्हणजे तोही वैयक्तिक Stability च्याच मागे आहे. समाजवाद आलाच पाहिजे असे बुवा आवर्जून सांगतात. समोरच्या गर्दीचे उदाहरण घेऊन दाटणी झाली की वाटणी व्हायलाच हवी, असा सिद्धांत मांडतात.

—हेच कीर्तन एखाद्याच्या घरी खाजगी स्वरूपात असेल तर बुवांच्या वाणीला वेगळाच रंग चढतो. आजूबाजूला प्रतिष्ठितांबरोबर वकीलमंडळी बसलेली असतात. खुद्द कोर्टही उपस्थित असते. आणि बुवा बेवडकपणे कायद्यातील शब्दांची चिकित्सा करीत असतात. Possession आणि Ownership या दोन्ही संज्ञा पूर्वी एकच मानल्या जात होत्या. वस्तू विकत घेतली की, तिचा कबजा विकत घेणाराकडे आपोआपच लगेच येत असे. आज त्या दोन्ही संज्ञा वेगळ्या केल्या आहेत. चोराने भांडी चोरली तर ती भांडी त्याच्या Possession मध्ये असतात. म्हणून तोच मालक होतो. याच चालीवर, करील त्याची पाटीलकी, बसेल त्याचं घोडं, या म्हणी सांगून बुवा जेव्हा नांदल त्याची बायको असे ठोकून देतात त्या वेळी त्यांना काय सुचवायचे आहे हे कळूनही, आणि ते न पटूनही श्रोतृसमुदायात हशा पिकतो.

ओल्या धोतराचा पिळा खांद्यावर टाकून घाटावरून बुवा घरी येत असताना बाळंतपणातून उठलेली काकतकरांची सून कडेवर घागर घेऊन पाण्याला येत असलेली भेटते. तिच्या डोळ्यातले काजळ अजून ओले असते. बुवा तिला सरळ विचारतील, "काय ग, या खेपेला घरचं का बाहेरचं ?"

पण ती सासुरवाशीण रागावणार नाही. कुठलाही अर्थ मनात न घेता ती नम्रतेनं पण हसतहसत सांगेल, "मुलगा."

अशाच एका दुपारच्या वेळेला, परवाच लग्न झालेली साळवेकरांची तिरळी बनी बुवांना जेवायला बोलायला आलेली असते. सोप्यात विश्राम करत असलेल्या बुवांना ती सांगते,

"पानं वाढलीत्. तात्यांनी बोलावलंय् लगेच."

"आलोच" म्हणत पंत तिच्या डोळ्यांकडे पाहून छद्मीपणाने विचारतील,

"तुझ्या खुणा तुझ्या नवऱ्याला समजतात का ग ?"

"इश्य ऽऽ" म्हणत दातात पदर धरून बनी हिरवीगार लाजते आणि घराकडे पळते—

व्यक्तिमापनाच्या ठरीव फूटपट्ट्या हातात असलेली माणसे बुवांच्या व्यक्तिमत्त्वाला

कीर्तनकार बुवा आणि व्यवहारात जगणारे बुवा असे सरळ सरळ दोन पैलू आहेत असे समजतात; पण बुवा जीवनाच्या विवेचनालाच कीर्तन मानतात. जे जीवनात पाहिले, अनुभवलेले असते, तेच बुवा कीर्तनात मांडतात. आणि जे कीर्तनात सांगितले जाते, तेच जीवनात आणायचा प्रयत्न करतात. म्हणूनच वय जसे उताराला लागत आले तसे बुवांनी संसारातून लक्ष काढलेले आहे. राष्ट्रपतीभवनात दिल्लीला राष्ट्रीय कार्यक्रमात राजेंद्रप्रसादांसमोर बुवांचे कीर्तन झाले त्या वेळी त्यांना कृतकृत्य झाल्यासारखे वाटले, तरी ते हुरळून गेले नाहीत. त्याचबरोबर भर चावडीसमोर एका फाटक्या पुढाऱ्याने सर्वांदेखत अपमान केला त्या वेळी स्वाभिमानामुळे आत कुठेतरी बोचल्यासारखे वाटले तरी बुवा संपूर्ण निराश झाले नाहीत, अगर सूडाने पेटलेही नाहीत. आयुष्यात म्हणूनच बुवांनी सुख उतू येऊ दिलेले नाही, आणि दु:खाने ते करपलेही नाहीत. कीर्तन संपल्यावर आरतीचे तबक गोव्यात सोन्याचांदीने भरलेले बुवांच्या नजरेने पेललेले आहे. आणि वेळप्रसंगाला त्यांना आपल्या जमिनीवर कर्जही काढावं लागलेलं आहे. बडोद्याला मिळालेलं मानपत्र आणि मुदत संपत आल्याची जाणीव करून देणारा तोच तारणगहाणाचा कागद यांच्यांतली वजाबाकी आयुष्यात बुवांनी सहजपणाने सोडविलेली आहे.

म्हणूनच आयुष्यात घडलेल्या अनेक प्रसंगांचे अर्थ बुवा सुलट रीतीने लावू शकतात. गांधीवधोत्तर दंगलीच्या वेळी बुवा शेणोली स्टेशनवरून नरसिंहपूरला यायला निघालेले असतात. आणि एका टोळक्याच्या तावडीत सापडतात. जरीची काडी असलेला डोक्यावरचा तांबूस रुमाल आणि अघळपघळ खिसे असलेला अंगावरचा जुनाट कोट, एवढ्या मांडवलावर बुवांनी, अप्रिय सत्य सांगायची वेळ नसल्यामुळे, आपण सोनार असल्याची थाप मारलेली असते. पण कानांतली भिकबाळी आणि गळ्यातले जानवे यांनी बिंग फुटलेले असते. बुवा उघडे झालेले असतात. आज ती घटना सांगताना बुवा कधीही गहिवरून जाणार नाहीत. जवळची सगळी चीजवस्त गेल्याने किती नुकसान झाले, याचा आकडाही सांगणार नाहीत अगर त्या बहाद्दरांनी शेवटी अंगही कसे रगडून काढले, याबद्दल कुरकुरणारही नाहीत, तर शेणोलीहून नरसिंहपुरापर्यंत उघड्या अंगाने यावे लागल्यामुळे थंडी कशी वाजली याचेच साग्रसंगीत वर्णन करतील—

बुवांनी आता नरसिंहपूर सोडलेले आहे. कराडला घेतलेले एक लहानसे घर आणि कायद्याच्या ओढाताणीत राहिलेल्या चार वडिलार्जित जमिनी, ही त्यांच्या घरातल्या पुढच्या पिढीसाठी ठेवलेली शिल्लक. नरसिंहपूर सोडून ते आता कराडलाच जाऊन राहिलेले आहेत. प्रपंचातून मन काढण्यासाठी केलेले हे स्थलांतर असेल. कृष्णाकाठच्या मळीतील चवदार वांगी आणि शाळूची खरपूस भाकरी यांवर पोसलेल्या त्यांच्या देहाला कृष्णाकोयना संगमच जवळचा वाटलेला आहे. तरीही 'मुखे संसारी राहावे, परि चित्त परब्रह्मी असावे' हा तुकोबांचा अभंग त्यांनी आता

आचरणात आणलेला आहे. त्यांचा थोरला मुलगा राम त्यांची कीर्तनाची गाडी पुढे चालवतो आहे. नभोवाणीचे सांगली उपकेंद्र सुरू झालेल्या दिवशी उद्घाटनाच्या कार्यक्रमात रामचे कीर्तन झाल्याचे पाहून त्यांच्या डोळ्यांचे पारणे फिटलेले आहे. दुसरा मुलगा पुरुषोत्तम गावात शेती पाहतो आहे. गावगुंडीच्या राजकारणात त्याला कधीमधी कसल्यातरी धमक्या येतात. पण बुवा त्याच्याकडे आता लक्षच घालत नाहीत. घराण्याच्या परंपरेतील चिवटपणा जर आत्मसात करता आला नाही तर आपल्या मुलाने पुरुषोत्तम हे आपले नावही लावू नये, असा बुवांच्या मनाचा कयास आहे.

आयुष्यात समाधान नेहमी मिळवावे लागते. कमळाच्या पानाप्रमाणे सुखदुःखांचे सगळे प्रसंग समदृष्टीने पाहात बुवा आता कृष्णेच्या घाटावर विसावू पाहाताहेत. नरसिंहपूरला ते असताना देवाच्या पूजेच्या अगर दर्शनाच्या निमित्ताने त्यांना हरघडी तिथल्या देवाच्या भुयारात जावे लागत असे. कराडला भारतभागवताच्या संगतीने आध्यात्माच्या गुहेत प्रवेश करून बुवा तिथेच कुठेतरी थांबण्याचा प्रयत्न करताहेत. म्हणूनच पैलतीर दृष्टीच्या टप्प्यात आलेल्या बुवांची, जगातल्या कुठल्याही माणसाबद्दल तक्रार नाही–

• • •



माणूस

दिवाळी अंकात
प्रसिद्ध झालेली

श्री. ब. मो. पुरंदरे

यांची नवी
ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं

लवकरच पुस्तकरूपाने
प्रकाशित होत आहे

मूल्य तीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

१५ जानेवारी १९६६

# गिरक्या

प्रा. श. दि. परेगावकर

दुचाकीच्या गिरक्या घेत मी गर्दीत मिसळून जातो. मग दुचाकीच्या गतीबरोबर वाहू लागतो. हळू हळू अनोळखी चेहऱ्यांचे जग माझ्यापुढे साकार होते. त्या चेहऱ्यांच्या दिशेने मी सरकत जातो. रस्त्याच्या कडेला असलेल्या दुकानांत माझी नजर रेंगाळते. नायलॉनच्या साड्यांच्या पताका झळकत असतात. पायरीवरून येणाऱ्या–जाणाऱ्यांची झुंबड लागलेली असते. त्यातून एक पोक्त शाळा मास्तरीण जपून वाट काढीत असलेली दिसते. मी मग न्याहाळू लागतो. हातात चष्मा धरून ती पदर सावरू लागते. कौमार्याचे ओझे तिला नकोसे झालेले असते. बाहेर पडल्यावर ती सुस्कारा टाकते–'अरे एऽऽ सायकल' कुणीतरी टांगेवाला पाठीमागून कर्कश आवाजात पुकारतो. म्हाताऱ्या घोड्याचा टांगा खडखडत असतो. मी भानावर येतो. पुन: दुचाकीबरोबर वाहू लागतो. पांढरे, लाल, रेशमी, सुती, मळके, स्वच्छ तऱ्हेतऱ्हेचे कपडे घातलेले अनेक देह मागेपुढे होत असतात. कसलीतरी ओढ घेऊन गर्दीचा प्रवाह वाहात असतो. गर्दी–गर्दी नको करणारी, माणसांचा वीट आणणारी गर्दी, या गर्दीत माणूस कोठे आहे ? तो त्या प्रवाहात लुप्त झाला आहे. समोरून हातात मडकं घेतलेला एक बोडका माणूस येतो, त्याच्यामागून चार माणसं तिरडीवर एक देह घेऊन जात असतात. प्रवास संपवून कुणीतरी चाललेला आहे. मी बाजूला वळतो. तिरडीवरचे प्रेत करकचून बांधलेले आहे. माणसं निर्विकारपणानं नेत आहेत. यमाचे दूतही असेच निर्विकार असतील. मुळीसुद्धा फरक नसेल. हळू हळू ते लोक दूर जातात. मी पुन: वळून त्यांच्याकडे पाहू लागतो. मनात कसलीतरी विकृत लकेर लवलवते. मन सुन्न झालेले असते.

गौतम बुद्धानं प्रेत पाहिलं अन् त्याला वैराग्य आलं. लहानपणी वाचलेला धडा आठवतो. इतिहासाकडे पाहणारे मन मी गोंजारतो. माझे मन मी पुन: तपासून पाहू लागतो. गूढ आणि खोल मनात मी शिरायला भितो. शेजारी पुन: एक पुंजका दिसतो. माणसंच माणसं. रस्त्यावर कडेला हा घोळका उभा आहे. उंच, बुटके, रोड, लठ्ठ, टक्कलवाले, लांब केसवाले, धोतरवाले, पँटवाले हे सारे फक्त पाठीमागून दिसतात. माना उंच करून पाहात आहेत. मी ब्रेक दाबतो. कुतूहल उरात घेऊन

थांबतो आणि मग एक किडा होऊन त्या वारुळात शिरतो.

काळयाकुट्ट रंगाचा, कपाळावर ओंगळ झुलपे राखणारा, तेलकट तरुण गळयाच्या शिरा ताणीत असतो. मधूनच हात उंच करून काही बोलतो. ऐकू येत नाही. तद्रूप होऊन ऐकणारे कंटाळू लागतात. हळू हळू गर्दी ओसरते, पुनः दुसरी जमेल. औषधवाला दैवाचा हवाला घेऊन काहीतरी कमवील. मग उद्या ते सारं गमवील आणि परवा परवा तिरडीवर करकचून आवळून कुठेतरी या विश्वाचा विलय होईल.

मी येऊन दुचाकीवर बसतो. समोरून फळांची गाडी येते. ती केळी असतात. सडकी केळी गाडीवर भरून आणलेली असतात. उद्या ती आणखी सडतील अशी त्याला भीती आहे. ही आजच विकायला हवीत. जगाच्या व्यवहारात आपण मागं

**गावातली ती गर्दी. तो जंजाळ.**
**श्वास गुंतविणारा—ओशट—**
**आणि गावाबाहेरचे हे सुंदर, टुमदार बंगले**
**मेंदीच्या बाहुपाशात विसावलेले. पायरी-**
**वरून गुर्मीत पाहणारा तो अल्सेशियन...**

पडायला नको.

' केळऽ केळं. मुंबईचा माल—सस्ता लावलाय—घ्या चला, मुंबईचा माल ' (बेटयाला ठाऊक नसतं, मुंबईला केळी पिकत नाहीत.) त्या मालाला गिऱ्हाईक मिळतं, केळयांवर माशा बसतात, तसे लोक जमू लागतात. स्वस्त असल्याचं कळल्यामुळं लोक भराभर विकत घेतात. आधाशासारखे खाऊ लागतात. एक तरुण म्हणतो, " केळयांत म्हणे सी व्हिटॅमिन असतं. "

" अरे, त्यापेक्षा हिरव्या केळयांत एक द्रव्य असतं. त्यामुळे आपण दीर्घायुषी होतो. "

एक पोक्त जोडपं येतं. तो गृहस्थ बायकोला म्हणतो,

" आज शिकरण कर, भाजीचा खर्च आपण केळयांवर करू या. "

" अहो, पण दूध नाही आज ! "

" जाऊ देत मुलं खातील. घे चल, हं चांगली दे रे पाहून. "

केळीवाला वाढलेली दाढी कुरवाळीत खुबीनं नासकी केळी खपवतो. डाव्या हातानं पुन: माशा वारू लागतो. पुन: एकदा घसा खरडून ओरडतो, " केळं केळं-मुंबईचा माल सस्ता लावलाय ! " मघाची शाळा मास्तरीण येते. विनयशीलपणे पदर सावरीत दूर उभी राहून केळी निरखू लागते. तिला वाटतं केळी पाहून घ्यावीत. आपण एकटच्या आहोत. व्यवहारात फसायला नको. जपून पावलं टाकायला हवीत. मग हळूच ती एका फणीकडे बोट दाखवते. " यातून द्या मला. "

केळीवाला अदबीनं विचारतो, " किती देऊ बाई ? "

" तीन द्या, " पर्समधून पैसे काढते. केळी पिशवीत घालून चालू लागते.

केळीवाला तोंड वेडावीत गाडी सरकवीत चालू लागतो. मी दूरंपर्यन्त त्याला न्याहाळीत राहतो, टायरच्या चपला घातलेला केळीवाला गर्दीत दिसेनासा होईपर्यन्त. मग दिसते धूळ, माणसं पुढं सरकतात, धूळ मागे येते, अंगावर, तोंडावर धुळीचे फवारे उडतात. पाय टेकवून रुमालानें मी तोंड पुसतो. पुन: हँडल गच्च धरून मी पुढे होतो. समोरून येणाऱ्या माणसांची टक्कर चुकवतो. माणसांना पाय नसते तर किती बरं झालं असतं. मनात एक विचार डोकावतो. या घोघावणाऱ्या गर्दीची गतीच नष्ट झाली असती. थिजलेल्या नजरेसारखी गर्दी एका जागीच खिळून राहिली असती. त्या विचारासरशी सारं शांत वाटू लागतं. त्या शांततेला वेढून घेऊन या शहरानं आता स्वस्थ झोपावं असं मला वाटू लागतं. थकलेल्या हमालासारखं. भगभगीत पिवळा प्रकाश माझं लक्ष वेधून घेतो. उंच पोस्टरवर साधना बसलेली दिसते. किंचित्‌ही न हलता, न थकता. कुठल्यातरी ' वक्त 'ची आठवण काढीत ती बसली आहे. चित्रातून तिला उन्मादकरीत्या दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. साधना आपलं तारुण्य कारणी लावीत आहे. गर्दीतून असंख्य नजरा खिळवून घेत आहे. तिच्या उन्मत्त शरीरावरून नजरा खाली घसरत आहेत. हे ' सरोज ' टॉकीज आहे. पिवळे, उंच प्रकाशाने माखलेले. व्यापलेले, गोंचळलेले, गर्दाळलेले, शेजारी बुकिंग ऑफीसजवळ मोठी लाईन उभी आहे. शिस्तीत करमणुकीसाठी आसूसलेले ते जीव ताटकळत उभे आहेत. तीन तास बुद्धीला ताण देऊन (की गहाण ठेवून) त्या अंधारात बसण्यासाठी, साधनाला निरखण्यासाठी, मनाला घोळविण्यासाठी, मैत्रिणीला खूष करण्यासाठी, सर्वांना ' वक्त ' पाहायचा आहे.

केसांची झुलपं आणि पोटऱ्या तंग बांधून टाकणाऱ्या पँटस्, कमरेवर तरंगणारे तोकडे मॅनिले, सिगारेटस्, पानांच्या पिचक्या, डोक्यावरली पागोटी, मळक्या पांढऱ्या टोप्या, काळ्या टोप्या—सारी त्या तीन तासांच्या जादूच्या खेळासाठी निघाली आहेत. सारेजण डोळयांत प्राण आणून पडद्यावरील चित्रं पाहणार आहेत. साधनाबरोबर हसणार आहेत. तिच्या यत्‌किंचितदेखील दु:खानं दुखावणार आहेत, पोळून निवणार आहेत. मी पुढे येऊन आकाशातल्या ढगासारखा स्थिर होतो, गर्दीतलं संभाषण ऐकू लागतो.

" काय यार साधना आहे ! "

" अरे, त्यापेक्षा सदर्न अॅक्ट्रेस फारच वेलबिल्ट. "

"हॅट्, मराठी पिक्चर म्हणजे तमाशा. "

" ' वक्त ' हे तिसऱ्यानं. "

" कारे, तिला आणलंस का ? "

सारंच मला अर्थशून्य वाटतं. लहानपणी ' पुऱ्या अर्थाच्या बोलण्याला वाक्य म्हणतात ' हे व्याकरणात पाठ केलेलं वाक्य आठवतं. वाक्य नसलेल्या भाषणाला काय म्हणायचं ?

त्या मानव–पुत्रांना टाकून मी निघतो. पानपट्टीच्या दुकानासमोर दोन पहिल-वान उभे असतात. समोरून दोन मुली येतात. त्यांच्याकडे नजरा लागतात. काही-तरी सूचक बोलावेसे वाटते. पण सुचत नाही. दुकानातल्या आरशात तोंड न्याहा-ळीत एक तरुण सिगारेट घेतो. सिगारेटचा धूर आता जग व्यापून टाकील. धूर–धुरात सर्व विलीन होईल. संस्कृती, धर्म, नीती या शब्दांत धूर आहे. फसविणारा धूर, अग्नी कुठेच नाही. नुसता गुदमरून टाकणारा धूर !

मी गावाबाहेर येतो. वर्दळ कमी असते. रस्त्याच्या दुतर्फा बंगले आहेत. निळे, पिवळे, पांढरे, सुंदर, मेंदीच्या बाहुपाशात विसावलेले. दिव्याचे फवारे श्रीमंतीचा दिमाख दाखवीत आहेत. एका बंगल्यात पायरीवरून अल्सेशियन डॉग गुर्मीत रस्त्याकडे पाहात असतो. बंगल्यातील माणसांप्रमाणे तुटकपणाने बंगलेही दूर दूर उभे आहेत. कोणाला कोणाचा संपर्क नको आहे. बंगल्यात संस्कृती कम्पाऊंड करून राहात आहे. परीटघडी मोडू देत नाही.

गावातली ती गर्दी–माणसांचा तो संघर्ष, देहानं देह बांधून ठेवणारा, तो जंजाळ. श्वास गुंतविणारा तो गजबजाट, आंबट, घामट, ओंगळ आणि दुर्गंधीनं व्यापलेला रस्ता कापणारी गर्दी आणि ही तुटक रांग–

तुटक रांगेनं जोडलेला हा मानवी संसार. मानवी मूल्ये आणि समाजवाद–घोषणा करणारी गर्दी आणि संस्कृतीचे रक्षण करणारा तुटकपणा–जीवनाचा ग्रास करणारी–जीवन विदीर्ण करणारी वास्तवता मला विकल करते. असहाय्य होऊन मी दुचाकी वळवतो–गर्दीच्या दिशेनं पुढे सरकू लागतो. गिरक्या घेत त्या गर्दीत पुनः मिसळून जातो.

• • •



# नाझी

## भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

उत्तरार्ध

लेखांक : १७

२० एप्रिल १९४५. हिटलरचा हा ५६ वा वाढदिवस. याच दिवशी बर्लिन सोडून ओवरसाटझ्बर्ग येथील, बर्चेसगार्डन निवासात परतण्याचे त्याने ठरविले होते. दहा दिवस आधी महत्त्वाची सर्व कागदपत्रे, त्याचे वैयक्तिक अधिकारी व जवळची माणसे त्याने पुढे धाडली होती.

मात्र पुनश्च बर्चेसगार्डनला परतण्याचे भाग्य त्याच्या ललाटी लिहिले नव्हते ! पूर्व व पश्चिम दोन्ही आघाड्यांवर पाणलोटाप्रमाणे सुटलेल्या दोस्त व लाल सेना, अपेक्षेबाहेर लवकर त्याचा मार्ग अडवून बसल्या. १३ एप्रिलला अध्यक्ष रुझवेल्ट निधन पावल्याचे वृत्त कानांवर येत असतानाच अमेरिकेन सेनेने एल्ब नदी ओलांडून हिटलरचे जन्मग्राम ' लिंझ ' कबजात घेतले; व रशियन सेनेने त्याच दिवशी व्हिएन्नात प्रवेश केला. म्युनिचला अमेरिकन सेनेचा गराडा पडलेला होता व बर्लिन-पर्यंत लाल तोफांची सरबत्ती ऐकू येऊ लागलेली होती.

दक्षिण जर्मनीत निसटून, लढाई चालू ठेवण्याचे फ्यूररचे स्वप्न अशा रीतीने उध्वस्त झालेले होते. नाझी राष्ट्रवादाचा कर्तृत्ववान भस्मासूर राजधानीतच ठाणबंद होऊन पडला होता. जनरल गुडेरिन याने या वेळी त्याची अवस्था कशी होती,

याचे वर्णन करून ठेवले आहे–

"His fists raised, his cheeks flushed with rage, his whole body trembling, the man stood there in front of me, beside himself with fury & having lost all self control. He was almost screaming, his eyes seem to pop out of his head & the veins stood out in his temple...."

[ मुठी उगारलेल्या आहेत, रागाने चेहरा लालबुंद झाला आहे, सर्वांग थरथर कापत आहे, असा फ्यूरर माझेसमोर उभा आहे. क्रोधाने तो उभा जळत आहे. त्याचा स्वतःवरचा ताबा गेलेला आहे. जवळजवळ किंचाळल्यासारखा तो बोलत होता. त्याचे डोळे मस्तकाबाहेर आलेले आहेत असा भास होत होता व त्याच्या कपाळावरच्या सर्व नसा तटाटलेल्या होत्या– ]

फ्यूररची अशी अवस्था होणे यात नवलाची गोष्ट काहीच नव्हती. जगात जेता म्हणून उभा राहण्याची कल्पना आता विरून गेली होती. युद्ध चालवण्याचा सतत ताण, चौफेर होणाऱ्या पराभवांचे मानसिक धक्के व जमिनीखालील बंकरमधील चोवीस तास निवास, यांमुळे मनाप्रमाणे शरीरानेही फ्यूरर आता कोसळत आला होता.

२० जुलैला वधाचा प्रयत्न झाल्यापासून हिटलरचा जवळच्या अनेक माणसांवरील विश्वास उडाला होता. गेस्टॅपोप्रमुख हेनरिच हिमलर याला सेनानी करून त्याने २० एप्रिलनंतर पश्चिम आघाडीवर पाठवले. राईश मार्शल गोअरिंगही २० एप्रिल-नंतर बर्चेसगाडनकडे निघून गेला. फक्त गोबेल्स फ्यूररपाशीच बायकामुलांसह अखेरपर्यंत राहिला.

### इव्हा ब्राऊचे आगमन

बंकरमधल्या त्या काळरात्रींत, फ्यूररला कार्लाईलने लिहिलेला– 'फ्रेडरिक दी ग्रेट' चा इतिहास तो वाचून दाखवीत असे. गोबेल्स हा बोलून चालून प्रचारमंत्री होता. त्याच्या ठिकाणी नाटच भरपूर होते. वाचताना तो इतिहासाची ही सुवर्णपाने मोठ्या परिणामकारक रीतीने वाची व हा इतिहास ऐकता ऐकता फ्यूररचे डोळे पुनःपुन्हा भरून येत.

३० नोव्हेंबर १९३३ ला फ्यूररने जेव्हा अधिकारग्रहण केले, तेव्हा त्याची कुंडली गोबेल्सने तयार करून घेतली होती. त्यात दिलेले भविष्य तंतोतंत खरे ठरत होते. दुर्दैव इतकेच की, भविष्य फक्त अर्धेच खरे ठरले ! १९४५ चा एप्रिल महिना फ्यूररला वाईट दिला होता व तो तसाच जातही होता – परंतु १९४८ सालापर्यंत त्याचा भाग्यरवि पुनः शुभस्थानात निश्चित जाईल, हे पुढचे भविष्य मात्र कधीही खरे ठरले नाही !

काय घडेल व फ्यूररला पुनः भाग्याचे दिवस येतील हे गोबेल्सला समजू शकत

नव्हते–

परंतु १३ एप्रिलला, अध्यक्ष रुझवेल्ट दिवंगत झाल्याचे वृत्त येताच, त्याने आपल्या निवासातून फ्यूररला फोन केला–

" My Fuehrer, I congratulate you ! Roosevelt is dead ! It is the turning point... "

[ फ्यूरर– अभिनंदन ! रुझवेल्ट निधन पावले. आता चक्र उलट फिरणार. ]

गोबेल्सचा हा फोन ऐकताना हिटलरची काय प्रतिक्रिया झाली ती नमूद नाही– परंतु, ज्या अर्थी १५ एप्रिलला फ्यूररने– आपल्या आयुष्यभराच्या प्रेयसीला–इव्हा ब्राउला–बर्लिनला बोलावून घेतले, त्या अर्थी गोबेल्सच्या बडबडीला त्याने फारशी किंमत दिली नसावी हे उघड आहे. भविष्य वाचण्यावर त्याचा विश्वास नव्हता– घडवण्यावर होता आणि ही संधी आता गेली आहे याचे भान त्याला याच सुमारास आले असल्याची ही खूण आहे.

जवळ जवळ १२ वर्षे हिटलरचा इव्हा ब्राउशी संबंध होता. लग्नाच्या नात्याने ती दोघे राहात असावीत. परंतु हिटलरने तिला कधीही प्रसिद्धीच्या झोतात येऊ दिलेले नव्हते. युद्ध छावणीत तिला त्याने कधी नाचवली नव्हती – इतकेच नव्हते तर बर्लिनमध्ये ती क्वचितच कधी आलेली होती.

इव्हा ब्राऊ कशी होती याचे वर्णन न्यूरेंबर्ग खटल्यात फील्ड मार्शल कायटेल याने केले आहे–

" She was very slender, elegant appearance, quite nice legs–very very nice person, dark blond. One saw her very rarely. "

[ शेलाटच्या यष्टीची, नीटस चेहऱ्याची व सुंदर बांध्याची अशी ही इव्हा ब्राऊ फारच उत्तम स्वभावाची होती. काळसर वर्णाची ही पुरंध्री सहसा नजरेस क्वचितच पडत असे– ]

बारा वर्षांपूर्वी म्युनिच येथील एका फोटोग्राफरच्या दुकानात नोकरी करणाऱ्या, मध्यमवर्गीय कुटुंबातल्या या इव्हाचा फ्यूररशी परिचय झाला. याच घटनेपूर्वी काही दिवस, हिटलरच्या संबंधात आलेली गेली रूबल हिने आत्महत्या केलेली होती. यामुळे तिची जागा इव्हाला सहज मिळू शकली.

डॉ. गोबेल्स व फ्राऊ गोबेल्सप्रमाणेच, ज्या जगात हिटलर जिवंत नाही, त्या जगात जिवंत राहण्याची इव्हा ब्राउची तयारी नव्हती. त्याच्याबरोबर मरण्यासाठीच ती बर्लिनला आली होती. इव्हा ब्राऊ ही कुणी बुद्धिवादी प्रेयसी नव्हती. कदाचित् म्हणूनच तिच्या सहवासात फ्यूरर इतकी वर्षे निष्ठेने रमू शकला असेल ! ते कसेही असले तरी फ्यूररवर तिचे निष्ठावंत प्रेम होते व मरणापूर्वी फ्यूररची पत्नी या नात्याने मरावे एवढाच तिचा आग्रह होता.

२० एप्रिल १९४५ ला हिटलरचा ५६ वा वाढदिवस बंकरमध्ये ( जमिनी-



मृत्यूच्या छायेत...... इव्हा ब्राऊ व फ्यूरर

खालील निवासस्थान) साजरा झाला. गोअरिंग, गोबेल्स, हिमलर, रिबेन्ट्रॉप, बोरमन हे नाझी नेते व डोएनिट्झ्, कायटेल, जोड्ल व क्रेबस् हे सेनादल प्रमुख या वेळी तिथे होते. वाढदिवसाचे अभीष्टचिंतन संपताच या साऱ्यांनी फ्यूररला आग्रह केला की, अजून त्याने दक्षिण जर्मनीत निसटावे. मात्र फ्यूररला ही गोष्ट सहन होत नव्हती, की बर्लिन सोडून आपण निसटावे. रशियनांच्या हाती बर्लिन पडणार ! ! ज्यांच्या सेना बरबाद झाल्याची घोषणा काही वर्षांपूर्वी त्यानेच केली होती, त्यांचेच निशाण बर्लिनमध्ये फडफडणार ! ! ! फ्यूरर एकाच चिंतेत आता होता– बर्लिन कसे वाचणार ? अॅड्मिरल डोएनिटझ् व फील्ड मार्शल केसरलिंग यांनी नवी चढाई सुरू करावी, असे आज्ञापत्रक त्याने काढले. अॅड्मिरल डोएनिटझ् तिथे होता; परंतु केसरलिंग कोणत्या अवस्थेत आहे हे कुणालाच माहीत नव्हते.

## हिमलर–गोअरिंगचा 'देशद्रोह'

त्याच दिवशी हिमलर व गोअरिंग यांनी बर्लिन सोडले. दोघे विरुद्ध दिशांना गेले. गोअरिंग बर्चेसगार्डनला गेला. याचा अर्थ हिटलर २० एप्रिललाही दक्षिण जर्मनीत निसटू शकत होता !, परंतु त्याने ते केले नाही.

२१ एप्रिलला जनरल स्टायनर याला बर्लिनमधील उरल्यासुरल्या सैन्यानिशी रशियनांवर तुटून पडण्याचा आदेश फ्यूररने सोडला.

२२ एप्रिलचा दिवस हिटलर बंकरमध्ये जनरल स्टायनेरच्या चढाईच्या बातमीची

वाट पाहात होता; परंतु ही चढाई केवळ फ्यूररच्या कल्पनेतच आता आकार घेत होती.

प्रत्यक्षात २२ एप्रिललाच बर्लिनच्या उपनगरात रशियन सैन्य शिरल्याचे वृत्त फ्यूररला मिळाले.

बंकरमध्ये आता कायटेल, जोड्ल, डोएनिटझ् व गोबेल्स उरले होते. या साऱ्यांनी पुन: हिटलरची मनधरणी केली की, झेकोस्लोव्हाकियात अजून केसरलिंग लढतो आहे. त्याच्या बाजूला फ्यूररने निसटावे. फ्यूररने सर्वांना नकार दिला व बर्लिनमध्येच राहण्याचा निर्धार जाहीर केला. कायटेल व जोड्ल यांना त्याने दक्षिणेकडे जाऊन केसरलिंगला मिळण्यास सांगितले. गोअरिंग आधीच त्या दिशेने गेलेला होता. या दोघांना जाताना हिटलरने बजावले–

" शांततेसाठी वाटाघाटी करण्याची वेळ येईल, तेव्हा या वाटाघाटी करण्यात माझ्यापेक्षा गोअरिंग अधिक लायक आहे, त्याला जास्तीत जास्त फायदेशीर सौदा करणे जमेल– "

२३ एप्रिलला एका फायटर विमानातून जोड्ल व अॅड्मिरल डोएनिटझ् हे दक्षिणेकडे निसटले.

या दोघांना जाताना हिटलरने जे सांगितले, त्यावरून शरणागतीचा प्रसंग येईल, तेव्हा आपण जिवंत राहणार नाही, ही गोष्ट त्याने सुचविलेली होती. यावरून आत्मघाताचा विचार २३ एप्रिलच्या रात्रीपासून त्याने पक्का केला असावा, असे दिसते.

२३ एप्रिलला सायंकाळी गोअरिंगची तार फ्यूररला मिळाली ती अशी होती–

" फ्यूरर,

बर्लिनमध्ये राहण्याचे आपण ठरविलेले आहे, यावरून राईशचे नेतृत्व आता मी माझ्याकडे घ्यावे याला आपली संमती आहे असे समजू काय ? तुमचा प्रतिनिधी म्हणून राईशचे नेतृत्व करताना मला संपूर्ण कृतिस्वातंत्र्य राहील; कारण तसे आपल्या २९ जून १९४१ च्या डिक्रीत सांगितलेले आहे. जर १० वाजेपर्यंत तुमचे प्रत्युत्तर आले नाही, तर तुम्हांला आता कृतिस्वातंत्र्य राहिलेले नाही, असे समजून आपल्या देशाच्या हिताच्या दृष्टीने व जनतेच्या हिताच्या दृष्टीने योग्य ते मी करीन. या घोर परिस्थितीत मला तुमच्याविषयी काय वाटत आहे, हे तुम्ही जाणताच. मला शब्दांत ते व्यक्त करता येत नाही, परमेश्वर तुमचे रक्षण करो. तुम्ही लवकरच इकडे याल अशी आशा आहे.

आपला विश्वासू

गोअरिंग. "

याच दिवशी सायंकाळी शेकडो मैल अंतरावर, हिमलर हा बाल्टिकमधील लुबेक बंदरात – स्वीडिश वकिलातीत काऊंट बर्नाडोटमार्फत जनरल आयसेन हॉवर यांना

संदेश पाठवत होता –

" फ्यूररचे महान् आयुष्य आता हळूहळू संपत आलेले आहे, एक-दोन दिवसांत तो या जगातून निघून गेलेला असेल. पश्चिम आघाडीवर आम्ही शरणागती देण्यास तयार आहोत असे आयसेन हॉवर यांना कळवा – "

फ्यूररची अशी अपेक्षा होती की, बर्लिन पडले व आपण नष्ट झालो, तरी हिमलर व गोअरिंग ही लढाई त्यांची अखेर येईपर्यंत चालूच ठेवतील. हिमलर शरणागतीच्या प्रयत्नात गुंतला आहे, ही गोष्ट या वेळी त्याला कळलेली नव्हती; परंतु गोअरिंगची तार तर बोलकीच होती. शरणागतीच्या वाटाघाटी गोअरिंगने कराव्या असे त्याने म्हटले होते – परंतु, त्याने त्या करू नयेत अशीच त्याची मनोमन इच्छा होती. गोअरिंगची तार प्रथम हिटलरचा खाजगी चिटणीस मार्टिन बोरमन याचेच हाती पडली. बोरमनचे व गोअरिंगचे सख्य नव्हते. ही तार म्हणजे गोअरिंगचा काटा काढण्याची संधी आहे, ही गोष्ट हेरून त्याने हिटलरला तार हाती देताना ' हा देशद्रोह आहे ' ही गोष्ट कटाक्षाने सांगितली.

परिस्थिती अशी होती की, बर्लिनबाहेर काय घडले आहे ते फ्यूररला कळत नव्हते. मात्र सत्ता हाती येताच गोअरिंग शरणागती देतो म्हणतो, या विचाराने फ्यूरर निराशेने काळाठिक्कर पडला. ज्याच्यावर त्याचा विश्वास, त्याने ही शरणागतीची भाषा काढावी ! यामुळे तो उद्विग्न झाला व त्याने उलट गोअरिंगला तार पाठवली –

" You have committed high treason for which the penalty is death...but your life will be spared if you immediately resign all offices. Answer with one word– ' yes ' or ' no '. "

[ तुम्ही देशद्रोह केला आहे. याला मृत्युदंड हीच शिक्षा आहे. परंतु जर ताबडतोब तुम्ही सर्व अधिकारपदे सोडली तर तुम्हांला अभय मिळेल. एका शब्दात उत्तर पाठवा – ' होय ' की ' नाही ' ... ]

हे सर्व वाचीत असताना संभ्रम पडतो की फ्यूरर स्वतःच जिथे कोंडला गेला, तो लष्करी बंकर होता की वेड्यांचे इस्पितळ ! बाकी कुठल्याही सद्‌गुणाचा अतिरेक हा माणसाला वेडाचारीच करतो म्हणा ! बर्लिनच्या उपनगरात लाल सैन्य शिरले असताना – फ्यूरर या कसल्या मृत्युदंडाच्या शिक्षा फर्मावीत होता ? बोरमन आपले वैमनस्य ते काय साधीत होता ?

या बुद्धिभ्रंशाच्या सोबतीला, आणखी दोन व्यक्ती येऊन दाखल झाल्या होत्या. म्युनिचहून जनरल ग्रिम व त्याला आणणाऱ्या विमानाची स्त्री-वैमानिक हन्ना रित्श अशी दोघे २६ एप्रिलला बर्लिनमध्ये दाखल झाली. फ्यूररने तार देऊन जनरल ग्रिमला बोलावले होते. हन्ना रित्श हिने विमान बर्लिनपर्यंत आणले, परंतु तत्पूर्वी रशियन विमानविरोधी गोळ्यांच्या भडिमाराने विमानाचा पृष्ठभाग पिंजला गेला

होता व त्यातली एक गोळी पायांत शिरून जनरल ग्रिमचा पाय छिन्नविच्छिन्न झाला होता.

जनरल ग्रिमच्या पायावर उपचार चालू असताना फ्यूरर तिथे आला. त्या वेळी झालेले संभाषण कागदपत्रांत उपलब्ध आहे.

**हिटलर**— मी का बोलावले, हे समजलं काय ?

**ग्रिम**— नाही –

**हिटलर**— कारण, हर्मन गोअरिंगने देशाशी व माझ्याशी हरामखोरी केली आहे. त्याने शत्रूशी संपर्क साधला आहे. आणि याचसाठी तुला बोलावले आहे. यापुढे लुप्तवाफचे नेतृत्व तुला करावयाचे आहे ! जनरल ग्रिमला आता या क्षणी अंगावर चढणाऱ्या या नव्या गणवेशाचा अर्थच कळेना. रशियनांनी वेढलेल्या बर्लिनमधील एका तळघरात, पाय छिन्नविच्छिन्न झालेल्या अवस्थेत गोअरिंगची जागा कागदोपत्री त्याने घ्यायची, म्हणजे करायचे काय ? आणि ज्या विमानदलाचे नेतृत्व त्याचेकडे आले होते ते लुप्तवाफ असे कितीसे शिल्लक होते ? रित्श हिच्याशी बोलताना हिटलरने तिला सांगितले –

" I do not wish that one of us falls to the Russians alive. Nor do I wish our bodies to be found by them. Eva & I will have our bodies burned. You will decide your own method."

[ आमच्यापैकी कुणीही रशियनांच्या हाती जिवंत लागावे, अशी माझी इच्छा नाही. इतकेच नव्हे तर आमचे मृत देहही त्यांना सापडता कामा नयेत. इव्हा व मी आमचे मृतदेह जाळून टाकण्याची व्यवस्था करू. तुम्ही तुमच्या बाबतीत काय ते ठरवा. ]

२७ एप्रिल संपली. रशियन तोफगोळे आता चॅन्सेलरीच्या आसपास येऊ लागले होते. इमारती कोसळण्याचे आवाज अधून मधून बंकरमध्ये घुमत होते. २८ एप्रिल उजाडला –

फ्यूररचे बाहेरच्या जगाशी सर्व दळणवळण आता तुटले होते. परंतु, आरमार-दलातील एक ट्रॅन्समिटर चालू होता. त्याने बी. बी. सी. वर सांगितली गेलेली बातमी टिपली – " हिमलर याने काउंट बर्नाडोटमार्फत शरणागतीची इच्छा आयसेन हॉवर यांचेकडे प्रदर्शित केली आहे. "

ही बातमी घेऊन आरमारदलाचा एक अधिकारी रशियन तोफगोळे चुकवीत बंकरमध्ये आला.

रित्श हिने लिहून ठेवले आहे –

" फ्यूररचा चेहरा ओळखू येऊ नये इतका बदलला. तो उद्‌गारला – ' असल्या देशद्रोही माणसांनी माझ्या अधिकारावर कधीच येता कामा नये ...... ' मग तो एकदम स्तब्ध झाला व बंकरमध्ये भीषण शांतता पसरली. "

बंकरमध्ये आलेल्या शहरातील बातम्यांवरून ही गोष्ट स्पष्ट झाली, की बर्लिन निकराने लढत असले तरी ३० एप्रिलला रशियन पहाटेपर्यंत चॅन्सेलरीत शिरतील ! आता फक्त ३० च तास उरले होते.

## मृत्यूच्या साक्षीने पार पडलेला विवाह

हिटलरने ठरवले आपले आयुष्य फार तर ३० च तास ! इव्हा ब्राऊला त्याने वचन दिले होते की, तुला माझेबरोबर मरण येईल ते माझी पत्नी म्हणूनच. २९ एप्रिलला अपरात्री १ ते ३ च्या दरम्यान हा विलक्षण विवाहसमारंभ उरकण्यात आला.

बर्लिनच्या रस्त्यारस्त्यांत या वेळी रणकंदन सुरू होते. यांतच लढणारा एक बर्लिनचा नगरपालिका सभासद वॉल्टर वॅगनर याला या समारंभाकरिता घाई-घाईने आणण्यात आले.

बंकरच्या ज्या खोलीत बैठका होत असत, तिथे हा विवाहसमारंभ सुरू झाला. विवाहाचे कागदपत्र आजही उपलब्ध आहेत. शिवाय तिथे हजर असलेल्या फ्यूर-रच्या एका चिटणीसाने या विवाहाचे वर्णन केले आहे. या विवाहाला त्याने ‘Death Marriage’ – “मृत्यूच्या साक्षीने होणारा विवाह’ असें यथार्थतेने म्हटले आहे.

हिटलरने व इव्हा ब्राऊने शपथ घेतली —

“आम्ही आर्यवंशीय असून कसल्याही आनुवंशिक रोगापासून मुक्त आहोत.”

फ्यूररने या कागदावर सही करताना मात्र आपल्या आईवडिलांचे नाव लिहिण्याकरता ठेवलेली जागा कोरीच ठेवलेली आहे. वधूने सही केली ‘Eva Braun’ – मग तिने ‘Braun’ या शब्दावर काट मारून लिहिले– ‘Eva Hitlar’

गोबेल्स व बोरमन या दोघांनी साक्षीदार म्हणून सह्या केल्या आहेत. विवाह-समारंभ संपल्यानंतर विवाहनिमित्त भोजनसमारंभ झाला. बंकरमध्ये असलेल्या सर्वांना–यांत हिटलरचा शाकाहारी स्वयंपाकी होता–जेवणासाठी बसवण्यात आले होते. हिटलर स्वतः मांसाहार व मद्यपान करीत नसे; परंतु या वेळी त्याने तेथे हजर असलेल्यांना शँपेन पिण्यास सांगितले. क्रेवस् व वर्कडॉर्फ हे दोघे जनरल्स, मार्टिन बोरमन, डॉ. गोबेल्स व फ्राऊ गोबेल्स हीच काय ती प्रमुख मंडळी त्यांत होती. भोजन चालू असताना आपण गोबेल्सच्या लग्नात प्रमुख भाग घेतला होता, याची आठवण सांगून हिटलरने वातावरण काहीसे हलके फुलके केले.

बर्लिनच्या रस्त्यारस्त्यांतून रशियन सैन्याशी बंकरबाहेर जर्मन सैन्य लढत होते. वधूवरांनी विवाहानंतर काही तासांतच आपली जीवनयात्रा संपवण्याचा निश्चय केला होता. डॉ. गोबेल्स, फ्राऊ गोबेल्स, व त्यांची सहा मुले यांचेही आत्मघाताचे निश्चित ठरले होते. बाकीच्यांना बंकरबाहेर मृत्यू कधी गाठेल याचा नेम नव्हता–

मृत्यूच्या दाट छायेत असा विलक्षण विवाहसमारंभ यापूर्वी कधी झाला नसेल व यापुढे होणार नाही. जसे फ्यूररचे सगळे आयुष्यच विलक्षण होते, त्याला साजेसाच त्याचा विवाह होत होता व मृत्यू निश्चित झाला होता.

आपल्या आत्मघाताची सूचना फ्यूररने जेवताना सर्वांना दिली. तो उद्गारला–

" माझे आयुष्य आता संपत आले आहे व राष्ट्रवादी समाजसत्तावादाचा शेवटही माझ्याबरोबरच होईल. मृत्यू हा मला आता एक प्रकारचा दिलासाच आहे. कारण जुन्यात जुन्या मित्रांनी व अनुयायांनी मला सोडून जाऊन धोका दिला आहे."

फ्यूरर या विषयावर बोलू लागताच हजर असलेल्या सर्व मंडळीत निराशेची भयानक शांतता पसरली. प्रत्येकाचे डोळे पाणावू लागले. ज्यांना रडणे आवरता येत नव्हते, ते हळूहळू खुर्च्यांवरून उठून दूर जाऊन रडू लागले.

जेवण आटोपले. फ्राऊ जुंग या आपल्या लेखनिकेला आपल्या खाजगी खोलीत बोलावून यानंतर हिटलरने आपले मृत्युपत्र व अखेरचे हृद्गत – Last Testament– तोंडी सांगण्यास सुरुवात केली.

चौफेर पराभव होऊ लागले. राज्ययंत्रणा कोसळू लागली की, लष्करी नेते परागंदा होतात वा मारले जातात. परंतु हिटलर हा एकच क्रांतिकारक नेता असा होता की, त्याने आत्मघात पत्करीपर्यंत त्याचा सर्वांवर संपूर्ण ताबा होता–जे दूर गेलेले होते त्यांची समजूत फ्यूरर मेलेला आहे अशी होती. पण त्यांच्याही मनांत, तो जिवंत असेपर्यंत काहीही करण्याचे नव्हते. जे जवळ राहिले होते, त्यांपैकी अगदी निकटचा असा डॉ. गोबेल्स होता. फ्यूरर ज्या जगात नाही त्या जगात न राहण्याचे त्याने ठरवले होते. मात्र याची कुणकुणही त्याने फ्यूररला लागू दिली नव्हती.

### सूडभावनेची तृप्ती

फ्यूररवर ही माणसे व सर्वसामान्य जनता असे आंधळे प्रेम का करीत राहिली? तो केवळ कर्तबगार होता म्हणून ? जर्मन राष्ट्रवादाला त्याने अशी फुंकर घातली की, जग स्तिमित झाले. त्याने कवटाळलेला ' ज्यू-द्वेष ' ज्यूंविरुद्ध झालेली अत्यंत अमानुष व विकृत अशी प्रतिक्रिया होती हे खरे! पण इंग्लिशांच्या साम्राज्याला त्याने आव्हान दिले व साम्राज्य खिळखिळे केले यात संदेह नाही. स्टॅलिनवर मात करून त्याने रशियन अस्वलाच्या नाकात अचूक वेसण घालून, आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीच्या बुरख्यात दडलेला नागडा राष्ट्रवाद उघडा पाडला–जर्मनीवर अखंड बारा वर्षे व जवळ जवळ सर्व युरोपभर चार वर्षे त्याने अनियंत्रित सत्ता निर्माण केली आणि जेव्हा डाव उलटला, तेव्हा सर्व जर्मन देश दुःखाच्या व विनाशाच्या खाईत लोटला जाऊनही–फ्यूररविषयी आदर असणारी, त्याच्यावर जिवापलीकडे प्रेम करणारी व त्याच्याकरता बंकरभोवती रक्ताचे सडे घालणारी माणसे या क्षणीही त्याच्याभोवती कशी शिल्लक उरली ?

याला उत्तर देणे सोपे नाही. परंतु यातले एक कारण निश्चितच हे होते की,

१९१८ साली झालेल्या अपमानाचा सूड घेतल्याचे समाधान हा पराभव पाहिलेल्या जर्मन पिढीलाच, हिटलरने मिळवून दिले होते. सूडाचे समाधान खरोखरच इतके मौल्यवान आहे का, की ज्या करता जगाला दु:खाच्या खाईत लोटावे ? युद्धासारखी भयानक गोष्ट सुरू करावी ? लाखो निष्पापांना कंठस्नाने घडावी ? देश बेचिराख करावा ?

एकदा चर्चिल यांचे घरी भोजनप्रसंगी ते अधिकारावर नसताना चेंबर्लेनच्या परराष्ट्रीय धोरणाची चर्चा सुरू झाली. चर्चिल यांना उपस्थितांपैकी एकाने सांगितले–"युद्ध भयानक असते—

" War is worse. "

चर्चिल आपले यजमानपद विसरले व खवळून म्हणाले–" Dishonour is worse than war—देशाची बेइज्जत ही युद्धापेक्षा भयानक असते–"

चर्चिल यांनीच फ्यूररच्या लोकप्रियतेवर अचूक बोट ठेवले होते. ही युद्धापेक्षा भयानक बेइज्जत–१९१८ साली फ्यूररने अनुभवली होती.

ब्रिटिशांनी केलेल्या विषारी वायुहल्ल्याने तात्पुरते अंधत्व येऊन १९१८ मध्ये तो 'य प्रेस' या ठिकाणी रुग्णालयात पडलेला असताना १० नोव्हेंबरला सायंकाळी जेव्हा एका पाद्र्याने धावत येऊन सांगितले की, " जर्मनीने शरणागती दिली–" –तेव्हा तो संपूर्ण वृत्तांत त्याला ऐकवेना. या वेळी त्याची झालेली मानसिक अवस्था विस्ताराने मी पहिल्या ('माणूस' जून १९६४) लेखांकात दिलेली आहे. आयुष्यात हा माणूस फक्त दोनदा रडला–आई गेली तेव्हा आणि १० नोव्हेंबर १९१८ ला त्या सायंकाळी ! देशाची बेइज्जत ही युद्धापेक्षा भयंकर असतेच–पण त्यासाठी देशावर तितक्या उत्कटतेने प्रेम तर करता यायला हवे ! ! असे एक अंत:करण फ्यूररपाशी निश्चित होते. १९१८ चा लांच्छनास्पद पराभव व व्हर्सायचा तह त्याने आपल्या हयातीत पायदळी तुडवला व तहाचे तुकडे केले. हा सूडाचा आनंद जर्मन जनतेला व त्या पिढीला फ्यूररने मिळवून दिला. म्हणूनच पुन: त्याच अवस्थेत जर्मनीला लोटूनही फ्यूररवरची तिची भक्ती अखेरपर्यंत टिकून राहिली यात शंका नाही !

देशावर प्रेम करणाऱ्या माणसांना सूडाची भूक असते. आपल्या देशाचे व देशातील राष्ट्रवादी जनतेचे स्वत्वहरण करणाऱ्या माणसांच्या नरडीचे घोट घेण्याची इच्छा त्यांच्या मनातून हलत नाही–या भुकेची जो कदर करील, ही गरज ओळखून जे नेतृत्व वागेल ते जनतेच्या गळ्यातील ताईत झाल्याशिवाय राहात नाही. मग हिटलरच याला अपवाद कसा ठरावा? शिवाय, दुसरीही एक बाजू आहे. युद्धकालातील चार वर्षांत नाझी नेत्यांनी वंशवादाच्या अमानुष तत्त्वज्ञानापायी असंख्य माणसे मारली. पण या गोष्टीची माहिती सर्वसामान्य जर्मन जनतेला युद्धकालात कशी होणार ?

म्हणूनच हिटलरने अखेरचे हृद्‌गत म्हणून जे काही मागे ठेवले आहे, त्याची दखल घेणे जरूर आहे. हिटलरच्या मानसिक शक्ती विलक्षण होत्या, ही गोष्ट नाकारणे कठीण आहे. काही सामाजिक व आर्थिक कारणांमुळे नेतृत्वाच्या लाटेवर फेकला गेलेला तो एक आततायी माणूस होता, असे सांगून विल्हेवाट लावणे सर्वस्वी चूक होईल. जगाच्या इतिहासात–एकाच आयुष्यात कायम स्वरूपाची अपूर्व उलथापालथ करण्यासाठी आपला जन्म होता, ही फ्यूररची स्वत:विषयीचीच कल्पना हास्यास्पद असली तरी जगाच्या इतिहासात कुणी घडविली नव्हती, एवढी उलथापालथ त्याने घडविली हा इतिहास आहे. जगाच्या इतिहासात निर्माण झालेला हा एक भस्मासुर असेल, परंतु दुर्लक्ष न करता येण्याएवढ्या महत्त्वाचा भस्मासुर तो ठरला आहे खरा !

## हिटलरची मनोगते

नाझी क्रांतीच्या आयुष्यात, तीन वेळा हिटलरची मनोगते प्रसिद्ध झाली आहेत. १९३९ साली 'हिटलरची मनोगते' (Hitler's table talks) या नावाने एक पुस्तक प्रसिद्ध झाले. या पुस्तकाच्या खरेपणाविषयी शंका होती. कारण अधिकृत-रीत्या या मनोगताची जबाबदारी हिटलरने स्वीकारलेली नव्हती. त्या वेळचे ब्रि. पंतप्रधान यांनी या पुस्तकातील एक अक्षरही विश्वास ठेवण्यासारखे नाही असे सांगून त्याची बोळवण केली. हिटलरने आपल्या आत्मचरित्रात (माईन काम्फ) जी मते व सिद्धांत दिले होते, तेच या पुस्तकात अधिक विस्तारपूर्वक मांडलेले होते. १९४१ सालापर्यंत हिटलरने या मनोगतात दिलेली ओळन् ओळ खरी करून दाखविली.

१९४१–४२ या कालात मार्टिन बोरमन याने 'हिटलरची मनोगते' पुन: एकदा संपादित केली. ही सर्व मनोगते त्याचे सर्व हेतू जवळजवळ सफल झाल्यानंतरची आहेत. युद्ध समाप्तीनंतर १९५३ साली ही इंग्लंडमध्ये प्रसिद्ध झाली. मार्टिन बोरमन यानेच ही स्वत: संपादिलेली असल्याने याच्या खरेखोटेपणाविषयी शंकाच उरलेली नाही. जर जर्मनीचा विजय झाला असता तर या मनोगतांना आज फारच महत्त्व आले असते.

परंतु १९४५ साली हिटलरचे दैव पुरते फिरलेले होते. काहीतरी अघटित घडेल–चर्चिलच अचानक नाहीसा होईल–स्टॅलिनच देशातील घातपाताला बळी पडेल–असे काहीतरी होऊन हा पराभव टळेल, अशी आशा हिटलरला सुरुवातीला वाटत होती, ती जानेवारी १९४५ अखेर तर पुरती मावळत चालली होती. आता पराभव अटळ आहे, त्या पराभवाची कारणमीमांसा करावी. कुठे चुकले, काय चुकले हे पुढल्या पिढीला कळावे व पुढल्या पिढीला मार्गदर्शक असे काही लिखित ठेवावे या ईर्ष्येने फ्यूररने ४ फेब्रुवारी १९४५ ते २ एप्रिल १९४५ या कालात आपली विचारसरणी ग्रंथित करण्याची कामगिरी बोरमनवर सोपवली. वस्तुत:, २६ फेब्रुवारीलाच हे काम

त्याने संपवले. २ एप्रिलला एक अखेरचे मनोगत यात समाविष्ट करून हे सर्व कागद बोरमनच्या हवाली करून त्यांच्या सुरक्षिततेसंबंधी सूचना दिल्या.

२२ एप्रिलला हिटलरच्या ' बंकर 'मधून ज्यांना निसटावयाचे असेल त्यांना निघून जाण्याची मुभा देण्यात आली. ज्या माणसाबरोबर हे कागदपत्र ' बंकर '-बाहेर आले, त्याने हे कागद एका बँकेच्या डिपॉझिट व्हॉल्टमध्ये ट्रंकेत ठेवले. परंतु हाच माणूस पकडला गेला. युद्धगुन्हेगार (War Criminal) म्हणून होणाऱ्या चौकशीत या कागदांमुळे मृत्यू ओढवेल, या भीतीने या माणसाने आपल्या वकिली व्यवसायातील मित्राला तुरुंगाबाहेर अधिकारपत्र धाडून हे सर्व कागद ताब्यात घेऊन नष्ट करण्यास सांगितले.

या वकील महाशयांनी हे सर्व महत्त्वाचे कागद बँकेकडून काढून घरी आणले. परंतु ते काय आहेत, ते वाचताना त्याची खात्री झाली की, या कागदांचा नाश करणे योग्य नाही. तेव्हा त्याने वकिली डोके चालवले. या सर्व कागदपत्रांच्या फोटोप्रती (Photostat Copies) त्याने तयार केल्या व मूळ कागदपत्र नष्ट करून टाकले. या फोटो प्रतींत मार्टिन बोरमनची संपादनाबद्दल केलेली स्वाक्षरी स्पष्ट दिसते व या कागदपत्रांच्या खरेपणाविषयी मुळीच संशय नाही.

' The testament of Adolf Hitler–The Hitler–Borman documents' या नावाने हा तिसरा हप्ता १९६० नंतर प्रसिद्ध झाला आहे.

या तिसऱ्या हप्त्यात–हिटलरने १९ एप्रिलच्या मध्यरात्री सांगितलेले अखेरचे हृद्गत व त्याचे मृत्युपत्र या गोष्टी मिळविल्या की हिटलरने स्वत: लिहून ठेवलेल्या मनोगतांचा सर्व हिशेब संपतो. या व्यतिरिक्त त्याने युद्धकालात काहीही लिहून ठेवलेले नाही.

हिटलरच्या या पराभवाची मीमांसा करणाऱ्या मनोगतांचा साकल्याने विचार या निवेदनाच्या अखेरीस करू. कारण त्यात जसा काही सत्यांश आहे त्याचप्रमाणे बरीच धूळफेकही आहे.

## अखेरचे हृद्गत

२९ एप्रिलला अपरात्री–मरणापूर्वीच्या आपल्या निवेदनात हिटलर लिहितो–

" I shall not fall in the hands of the enemy. I have decided to remain in Berlin & there to choose death voluntarily at that moment when I believe that the position of the Fuehrer & the Chancellery itself can no longer be maintained. I die with joyfull heart in my knowledge of the immeasurable deeds & achievements of our peasants & workers & of a contribution unique in history of our youth which bear my name. The seed that has been sown will grow one day to the glorious rebirth of the National

Socialist movement of a truly United Nation.

" Before my death, I expel former Reich Marshal Herman Goering & withdraw all the rights conferred on him by the decree of 20 June 1941. In his place I appoint Admiral Doenitz as President of the Reich & supreme commander of the Armed forces. Before my death, I also expel the Minister of Interior Heinrich Himmlar from the party & from all his state offices–"

[ शत्रूच्या हाती मी पडणार नाही. मी यासाठी बर्लिनमध्येच राहण्याचे ठरवले आहे. ज्या क्षणी फ्यूरर पद व चॅन्सेलरी यांचेच अस्तित्व आता टिकू शकत नाही अशी माझी खात्री होईल, त्याच क्षणी मी स्वतः मृत्यू पत्करीन. मरताना मी संपूर्ण समाधानी अंतःकरणाने जात आहे. कारण आपल्या शेतकऱ्यांनी व कामगारांनी केलेली अतुलनीय शौर्यकृत्ये मी पाहिली आहेत व ज्या तरुण पिढीला माझे नाव मिळालेले आहे, त्या तरुणांनी केलेल्या अभूतपूर्व त्यागाची जाणीव आहे. बी पेरले गेले आहे. यातूनच पुढे वाढ होईल. नॅशनल सोशालिस्ट चळवळीवर अधिष्ठित अशा एकसंघ जर्मन राष्ट्राचे वैभवशाली पुनरुत्थान यातूनच घडेल.

" मरणापूर्वी मी अभूतपूर्व राईश मार्शल हर्मन गोअरिंग याची पक्षातून व अधिकारपदावरून हकालपट्टी करीत आहे. २० जून १९४१ च्या निवेदनाप्रमाणे त्याला दिलेले सर्व अधिकार काढून घेण्यात येत आहेत. त्याचे जागी राईशचा अध्यक्ष व सेनादलाचा सुप्रिम कमांडर म्हणून ॲड्मिरल डोएनिटझ् याची नेमणूक मी करीत आहे. मृत्यूपूर्वी मी अंतर्गत व्यवहार मंत्री हेनरिच हिमलर याचीही पक्षातून व सर्व अधिकारपदावरून हकालपट्टी करीत आहे. "

या वेळी पहाटेचे चार वाजले होते. २९ एप्रिल रविवार होता.–बोरमन–क्रेबस् व बर्गडॉर्फ यांना आत बोलावून, त्यांच्यादेखत हिटलरने वरील कागदांवर सही केली. साक्षीदार म्हणून या चौघांनी सह्या केल्या.

यानंतर हिटलरने आपले खाजगी मृत्युपत्र सांगण्यास सुरुवात केली. सुरुवातीला त्याने आपल्या विवाहाच्या निर्णयाविषयी खुलासा केला.

" Although during the years of struggle, I believed that I could not undertake the responsibility of marriage, now before the end of my life, I have decided to take as my wife the woman who after many years of true friendship, came to this city already almost besieged, of her own free will in order to share my fate.

" She will go to her death with me at her own wish as my wife. This will compensate us both for what we lost, through my work in the services of my people.

" My possessions in sofar as they are worth anything belong to the party or if this no longer exists to the State. If the State too is destroyed, then there is no need for any further instructions on my part. The paintings in the collections bought by me during the years were never assembled for private purposes but solely for the establishment of a picture gallery in my home town of the Linz on the Danube. "

[ विवाहाची जबाबदारी मी घेऊ शकत नाही अशी या सर्व लढयाच्या कालात माझी जरी खात्री पटलेली होती, तरी आता माझ्या जीवनाची अखेर होता होता, मी विवाह करण्याचे ठरवले आहे. मी त्या स्त्रीशी विवाहबद्ध होणार आहे, की जी अनेक वर्षे शुद्ध मैत्री बाळगून होती व शत्रूने वेढा दिलेल्या या शहरात ती स्वतः राजीखुषीने माझ्या भवितव्यात वाटेकरी व्हावे म्हणून इथे आलेली आहे.

तिच्या इच्छेनुसार, माझी पत्नी म्हणून माझ्याबरोबर, ती आपल्या मरणाला सामोरी जाईल. यामुळे माझ्या जनतेच्या सेवेत निमग्न झाल्याने जे काही आम्ही गमावले त्याची काहीशी भरपाई होणार आहे.

माझी मालमत्ता अशी फारशी काही नाहीच. जी थोडीफार आहे, ती सर्व पक्षाची आहे व पक्ष यानंतर अस्तित्वात नसेल तर देशाची आहे. जर उद्या देशाचाही ऱ्हास झाला तर या संबंधात मी अधिक काही सूचना देण्याची आवश्यकताच नाही. जी चित्रे मी खरेदी करून गेल्या काही वर्षांत जमवली आहेत, ती माझ्या वैयक्तिक उपयोगासाठी कधीच नव्हती. माझे डॅन्यूब नदीवरील लिझ् हे जे जन्मग्राम आहे तिथे एक चित्र-संग्रहालय करावे यासाठी ही चित्रे जमा केलेली आहेत. " ]

आपल्या या मृत्युपत्राचा अधीक्षक म्हणून बोरमन याला नेमल्याचे नमूद करून पुढे हिटलरने लिहिले आहे—

" My wife & I choose to die in order to escape the shame of overthrow or capitulation. It is our wish that our bodies be burned immediately in the place where I have performed the greater part of my daily work during the twelve years of service to my people..."

[ अधिकारभ्रष्ट होण्यात किंवा शरणागती देण्यात जी नामुष्की आहे, ती टाळण्यासाठी, माझ्या पत्नीने व मी मरण पत्करण्याचे ठरवले आहे. आमची अशी इच्छा आहे, की ज्या ठिकाणी मी गेल्या बारा वर्षांतील बहुतेक काल माझे लोकसेवेचे दैनंदिन काम केले, त्याच ठिकाणी आमच्या देहांचे ताबडतोब दहन करण्यात यावे. ]

अखेरचा निरोप घेण्यात आलेल्या मानसिक ताणामुळे या वेळी हिटलरला झोपेने ग्रासले. बाहेर पहाट फुटत चालली होती. बर्लिन शहरावर धुराचे लोट तरंगत होते.

इमारती ज्वालांत गुरफटून कोसळत होत्या. रशियन सैन्याने शहराचा कबजा करीत आणला होता. काही तासांतच लाल सैन्य चॅन्सेलरीत शिरणार होते.

हिटलर या परिस्थितीतही शांतपणे झोपू शकत होता. अतिमानसिक श्रमाने त्याची ही अवस्था झाली होती. गोबेल्स व बोरमन या दोघांनी 'बंकर'बाहेर पडावे, असे त्यांना हिटलरने सांगितले होते. बोरमन याला अजून जगावेसे वाटत होते. आता सत्ता–जी काय होती ती फ्यूररने डोएनिटझ्च्या हवाली केली होती. त्याला गाठण्याचे बोरमनने ठरवले.

## गोबेल्सचे मृत्युपत्र

परंतु डॉ. गोबेल्सला फ्यूरर नसलेल्या जगात राहण्याची इच्छा नव्हती. हिटलरला झोप लागलेली असताना डॉ. गोबेल्स याने आपले मृत्युपूर्व निवेदन लिहून काढले. त्यात तो लिहितो—

"बर्लिन सोडून जाण्याची आज्ञा मला फ्यूररने केली आहे व नेमलेल्या सरकारात मी सहभागी व्हावे, असा सल्ला त्याने दिला आहे. पण आयुष्यात प्रथमच मला फ्यूररची आज्ञा मोडणे भाग आहे. या बाबतीत माझ्या पत्नीचा व मुलांचा मला पाठिंबा आहे.

"सर्वजण द्रोह करून फ्यूररला सोडून गेले आहेत. लढाईच्या अशा ह्या भीषण अवस्थेत, कुणीतरी एकाने मरेपर्यंत त्याचेजवळ राहाणे आवश्यक आहे. हे करताना मी जर्मन जनतेची एकप्रकारे सेवाच करीत आहे. पुढे येणाऱ्या कठीण काळात माणसांपेक्षा प्रत्यक्ष कृतीच्या दाखल्याचीच अधिक आवश्यकता आहे.

"माझी मुले आज लहान आहेत व स्वतःचा निर्णय घेण्याच्या अवस्थेत नाहीत. परंतु ती जरी तशी असली तरी त्यांनी माझ्या व पत्नीच्या निर्णयाप्रमाणे वागण्याचे ठरवले असते अशी माझी खात्री आहे. मी राईश राजधानी न सोडण्याचे ठरवले आहे. राजधानी पडली तरी मी फ्यूररजवळ राहीन व मरण पत्करीन. कारण फ्यूररच्या जवळ राहून त्याची सेवा शक्य होणार नसेल तर अशा आयुष्याची मला मुळीच मातब्बरी नाही."

डॉ. गोबेल्सने हे निवेदन संपवले, तेव्हा ४ वाजून गेले होते. पुष्कळच गोष्टी अजून उरकायच्या होत्या. मुख्य म्हणजे गोअरिंग व हिमलर यांना बडतर्फ करून ॲड्मिरल डोएनिटझ् याला सर्वाधिकार देणारा फ्यूररचा हुकूम व अखेरचे हृद्गत या दोन्ही महत्त्वाच्या कागदपत्रांना बंकरबाहेर धाडायचे काम शिल्लकच होते. ही गोष्ट सोपी नव्हती. कारण रशियन सैन्याचे बरेच वेढे आता बर्लिनला बसले होते.

हिटलरने सही करून दिलेल्या कागदपत्रांवर बोरमन याने पत्र जोडले—

"Dear Grand Admiral,

Since all divisions have failed to arrive & our position seems hopeless, the Fuehrer dictated last night the attached political

testament – Heil Hitler.

– Borman

[ प्रिय ग्रँड ॲड्मिरल,

बाहेरून येणारी कुमक पोचू शकलेली नाही व आमची परिस्थिती निराशाजनक झाल्यामुळे फ्यूरर यांनी काल रात्री, जे राजकीय टिपण तोंडी सांगितलेले आहे ते सोबत जोडले आहे.– हाईल् हिटलर

–बोरमन ]

हे कागदपत्र घेऊन तीन विश्वासू माणसे बंकरबाहेर धाडण्यात आली, तेव्हा २९ एप्रिलची दुपार झालेली होती. हे तिघे बंकरबाहेर पडले व ज्या दिशेला थोडेसे जर्मन सैन्य अजून जीव धरून लढत होते. त्यामधून हे तिघे रशियन फळच्या ओलांडीत बर्लिनबाहेर निसटू लागले. या तिघांवर अनेक संकटे गुदरली व अखेर जेव्हा या दिव्यातून ते पार पडले, तेव्हा फार उशीर झाला होता.

बाहेरून कुमक येईल किंवा निदान आपण आज्ञा सोडलेल्या प्रतिचढाया यशस्वी होऊन रशियन सैन्य मागे रेटले जाईल अशी अंधुक आशा अजून फ्यूररला वाटत असावी. कारण २९ एप्रिलला दुपारी त्याने ठरलेल्या वेळी नेहमीची बैठक घेतली. जनरल क्रेबस् याने सांगितले की, रशियन सैन्य आदल्या रात्री व पहाटे अधिक पुढ सरकलेले असून बाहेरून कुमक येण्याचे काहीच चिन्ह नाही.

रात्री १० वाजता बंकरमध्ये पोचलेल्या खात्रीलायक वार्तेवरून फ्यूररला कळले की, १ मे पर्यंत रशियन सैन्य निश्चित चॅन्सेलरीत शिरेल.

हिटलरची मरणघटका आता समीप आली होती. त्याच दिवशी, म्हणजे २९ एप्रिलला दुपारी आणखी एक वृत्त बंकरमध्ये येऊन थडकले–मुसोलिनी व त्याची प्रेयसी क्लॅरा पेटॅसी या दोघांना कंठस्नान घालण्यात आले आहे !

काऊंट सियानोच्या मृत्युपर्यंतची म्हणजे ११–१–१९४४ पर्यंतची इटालीतील हकीकत पूर्वी सांगून झाली आहे. (' माणूस ' १५–१०–६५) त्या पुढील घटनांचा धागा आता २९ एप्रिल १९४५ पर्यंत जोडून घेऊ.

१९४४ साल उजाडले, तेव्हा इटलीतील प्रमुख शहरांतून नॅशनल लिबरेशन कमिट्या स्थापन झाल्या होत्या. फॅसिझमचे राष्ट्रवादीविरोधक, लोकशाहीप्रेमी जनता व मुसोलिनीच्या नेतृत्वावर रुष्ट झालेले सेनाधिकारी यांच्याबरोबर इटालीतील कम्युनिस्ट पार्टीचे सभासद या कमिट्यांतून शिरलेले होते. या सर्व कमिट्यांमधून विखुरलेले कम्युनिस्ट यांची पक्ष–संघटना चांगली असल्यामुळे व आखून दिलेल्या तत्त्वज्ञानाचे ते असल्यामुळे, या कमिट्यांमधून अल्पसंख्य असूनही त्यांच्या वागण्यात व आचरणात एकप्रकारची सुसूत्रता होती. ज्या ठिकाणी शक्य होते तिथे त्यांनी केवळ प्रतिकारक दलेच निर्माण केली होती. जिथे शक्य नव्हते तिथे संयुक्त

आघाड्या तयार केल्या होत्या. यामुळे देशभक्तांच्या चळवळींची सूत्रे अखेर कम्युनिस्टांच्या हाती गेली.

लढाईचा डाव तर पार कुजला होता. फील्ड मार्शल केसरलिंगला मागे रेटण्यासाठी पुरेसे सैन्यदल व विमानदल दोस्तांनी अलेक्झांडर याला उपलब्ध केले नाही व त्यातीलच सैन्यदले फ्रान्सच्या दक्षिण किनाऱ्यावर उतरण्यासाठी काढून घेण्यात आली, यामुळे अलेक्झांडरची चढाई रुटूखुटू चालू होती.

जून १९४४ मध्ये रोम पडल्यापासून या छुप्या कम्युनिस्ट क्रांतिकारकांनी इटालियन व जर्मन सैन्यालाच आडकाठी करणारी घातपाती कृत्ये मोठ्या प्रमाणावर करण्यास सुरुवात केली. प्रथम अकारण घातपातासारखी आततायी कृत्ये करावी, म्हणजे सरकार चिडते—सरकार चिडले की, अन्याय्य गोष्टींना सुरुवात होते—या चक्रातून सरकारविरुद्ध असंतोष फैलावत जातो. हा असंतोष सतत वाढवीत याचे पर्यवसान अखेर यादवीत करण्याचे खास कम्युनिस्ट तंत्र आता आकार घेऊ लागले.

इटालियन-सैन्य—इटालियन सैन्याच्या मार्गात विघ्ने आणणाऱ्यांना देशद्रोही समजत होते ! अर्थात् कम्युनिस्टांनी घातपात सुरू करताच, जर्मन सैनिकांच्या मदतीने या घातपाताला जे जबाबदार आहेत असा संशय येई, त्या साऱ्यांना देहदंड मिळू लागला. इटालियन सैन्यच इटालियन नागरिकांना ठार करू लागले असे दृश्य दिसू लागताच, मुसोलिनीविरुद्ध व त्याच्या सैन्याविरुद्ध संतापाची लाट इटालीत सर्वत्र उसळली.

फॅसिस्ट व फॅसिस्टविरोधी अशी दोन दले उघड उघड आपापसात लढू लागली. ही सर्व माणसे इटालियन होती—परंतु, इटालियन राष्ट्रवादाचा मुद्दा पाडून कम्युनिस्टांनी इटालीत यादवी माजविण्यात यश मिळविले.

आता मुळी जर्मन लढतच नव्हते व ब्रिटिशही लढत नव्हते. जर्मन सैन्ये थकली होती व त्यांचे लक्ष मातृभूमीच्या लढाईकडे होते. इटालीतील लढाईत त्यांना रस वाटत नव्हता. ब्रिटिश सैन्यासाठी आवश्यक तेवढे सैन्य व सामग्री यांचा अभाव होता. शहराशहरांतून, खेड्याखेड्यांतून, इटालियन फॅसिस्ट व फॅसिझमविरोधी इटालियन कम्युनिस्ट यांच्या यादवीला चांगले तोंड लागले होते.

डिसेंबर १९४४ मध्ये मुसोलिनी मिलानला आला. तेव्हा सुमारे ४०,००० फॅसिस्ट स्वयंसेवकांनी त्याचे प्रचंड स्वागत केले. उत्तर इटालीत अजून त्याची लोकप्रियता ओसरलेली नव्हती. या स्वागताने मुसोलिनी भारावून गेला. याच सुमारास—जर्मनीत फ्यूररने नवी अस्त्रे निर्माण केली असून त्यांचा उपयोग सुरू होताच विजय मिळेलच मिळेल, अशी माहिती जर्मन गोटातून त्याचे कानांवर येऊ लागली होती.

याच महिन्यात १५ डिसेंबरला आर्देन्समध्ये फ्यूररने फेकलेला अखेरचा फासा दान घेऊन आला नाही. हा जुगार फसला व पुढल्या दोन महिन्यांत पश्चिम

आघाडीवर जर्मन सैन्य मोठे पराभव खात ऱ्हाईनपर्यंत मागे सरकले. १० मार्च १९४५ ला फील्ड मार्शल केसरलिंगला इटालीतून काढून घेण्यात आले व त्याला रूडन्स्टेंडचे जागी हिटलरने नेमले. केसरलिंग इटालीतून जाताच–इटालीतील जर्मन प्रतिकार पोरका झाला व तो दुय्यम दर्जाचा ठरला. केसरलिंगची जागा जनरल व्हीटेनगॉफ् (Vietenghoff) याने घेतली. परंतु जर्मन सैन्याने गुप्तपणे दोस्तांशी शरणागतीची बोलणी सुरू केल्याच्या वदंता मुसोलिनीच्या कानांवर आल्या.

२५ एप्रिलला मिलान शहराच्या उपनगरात फॅसिस्टविरोधी कामगारांनी सशस्त्र बंडच सुरू केले. मिलन सोडणे आता मुसोलिनीला भाग होते. त्याने ठरवले की, आल्प्सच्या डोंगरात शिरायचे. तो उद्‌गारला–

" I shall go to the mountains. Surely it is not possible that five hundred men cannot be found who will follow me. "

[ मी डोंगरांचा आश्रय करीन. निदान पाचएकशे अनुयायी माझेबरोबर येण्यास तयार होतीलच. ]

चार महिन्यांपूर्वी मिलनमध्ये झालेले प्रचंड स्वागत त्याला आठवत होते. पण आता एकदम पारडे फिरले होते; कारण जर्मनीत चारी बाजूंनी दोस्त व लाल सेना घुसल्याचे वृत्त आल्याने, या युद्धाचा निकाल लागल्यासारखा आहे, ही गोष्ट सर्व नागरिकांच्या आता लक्षात आली होती. पाचशे तर सोडाच पुरते पन्नास लोकही मुसोलिनीच्या बरोबर साथ करायला मिळणे आता मुष्कील होणार होते. मिलन सोडण्यापूर्वी त्याने आपली पत्नी रॅचेल हिला लिहिलेले अखेरचे पत्र अतिशय करुण आहे. त्याचा मुलगा ब्रूनो हा लढाईत मारला गेला होता. दुसरा मुलगा रोमॅनो व मुलगी अॅना यांच्यासंबंधीं त्याचे प्रेम या पत्रात चांगले व्यक्त होते.

## मी माझ्या दैवाप्रमाणे जात आहे

मिलनहून मुसोलिनी कोमो (Como) येथे गेला. त्याचे पत्र रॅचेलला मिळताच तिने कोमो येथे पुन:पुन्हा फोन लावला. अखेर फोन लागला. फोनवर तिचे झालेले भाषण – रॅचेल हिने My life with Mussolini. " या आपल्या आत्मचरित्रात दिले आहे.

फोन लागताच मुसोलिनी उद्‌गारला–

"रॅचेल, अखेर आपली गाठ पडली ! ...रॅचेल, माझी काळजी करू नकोस. मुलांना सांभाळ–अॅना अजून लहान आहे."

" पण तुमच्या सुरक्षिततेचे काय ? "

" मी माझ्या दैवाप्रमाणे जात आहे (I follow my destiny) पण, तू मुलांना घेऊन सुरक्षित ठिकाणी जा. मी पत्रात लिहिले आहेच तेच पुन: सांगतो. माझ्यामुळे जे दु:ख तुझ्या वाटचाला आले, त्याबद्दल मला क्षमा कर– मी तुझ्या आयुष्यात आलो नसतो तर तुझे आयुष्य अधिक सुखासमाधानात गेले असते. "

" पण तुम्ही असे का बोलता ? इटालीत अजून तुमच्यासाठी लढणारे असंख्य आहेत. ही माणसे तुमच्याकरता काय वाटेल ते करतील. "

मुसोलिनीला धीर यावा म्हणून रॅचेल हे सांगत होती. परंतु मुसोलिनी उद्‌गारला–

" They are all gone, I am afraid. I am alone Rachel & I realise quite well that all is over.– "

[ ते सगळे मला सोडून गेले आहेत. मी एकटाच उरलो आहे. रॅचेल ! आणि मला हे माहीत आहे की, आता सगळेच संपत आले आहे !! ]

एवढे बोलणे झाल्यावर मुलांशी बोलण्याची इच्छा मुसोलिनीने प्रदर्शित केली. मग रोमॅनो व ॲना यांनी त्याच्याशी थोडा वेळ बोलणे केले.

फोन खाली ठेवल्यावर ताबडतोब मुलांना घेऊन स्वित्झर्लंडच्या दिशेने न जाता रॅचेल एकटीच कोमोला आली. तिला मुसोलिनीने चर्चिल यांची त्याला आलेली पत्रे आपल्या कागदपत्रांतून काढून दिली व सांगितले–

" निसटण्यापूर्वी पकडली गेलीस तर ब्रिटिशांना शरण जा–"

## ' ध ' चा ' मा '

जर्मन सैन्य या वेळी इटालीबाहेर पडत होते व त्यांना भूमिगत क्रांतिकारक आड येत नव्हते. कारण एकतर सैन्याशी लढण्याएवढी ताकद त्यांचेपाशी नव्हती व जर्मनीत त्या सैन्याला काय वाढून ठेवले आहे याची कल्पना कम्युनिस्टांना होती. याचा फायदा घेऊन मुसोलिनी व अखेरच्या क्षणी त्याला येऊन मिळालेली त्याची प्रेयसी पेटॅसी ही दोघे २०० जर्मन सैनिकांच्या तांड्यामधून इटालीबाहेर निसटण्याच्या प्रयत्नात होती.

फॅसिस्टविरोधी दलांनी रस्त्यावर चौक्या बसवल्या होत्या. चौकीतून पार होणाऱ्या सर्व जर्मन सैनिकांना ते जाऊ देत, परंतु कुणाही इटालियन नागरिकाला त्यातून निसटता येणार नाही याची अट घालीत. जर्मन सैनिकांना बाहेर पडण्याची घाई होती व विनाकारण रक्तपात आता नको होता. अर्थात् या अटी ते मान्य करीत व जर्मनीच्या दिशेने निसटण्याची त्वरा करीत.

जर्मन सैनिकांचे हे पथक तपासण्यात आले व जर्मन सैनिकाच्या पोषाखातील मुसोलिनीला ओळखण्यात येऊन त्याला मोटारीबाहेर खेचण्यात आले. बाकीच्या जर्मन सैनिकांना पुढे सरकण्यास सांगण्यात आले. डोंगो (Dongo) या खेड्याजीक ही अटक झाली. पेटॅसी हिने आपण होऊन मुसोलिनीबरोबर अटक करवून घेतली.

ताबडतोब मिलानला बातमी पोचली की मुसोलिनीला पकडण्यात आले आहे.

मिलान येथील ' नॅशनल लिबरेशन् कमिटी 'ची बैठक भरून निर्णय घेण्यात आला की, मुसोलिनीला मिलानला आणण्यात यावे. मुसोलिनीला मिलानला आणण्याची ही

कामगिरी कर्नल व्हॅलेटिओ या नावाने वावरणाऱ्या कम्युनिस्ट भूमिगताकडे देण्यात आली.

बैठक आटोपताच या कमिटीतील फक्त कम्युनिस्ट सभासदांनी निराळे खलबत केले. ‘ घ ’ चा ‘ मा ’ करण्यात आला !

२८ एप्रिलला सकाळी एका मोटारीतून व्हॅलेटिओ मुसोलिनीला आणण्यासाठी रवाना झाला. डोंगो येथे एका शेतकऱ्याच्या घरात २७ एप्रिलची रात्र मुसोलिनी व पेटॅसी यांनी घालवली होती.

पहाटे चारचा सुमार होता, तोच मुसोलिनी व पेटॅसी झोपली होती त्या खोलीचे दार धाडकन उघडून व्हॅलेटिओ आत आला, त्याने आत येताच मोठ्याने पुकार केला—

“ चला चला ! तुम्हांला सोडवण्यासाठी मी आलो आहे. ”

मुसोलिनी उमजला, की हे नाटक आहे. त्याने म्हणूनच विचारले—

“ खरंच ! फार उपकार झाले—किती दयाळू आहात आपण ? ”

“ तुमच्याजवळ शस्त्र आहे काय ? ” मुसोलिनीने सांगितले—“ नाही. ”

मग पेटॅसीकडे वळून व्हॅलेटिओ म्हणाला—

“तुम्हीही चला बाईसाहेब—”

क्लॅरा पेटॅसी या वेळी रडत नव्हती. मात्र रात्रभर रडून वा जागरणाने तिचे डोळे लाल दिसत होते. मुसोलिनीचा हात घट्ट धरून ती मुसोलिनीच्या मोटारीत चढली.

मोटार सुरू झाली. काही अंतर जाताच एका निर्मनुष्य अशा विस्तीर्ण शेतात, मोटार थांबवण्यात आली. व्हॅलेटिओने हुकूम सोडला—

“ खाली उतरा... ”

मुसोलिनी उतरला. त्याला सर्व प्रकार काय आहे तो समजलेला असावा, कारण तो अवाक्षर बोलत नव्हता. ‘ तुम्हांला ठार मारण्यात येणार आहे ’—असे व्हॅलेटिओने मुसोलिनीला सांगताच पेटॅसीने मुसोलिनीला मिठी मारून करुणा भाकली.

“ No ! No ! you must not do it– you must not– ! !

[ नाही ! नाही ! तुम्ही असं करू शकत नाही—करू शकत नाही ! ! ]

व्हॅलेटिओने सांगितले की—

“ बाजूला हो ! नाहीतर तू फुकट मरशील. ” परंतु पेटॅसी बाजूला झाली नाही.

गोळ्या सुटल्या. पेटॅसी जमिनीवर कोसळली. मुसोलिनीने आपल्या जाकिटाचे कोपरे दूर धरून सांगितले—‘ Shoot me in the chest–

[ माझ्या छातीत बरोबर गोळी घाला. ]

मुसोलिनीचे हेच अखेरचे शब्द होत. पहिली गोळी छातीत शिरताच मुसोलिनी



**पेटॅसी : अखेरीसही प्रामाणिक राहिलेले सौंदर्य...**

मागे कोसळला. त्याचे पाय मोडल्यासारखे वाकत गेले. तो कोसळला परंतु मेला नाही. जमिनीवर पडून त्याचा श्वासोच्छ्वास जोरजोराने सुरू झाला, व्हॅलेटिओने अगदी जवळ जाऊन दुसरी गोळी त्याच्या छातीत मारली. मुसोलिनीचे शरीर काही काळ आचके देऊन मग लाकडासारखे ताठ झाले. त्याचा चेहरा भयानक झाला होता. ते दृष्य पाहून व्हॅलेटिओ मोटारीच्या ड्रायव्हरला म्हणाला–

'Look at his impression. Does not it suit him ?"

[याचा चेहरा पाहा. त्यावरील भाव त्याला शोभतो नाही ?]

**विटंबना**

या वेळी चार वाजून बावीस मिनिटे झालेली होती. मुसोलिनीच्या वधाची ही हकीकत मोटारीच्या ड्रायव्हरने आठवणीत सांगितली आहे.

२९ एप्रिलला पहाटेपर्यंत मुसोलिनीचे व त्याच्या प्रेयसीचे अशी–प्रेते तिथेच पडून होती. मिलानच्या आसपास पकडलेल्या–पेटॅसीचा भाऊ मार्सिलो, जनरल पॅव्होलिनी व मुसोलिनीचे मंत्री मिळून चौदा जणांना गोळ्या घालण्याचा कार्यक्रम



मिलान : २९–४–१९४५ : इटालीच्या भूमीत न रुजणारे क्रौर्य

★

कम्युनिस्टांनी रात्री उरकला. २९ एप्रिलच्या पहाटे दोघांची प्रेते इतर सर्वांबरोबर मिलानच्या रस्त्यांतील एका चौकातील पेट्रोल पंपाजवळ आणण्यात आली. हळूहळू चौकात गर्दी जमू लागली. गर्दी वाढू लागली व मुसोलिनीला पाहण्यासाठी लोक उत्सुक आहेत हे पाहून एकाने त्याचे प्रेत खाटीक बकरी उलटी टांगतो तशा एका खिळयाला उलटे टांगले. मग एकेकाचे नाव घ्यावे–ते प्रेत उलटे टांगावे–असा प्रकार सुरू झाला.

मुसोलिनी आहे व त्याच्या शेजारी टांगलेली स्त्री पेटॅसी आहे हे लक्षात येताच व कम्युनिस्टांनी मुद्दाम निर्माण केलेला प्रक्षोभ थोडा ओसरताच त्या प्रेतांवर प्रहार करणे व पेटॅसीच्या उघडया इंद्रियांत काठ्या खुपसण्याचे प्रकार हळूहळू थंड झाले. अनेकांच्या मनात या घटनेची जोराची प्रतिक्रिया सुरू झाली. अरेरे ! मुसोलिनीला एखाद्या बेवारशी कुत्र्याप्रमाणे गोळ्या घालून त्याच्या मृत देहाची अशी विटंबना आपण नकळत इटालीची जाहीर अवहेलना तर करीत नाही ना ? या विचाराचे आमूड जमलेल्या लोकांच्या मन:पटलावर उमटू लागले.

रक्ताच्या थारोळ्यात रात्रभर असूनही पेटॅसीच्या चेहऱ्यावरचे सौंदर्य पाहून अनेकांना या भयानक प्रकाराची किळस आली. एखाद्या बाहुलीसारख्या दिसणाऱ्या या स्त्रीच्या देहाची अशी विटंबना करण्याचा कुणाला काय अधिकार होता ?

इटालीच्या भूमीत न रुजणारे क्रौर्य व विद्वेष कम्युनिस्टांनी तिथे आणला याचा उलगडा मिलनच्या जनतेला आता झाला. पण तोपर्यंत होणारी गोष्ट होऊन गेली होती.

●

[ अपूर्ण ]

" २९ एप्रिलला दुपारी बर्लिनमधील चॅन्सेलरीत मुसोलिनी पकडला गेला व मारला गेला हे वृत्त फ्यूररच्या कानांवर गेले असले तरी मुसोलिनीच्या अंताची समग्र कथा किंवा त्याच्या प्रेताची झालेली विटंबना यांचा वृत्तान्त फ्यूररला कळलेला नव्हता.

कदाचित कळला असला तरी त्यामुळे त्याचा निश्चय अधिकच पक्का झाला असेल की आपले मृतदेहदेखील कम्युनिस्टांच्या हाती लागू द्यावयाचे नाहीत ! त्याने तत्क्षणी स्वतःच्या मरणाची तयारी सुरू केली.....

हा अखेरचा वृत्तान्त पुढील अंकी....

# कै. गणपतराव बोडस ...व्यक्तिदर्शन

संकलन : सुधीर दामले

: १ :

## □ गणपतरावांच्या शब्दांत गणपतराव

### व्यवहारदक्षतेचे एक बीज

"मी व्यवहारदक्ष आहे, असा माझा लौकिक आहे. व्यवहारात दक्षता राखतो हे खरेही आहे. पण मी व्यवहारदक्ष एकदम काही झालो नाही. चुकत-माकत, अनुभव घेत झालो आहे. व्यवहारदक्ष होण्यास मूळची गरिबी व आईची कडक शिक्षा हीही कारणे आहेत. कंपनीत व्यवहारदक्षतेचा पहिला धडा मला भाऊरावांकडूनच ( कोल्हटकर ) मिळाला आहे. गोष्ट क्षुल्लक आहे. पण त्यात व्यवहारदक्षतेचे बीज आहे. ती गोष्ट अशी–रंगोपंत मराठे नावाच्या एका गृहस्थांशी माझा मुंबईस परिचय झाला होता. त्यांना काही अडचण पडली ती त्यांनी मला सांगितली. मजजवळ त्या वेळी पैसे नव्हते. पण पगारातून काही शिल्लक टाकून एक तोळ्याचे मी सल्ले केले होते. रंगोपंत मराठ्यांची अडचण जाणून ते सल्ले त्यांना मी दिले. त्यांनी नेले ते कायमचेच. पुन: मला मिळाले नाहीत. माझ्या हातात सल्ले नाहीत, ही गोष्ट भाऊरावांच्या ध्यानी आली. त्यांनी त्याबद्दल मला विचारले. मी खरी गोष्ट त्यांच्यापासून थापाथापी करून लपविली; पण शेवटी खरे सांगितले, तेव्हा भाऊराव माझ्यावर अतिशय रागावले. त्यांचे ते रागावणे म्हणजे कोणाच्या लाघवी बोलण्याला फसायचे नाही असा धडाच मिळाला. माझ्या व्यवहारदक्षतेचा हा एक तऱ्हेने पायाच होय."

### अभ्यास आणि तालीम

गणपतरावांनी किर्लोस्कर कंपनीत प्रवेश केल्यापासून प्रत्येक नाटक प्रथमपासून अखेर-पर्यंत अगदी लक्षपूर्वक पाहण्याचा सराव ठेवला. यासंबंधी ते म्हणतात, "विंगमध्ये आसन ठोकायचे, नाटक लक्षपूर्वक पाहायचे. प्रत्येक पात्र काम कसे करते, त्याच्या चांगल्या अभिनयाला, पाहाता लोक कसे संतुष्ट होतात. पात्राने अभिनयात अगर पदात विशेष करामत काय केली याचे लक्षपूर्वक अवलोकन व श्रवण ही दोन्ही करायची.

या प्रकाराने नित्य अवलोकनाने, श्रवणाने व मननान सर्वच नाटके माझी तोंडपाठ झाली होती. त्यामुळे पात्र एखादे वेळी रंगभूमीवर अडले तर मी ताबडतोब प्रॉम्टिंग करीत असे. माझ्यापेक्षा सर्वच मोठी पात्रे त्या वेळी श्रेष्ठ होती. त्यामुळे प्रत्येकाची पदे लक्षपूर्वक त्यांच्यासारखी म्हणण्याचा आणि भाषणसुद्धा त्यांच्यासारखे, साभिनय म्हणण्याचा प्रयत्न करणे हा माझा नित्याचा अभ्यास होता. रंगरचना व पोषाखही मी ठाकठीक करी आणि तीच सवय मला अखेरपर्यंत होती. कोणीतरी शिक्षण देईपर्यंत आपल्याहून श्रेष्ठ अशा पात्रांच्या उत्तम गोष्टींचे अनुकरण हीच नटाच्या शिक्षणाची प्रथम पायरी होय, असे माझे मत आहे. माझ्या बाबतीत तरी मला या अनुकरणानेच अंधुकसा पुढचा मार्ग दिसू लागला.

पुढे देवलमास्तरांनी मला शिकवायला सुरुवात केली. प्रथम उभे राहण्याचा पवित्रा कसा असावा–मानेचा झोक मागे झुकलेला, जो पाय पुढे असेल त्याच बाजूचा छातीचा भाग उन्नतपणे वर करून मानेचा झोकही त्याच प्रमाणात मागे झुकता ठेवायचा. चालताना, वळून मागे येताना कशा झोकदार रीतीने मागे यावे, जोरदारपणे पुढे जाताना कसे जावे, हाताला वळणदारपणा कसा असावा, हाताची बोटे कशी ठेवावी, निर्देश करताना बोट कसे दाखवावे, ' नको, ये, जा, कोण, कुठे, केव्हा, पाहिजे, ' वगैरे शब्दांचे अर्थानुसार कसे उच्चार करायचे, हं: वगैरे तिरस्कार-दर्शक उच्चार व इतर उच्चार यांचे शिक्षण सुरू झाले. शंकराची भूमिका शिकताना शब्दोच्चार व ध्वनी मऊ येई. कारण, स्त्री-पात्राची सवय. त्याला बोलताना शब्दाला घुमारा कसा आणायचा, भाषण लयदार कसे असावे, अर्थानुसार शब्दांना सुरांचे आंदोलन व आघात कसे द्यावे हे ते अती उत्तम रीतीने शिकवीत. पदरचे शब्द पात्रांनी मध्ये घालू नयेत, याबद्दल त्यांचा अत्यंत कटाक्ष असे. ते म्हणत, " ज्या लेखकाने एवढी शब्दसृष्टी निर्माण केली त्याला तुम्ही जे शब्द वापरता ते घालणे अगर सुचणे अशक्य असते का ? परंतु, त्याला ते शब्द पांचट, पाचकळ वाटतात म्हणूनच तो ते घालीत नाही. पात्रांना फारच थोडी सवलत घेण्याचा अधिकार आहे. तो भूमिका करीत असताना रसाविष्करणासाठी त्याने एखादा मुद्राभिनय केला तर त्याला बरोबर पोषक होईल असा एखादा शब्द साजेल असा घालायला हरकत नाही. परंतु तोच आधार घेऊन जास्त फाजिलपणा करणे योग्य नाही. " ज्या ज्या नटांचा या बाबतीत तोल सुटला आहे, ते ते नट फाजील या संज्ञेला पात्र झालेले आहेत. ज्या ज्या कंपनीत चालकांचे नटांवर नियंत्रण आहे अगर होते किंवा ज्या नटांनी सवंग लोकप्रियतेला बळी न पडता बुद्धी समतोल ठेवली त्याच कंपनीची नाटके लोकप्रिय व श्रेष्ठ दर्जाची ठरली. रंगभूमीवरची लोकप्रियता ही अत्यंत मादक आहे. भांग, गांजा, मद्य यांच्या कैफापेक्षाही ही मादकता जास्त तीव्र असते. भांग-गांजाची मादकता नियमित वेळेपर्यंत टिकते. परंतु, हा कैफ सारखा राहातो. परिमित सेवन करणारे ज्याप्रमाणे मादकतेच्या आहारी जात नाहीत, त्याप्रमाणे

नटानेही ही लोकप्रियतेची मादकता आपल्या अंगावर न चढेल असे जागरूक राहिले पाहिजे. भांग, गांजा किंवा मद्याने शरीराची हानी होते. परंतु लोकप्रियतेच्या कैफाने प्रगतीची व चारित्र्याची हानी होते. नट नेहमी यशाच्या सुवर्णमध्याबद्दल असंतुष्ट असला आणि अजूनही पुष्कळ पुढे व्हायला पाहिजे असा महत्त्वाकांक्षी असेल तरच तो यशाचा सुवर्णमध्य गाठतो आणि यशाच्या कैफाने धुंदीत नेहमी राहिलेला नट अधोगतीच्या गर्तेत जातो.

## भूमिकांचे मनन

किर्लोस्कर मंडळी करीत असलेल्या 'गुप्तमंजूष' नाटकात शृंगीची एक छोटीशी भूमिका गणपतराव करीत असत. अर्थात अधिकाधिक महत्त्वपूर्ण भूमिका कराव्या ही त्यांची इच्छा होतीच; त्याबद्दल लिहिताना ते म्हणतात, "माझे शृंगीचे काम बहारदार झाले. त्यामुळे उत्साहाने माझे मन भरून गेले. मन:स्थिती काही वेळ अशी होई की, रोज नाटके का होत नाहीत ? तो काळ असा होता की, मला फक्त तीन नाटकांत प्रामुख्याने प्रेक्षकांसमोर यायला मिळे व इतर प्रयोगांत स्त्री-भूमिका सुटल्यामुळे भालदार, चवरी वारणारा, मारेकरी, शिपाई, अशा खोगीरभरतीत मी रंगभूमीवर जाई. त्यातही माझा प्रयत्न असा असे की, माझे व्यक्तिमत्त्व कोणत्या तरी तऱ्हेने प्रेक्षकांसमोर यावे. यात अपक्व मन:स्थितीमुळे अनौचित्याचाही प्रकार होई. परंतु उत्साहाच्या अतिरेकाचा तो एक परिणाम होता. सर्वत्र नवोदित नटांच्या हातून प्रथम प्रथम हे प्रकार होतातच. पुढे मन स्थिर करून चाणाक्षपणे भूमिकेकडे पाहून आपली सुधारणा करणे हेच मुख्य तत्त्व जो आचरणात आणतो, त्याचीच प्रगती होते व जो आणीत नाही त्याची प्रगती खुंटून ठराविक साच्याच्या भूमिके-शिवाय त्याला दुसरे काहीच करता येत नाही.

भूमिका तयार करताना माझी नेहमीची सवय अशी, की भूमिकेच्या स्वभावाचे मर्मस्थान पकडायचे आणि ते सूत्र कायम ठेवून बाकीचे स्वभावधर्मातले तरंगांचे धागेदोरे त्याला जोडायचे. मात्र हे मला मनन करून साधता येत असे. मला जर एखाद्याने एखाद्या भूमिकेवर निबंध लिहायला सांगितला असता अगर व्याख्यान द्यायला सांगितले असते तर मला साधले नसते. कारण त्याचे विशदीकरण करायला जी विद्वत्ता, जी सवय लागते अगर विविध वाचन लागते त्याचा माझ्या ठिकाणी अभाव होता. पण भूमिका शिकविताना मी रंगलो म्हणजे चर्चात्मक असे मला सांगता येत असे.

माझ्याकडे कोणत्याही नाटकातील कोणतीही भूमिका आली म्हणजे ती मी स्वत:च मननपूर्वक बसवीत असे. भूमिका बसविण्याची माझी रीत अशी असे – नाटकातले सर्व प्रसंग डोळ्यांसमोर मी प्रत्यक्ष आणी. ते ते प्रसंग आता डोळ्यां-समोर घडत आहेत असे मानी. त्यानंतर आपल्या भूमिकेला मनाने समोर उभी

करी. त्या भूमिकेला असलेली वाक्ये साभिनय स्वत:शीच म्हणे आणि ते दृश्य अंतर्दृष्टीला कसे काय दिसते हे पाहण्याचा माझ्याशीच मी प्रयत्न करून चुकीची दुरुस्ती करी. बरोबर वाटेल ते कायम करी. प्रत्येक वाक्य घोकून घोकून नुसते पाठ करीत नसे. नुसत्या घोकंपट्टीने वाक्ये पाठ होतात, पण त्यांतील अर्थाकडे अनुसंधान राहात नाही. याकरता नक्कल वारंवार वाची. वही मिटून म्हणायला सुरुवात करी. जेथे स्मरणशक्ती दगा देई तेवढ्याचपुरते वहीत पाही. नंतर पहिला क्रम चालू ठेवी. एवढे झाल्यावर अर्थाच्या अनुरोधाने वाक्य कसे तोडावे, कोणत्या शब्दांवर का व कसा जोर द्यावा, अर्थानुसार आणि रसानुकूल भाषणाची लय कशी असावी याकडेही अवधान राखी. वाक्ये म्हणताना मुद्राभिनय करी. दुसऱ्या पात्राच्या भाषणातील शेवटचे सूचीचे वाक्य मी कधीच लक्षात ठेवीत नसे. कारण प्रत्यक्ष तालमीत ते विनासायास ध्यानात राही. तसेच, रंगभूमीवर जाण्यायेण्याच्या गोष्टी तालमीत सहजच तयार होत.

भूमिका बसविण्याच्या या पद्धतीमुळेच माझ्या जुन्या कोणत्याही नाटकांतल्या भूमिका जशा मला यथातथ्य वठविता आल्या, त्याचप्रमाणे कोल्हटकरांच्या त्या वेळच्या अगदी नव्या धर्तीच्या गुप्तमंजूष, मतिविकार या नाटकांतील माझ्याकडे असलेल्या शृंगी आणि विहार याही भूमिका मी चांगल्या यशस्वी करू शकलो. भूमिका यशस्वी करण्यास जसा मननपूर्वक विचारांचा हमखास उपयोग होतो, त्याचप्रमाणे ऐन वेळी काकतालीय न्यायाने भूमिकेत आणखी मखलाशी निर्माण होण्यात अनपेक्षित अशा गोष्टी घडतात. त्यांचाही उपयोग नटाने चतुराईने निमिषमात्रात विचार ठरवून करून घ्यावा लागतो. ज्याला जे साधते त्याचे प्रेक्षक कौतुक करतात ज्याला जे साधत नाही त्याची फजिती झाल्याशिवाय राहात नाही. अशा गोष्टी कशा घडतात त्याचा थोडासा मासला पुढे देतो.

'गुप्तमंजूष'मधील श्रृंगीच्या भूमिकेला मी शिंदेशाही पगडीचा थाट केला. श्रृंग म्हणजे शिंग. शिंदेशाही पगडी दोन टोकांची यामुळे शिंगासारखी दिसे; अर्थात श्रृंग म्हणजे शिंगे असे जुळून ती पगडीच लोकांना विशेष आवडली. हे सहजगत्याच झाले होते. पण लोकांना ते आवडले हे लक्षात येताच ते कायमच केले. श्रृंगीचे तीनमजली हसणे मी विचारपूर्वक बसविले होते. त्याची चहा माझ्या विचाराप्रमाणे निश्चित झाली. विहारची भूमिका मी मन:पूर्वक बसविल्यामुळे तर लोकप्रिय झालीच. पण त्यात माझ्या डोक्यावर सहजगत्या ठेवलेली टोपी तितकीच लोकप्रिय ठरली. आडव्या टोपीची कथा अशी आहे – मतिविकाराच्या पहिल्या प्रयोगाला मी माझ्या प्रवेशाची वाट पाहात विंगमध्ये बसलो होतो. त्याच वेळी आमचे सदूकाका नाटकाला आले. त्यांना बाहेर बसविण्याच्या धांदलीत होतो. तेवढ्यात माझा प्रवेश आल्याची सूचना मला मिळाली. मी डोक्यावरची टोपी हातात घेतली होती ती बसली तशीच डोकीवर ठेवून प्रवेश करायला गेलो. मला पाहताच प्रेक्षकांत मोठाच

"वर्ण जुळला – भिवया जुळल्या – चेहरा जुळला– जुळलंच सगळं. तोच – तोच हा ! तोच हा"



कै. गणपतराव 'संशय कल्लोळ 'मधील फाल्गुनरावाच्या पेटंट भूमिकेत.

हशा उडून टाळ्या पडल्या. शेजारच्या पात्राने डोक्यावर टोपी आडवी आहे, त्यामुळे हशा होऊन टाळ्या पडल्या असे मला सांगितले. माझ्या लक्षात आले पण आता टोपी सरळ केली तर आपला वेंधळेपणा व्यक्त होईल या कल्पनेने ती तशीच राहू दिली. तेवढ्यात भरकन् विचार येऊन गेला की, विहारच्या स्वभावधर्माला

आडवी टोपीच साजण्यासारखीच आहे आणि त्याप्रमाणे मी ती आडवी टोपी त्या वेळे-पासून पुढे कायम ठेवली. "

## सावध प्रापंचिक

" माझा आयुष्यक्रम आणि प्रेमळ असे सांसारिक जीवन पाहून मला लोक नशीबवान नाटकवाला म्हणतात. मी मीठभाकरी हलाखीशिवाय खात आहे हे पाहून काही विघ्नसंतोषी लोकांच्या पोटात पोटशूळ उठून " गंधर्वाला कर्जबाजारी ठेवून मजा करीत आहे, " असेही म्हणावयाला कमी करीत नाहीत. वास्तविक, गंधर्व कंपनी सोडल्यानंतर त्या वेळच्या अकारण व सकारण शत्रुत्व करणाऱ्यांनीही माझ्यावर अप्रामाणिकपणाचा आरोप केलेला नाही. हीच माझ्या चोख व्यवहाराची कसोटी आहे.

माझ्या स्वभावात मितव्ययीपणा आहे. माझी बरी स्थिती पाहून ज्यांच्या पोटात कळ उठते, त्यांनी व गैरशिस्त खर्च करणारांनी ' चिक्कू ' अशी उपहासाने माझी चर्चा केलेली माझ्या कानांवर आलेली आहे. मूर्खपणाने, गैरहिशेबीपणाने पैसे खर्च करणे ही जर उदारता असेल तर मी चिक्कू असण्यातच मोठेपणा मानीन. माझ्यात मितव्ययीपणा यायला मुख्य कारण हेच की ऐन तारुण्याच्या भरात ज्या वेळी हातांत पैसा खेळू लागतो, त्या वयात मनुष्याच्या मनोवृत्ती उच्छृंखल होऊन त्याला निरनिराळे नाद व खर्चाची निरनिराळी व्यसने लागतात; परंतु वयाच्या पस्तीसाव्या वर्षापर्यंत मला प्रपंचपूर्तीपेक्षा जास्त पैसाच मिळत नव्हता व मी मनाने पूर्ण प्रापंचिक असल्यामुळे हौसा, मौजा करण्याची सोयच नव्हती. पस्तीस वर्षाच्या वयाच्या वेळी मनुष्याच्या मनाला, महत्त्वाकांक्षेला व ध्येयाला एक प्रकारचा स्थिर-पणा येतो. उसळ्या मारणारे मनोविकार ताब्यात राहतील असा बराचसा आत्मविश्वास आलेला असतो. त्यामुळे व परमेश्वराची कृपा व मातु:श्रींचा धाक यामुळे मुबलक पैसा मिळू लागल्यावर प्रिय पत्नीला दागिन्यांनी नटविणे हेच मनाच्या हौसेचे कृत्य डोळ्यांसमोर राहिले. आपली कमाई आपल्या प्रिय माणसांना अर्पण करणे यात मनाचे मोठे समाधान आहे.

गंधर्व कंपनीशी झालेला भागीदारीचा करार दहा वर्षांचा असल्यामुळे वयाच्या त्रेचाळीसाव्या वर्षी आपण मोकळे झाल्यावर कुणापुढेही लाचारीने जाण्याचा प्रसंग येऊ नये यासाठी संग्रह करणे अवश्य आहे असे, मनाने घेतले. आणि तसा संग्रह करण्याची प्रबळ इच्छा होऊन शक्य झाला तो संग्रह मी केला आहे. ही मला झालेली सद्‌भावना जर माझ्या नाट्यव्यवसायी बंधूंना झाली असती तर नाटकवाले म्हणून जे लोक हेटाळणीने संबोधतात, त्यांच्या नाकाचे शेंडे खाली राहिले असते. माझे भागीदार बालगंधर्व आपल्या उधळ्या वृत्तीने कर्जात राहिले. परंतु, जनतेची मनोवृत्ती अशीच दिसत आहे की, " बालगंधर्व भोळाभाबडा. परंतु हा बोडस

पाहा. बालगंधर्व कर्जात पिचतो आहे आणि बोडस सांगलीस स्वस्थ चैनीत बसला आहे." माझा असा उल्लेख करताना हे शब्द काढणारे लोक असा विचार करीत नाहीत की, बालगंधर्व कर्जबाजारी झाला यात बोडसाचा काय दोष? गंधर्व कंपनीची भागीदारी होती तोपर्यंत मिळालेला प्रत्येक पैसा हिशेबाने माझ्या भागीदारीच्या हिश्शाने आलेला आहे. प्रत्येक वाटणीपत्रकारावर भागीदारांच्या रुजुवातीच्या शेवटपर्यंत सह्या आहेत. मी भागीदार असता माझ्या प्रापंचिक खर्चाचे योग्य बजेट ठरविले होते व बजेटाबाहेर मासिक खर्च करणाशिवाय जाऊ नये, याबद्दल मी दक्ष असे; कारण, हा भागीदारीत मिळालेला पैसा म्हणजे एक पूर आला आहे. पुन्हा लोंढा येईल की नाही या साशंक सावधगिरीने मी थोडाफार संग्रह केला. नारायणरावांना माझ्या दीडपट पैसे मिळत असून त्यांच्यापाशी संग्रह झाला नाही हा माझा दोष का? परंतु, जग हे दुतोंडे आहे. मी भागीदारीत झाला तो संग्रह केला. भागीदारीत त्रास होत आहे व आपल्या खिशात पडणाऱ्या पैशांची बेजबाबदारपणे लूट चाललेली प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहात असताना व तिचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य अंगी असूनही केवळ प्रतिकार करणे म्हणजे तंटा सुरू करणे हे मनात घेऊन मीच भागी तोडली. नंतर कोणत्याही तऱ्हेने हा धंद्याचा जुगार खेळायचा नाही असा मनाचा दृढ निश्चयही केला व टिकविला.

माझ्या स्वत:च्या सुखसोयीच्या बाबतीत मी खर्चाची काटकसर करीत नाही. सुस्थितीची कल्पना अशी आहे. सुग्रास जेवण व घड आणि स्थितीला योग्य असा कपडा. खोऱ्याने पैसे मिळवीत असता जो पोषाख मी ठेवला तोच पोषाख अजूनही राहिला आहे. राहणीची घडणच मी अशी आखली होती की, द्रव्याचे झरे आटल्यावरही आपल्याला दैन्याची कळा येऊ नये. गाडी मोटारीची हौस भागवून पैशाचा ओघ कमी झाल्यावर तो वाहने ठेवण्याचे सामर्थ्य नाही म्हणून कष्टी होण्यापेक्षा पंचवीस रुपये फेकले असता दोन दिवस मोटार उभी राहाते व आपण तशी उभी करू ही आपली शक्ती आहे यातच समाधान आहे."

## गोष्टी सांगेन....

"आज सहा–सात वर्षे मी नाटक मंडळीतील कुणी भेटला तर भावी नाटक कंपन्या कशा असाव्या, त्यांची घटना व नाटके कशी असावीत याबद्दल बोलत आलो आहे.

आता नाटक कंपन्या भावी काळात कशा असाव्या याबद्दलचे माझे वैयक्तिक विचार मांडीत आहे. अर्थात ते सर्वांना पसंत पडलेच पाहिजेत असे नाही. परंतु, सुचला तो एक मार्ग दाखवीत आहे.

सध्याच्या जगातील एकंदर वातावरणावरून पूर्वीप्रमाणे एक मालक अगर जास्त भागीदारांची कंपनी यशस्वी होणार नाही. जगात सर्वत्र समतेचे वारे खेळू लागले

असल्याने त्याचा नकळत प्रत्येक व्यक्तीवर व धंद्यावर परिणाम होत आहे. पर्वी नाटक कंपन्यांना सुबत्तेचा काळ होता म्हणून वाटेल तसे पगार देणे परवडत असे. परंतु सरासरी आणि कशी तरी कंपनी चालू करायची म्हणजे पगारी नोकर ठेवणे दिवसानुदिवस कठीण झाले आहे. म्हणून ती व्यवस्था मोडून खालीलप्रमाणे व्यवस्था करावी.

कंपनीचा मालक असा कुणी नसून सर्वच मंडळी भागीदार करावी. फक्त आचारी पाणके, गडी अशा दर्जाची मंडळी व डोअरकीपर्सवर्ग पगारी ठेवावा. काम करणारी जी माणसे असतील त्यांचे खर्च वजा जाता उत्पन्नावर टक्केवारी योग्यतेप्रमाणे व लायकीप्रमाणे ठरवावी. खर्च वजा जाता जी रक्कम राहील, त्यात नवीन नाटकांच्या तयारीसाठी, प्रवासखर्चासाठी, जरुरीकरता गंगाजळीसाठी काही प्रमाणांत रक्कम बाजूला ठेवावी. गंगाजळीतून जरुरीप्रमाणे रक्कम घेतल्यास ती परत करण्याची वेळ येताच परत गंगाजळीत भरावी.

भोजनखर्चाच्या व्यवस्थेसाठी कुणीतरी कॉन्ट्रॅक्टर गाठावा म्हणजे त्यालाही धंदा होईल व त्याच धंद्यावर त्याची उपजिविका अवलंबून असल्याने नासधूस होणार नाही.

कंपनीतील सर्व तऱ्हेची कामे श्रमविभागाच्या तत्त्वावर जबाबदार मंडळींना वाटून द्यावी. हा लहान, हा मोठा असा भेदभाव माजवू नये व योग्यतेची जाणीव कुणी कुणाला देऊ नये. मिळवा आणि घ्या अशीच व्यवस्था हितपरिणामी होईल. प्रत्येकाला टक्केवारी ठरलेली असली म्हणजे आणि टक्केवारी वाढविण्याची प्रत्येकालाच आच लागेल. एखाद्याला शेकडा दहा टक्केवारी असेल तर ती वीस कशी होईल ही तळमळ उत्पन्न होईल. जबाबदार मंडळींचे एक मंडळ तयार करून प्रत्येकाकडे एकेका खात्याची जबाबदारी टाकावी. या मंडळाचा मुख्य दरवर्षी अगर दर तीन वर्षांनी बहुमताने निवडावा. कुणीही विशेष कारणाशिवाय एकमेकांच्या खात्यात ढवळाढवळ करू नये. त्याने नसते तंटे उद्भवतात.

गाणाऱ्या पात्राने गाण्याचे वस्त्रगाळ चूर्ण करायचे दिवस आता संपले आहेत, असे मला वाटते. पदाला सुरुवात केल्याबरोबर बाकीच्या पात्रांना मागे मोकळे सोडून समोर उभे राहून हातरुमालचा चोळामोळा करीत अगर पदाराला पीळ घालीत पदांचे दळण सुरू करून तानेला टाळी पडेपर्यंत तानेच्या गिरक्या घेत रसिकांचे हाल करण्यापेक्षा चटका लागून 'वाहवा', असा उद्‌गार निघेल असेच चटकदार, गोड व रसानुकूल गायन असावे. गद्यातील रसाला, पद्याने उठाव आला पाहिजे. नाही तर भयंकर रसहानी होते.

घरी बसल्यापासून, माझ्याकडे जे नाटकाचे नादी लोक येतात त्यांना मी नाटकधंदा चालविण्यासंबंधी माझ्या वरीलप्रमाणे कल्पना " गोष्टी सांगेन युक्तीच्या चार " या तत्त्वाप्रमाणे नेहमी सांगत असतो. कोठे रुचतात, कोठे रुचत नाहीत. रुचल्या तरी त्यांचा परिपोष नीट न झाल्याने मूळ धरत नाहीत, असे माझ्या अनु-

भवाला आले आहे.

नाटके शिकविण्याची मला इच्छा, कळकळ आणि तळमळ अतिशय आहे. ज्या धंद्यात मी लहानाचा मोठा होऊन आजची सुस्थिती उपभोगीत आहे, त्या धंद्यासाठी अखेरपर्यंत यथाशक्ती, यथामती, काही करावे. अशी इतकी तीव्र इच्छा आहे की, मी आजारी असलो, अगदी स्ट्रेचरवर मला घातले असले तरी तशाही स्थितीत नाटकाच्या तालमी देण्यास मला कोणी बोलावल्यास मी स्ट्रेचरवरून तसाच उठून तालमी घेण्यास मोठ्या आनंदाने जाईन!"

[ 'माझी भूमिका' या आत्मचरित्रातील संकलन ]

□

## : २ :

## □ गणपतरावांच्या तालमी

### सौ. सुहासिनी मुळगावकर



मला तो दिवस नक्की आठवत नाही, पण मी 'एकपात्री सौभद्र'चे प्रयोग नुकतेच करू लागले होते. त्याच वेळेस सांगलीला प्रयोग होता. या प्रयोगाला गणपतरावांनी उपस्थित राहावे, अशी माझी फार इच्छा होती. शिवाय, हे सहज शक्यही होणार होते. कारण, गणपतरावांचा मुक्काम मिरजेतच होता म्हणून व्यवस्थापकांना मी गणपतरावांना आमंत्रण करण्यास सांगितले. आणि काय आश्चर्य खरोखरच गणपतराव आलेही! तब्येत बरी नव्हती. पाय दुखत होते तरी माझ्या बोलावण्याने ते मुद्दाम हजर राहिले; इतकेच नाही तर शेवटपर्यंत बसले!! अगदी मी मेकअप् उतरून बाहेर येईपर्यंत थांबले होते. मी त्यांच्या पाया पडले आणि प्रयोगावरील त्यांचा अभिप्राय विचारला. अर्थात त्यांनी प्रशंसाच केली. (ते शेवटपर्यंत बसले होते यातच मला कृतकृत्य वाटत होते.) मी त्यांना काही दुरुस्त्या, चुका विचारल्या तेव्हां ते उत्तरले, "इथे चारचौघांत मी तुमची स्तुतीच करीन, पण खरोखरच काही सूचना हव्या असतील तर घरी या! इथं सर्वांच्या देखत मी एखादा दोष सांगितला तर उगीच विपर्यास केला जाईल, तेव्हा खास असे काही सांगता आल्यास पाहतो. मात्र माझ्या घरी या!"

ही संधी कोण हुकवील ? मी दुसऱ्या दिवशी मुद्दाम मिरजेला गेले. तेव्हा ते म्हणाले, " तुमचा प्रयोग अगदी उत्तम होतो. मला फक्त एकच गोष्ट जाणवली आणि ती म्हणजे त्याला काहीसा सोशल टच आलेला आहे. अर्थात हा तुमचा दोष नाही. तुम्ही जुने काही पाहूच शकला नाहीत ! बाकी मला त्यात काडीचीही उणीव वाटत नाही."

त्यावर मी म्हणाले, " मग माझा दोष सुधारून द्या ! "

त्यावर ते म्हणाले होते, " आता तुमचा प्रयोग चांगला बसला आहे. त्यात मी ढवळाढवळ करीत नाही. नवीन नाटक बसवाल तेव्हा जरूर या. मी आनंदाने शिकवीन ! "

गणपतरावांचा माझा जवळून परिचय झाला तो प्रथम हा असा ! वास्तविक, त्यापूर्वी मी लहान असताना डॉ. भालेराव यांच्या घरी ते नाटकाच्या तालमी घ्यायला येत तेव्हा मी त्यांना अनेकदा पाहिले आहे. त्यांच्या तालमी बारकाईने पाहिल्या आहेत. पण त्यांच्या तालमींचा प्रत्यक्ष लाभ काही मला मिळाला नव्हता. तो सौभद्राच्या वेळी मात्र मला त्या गोष्टीचे आश्वासन मिळाले.

आणि त्याच जोरावर मी ' एकपात्री मानापमान ' बसविण्याचे ठरविले, तेव्हा माझ्याकडून त्याची खूप तयारी केली आणि शेवटचा हात फिरविण्याचे दृष्टीने त्यांच्याकडे गेले, आणि त्यांनीही मोठ्या आनंदाने आठ-दहा दिवस तालीम दिली.

त्या वेळी त्यांचा मुक्काम मुंबईत त्यांच्या मुलीकडे होता. मी सरळ जाऊन तिथे उभी राहिले आणि तालमीचे विचारले. त्यांनी प्रश्न केला, " पुस्तक आणलेस ? " मी पिशवीतून पुस्तक पुढे ठेवले. त्यावर एकदम खूष झाले, आणि आमची तालीम सुरू झाली. वास्तविक, तब्येत बरी नव्हती. आजारीच होते. पण गादीवर बसल्या-बसल्याच शिकवीत होते.

प्रत्येक वाक्य कसे उच्चारावे, शब्दांची फेक कशी हवी, वाक्य उच्चारताना तोंडावरील प्रत्येक स्नायू कसा हालला पाहिजे. डोळेच नव्हेत तर भुवया, कपाळ, गाल, जिवणी या सर्व अवयवांतून वाक्याचा आशय कसा व्यक्त करता येतो, या बारीकसारीक गोष्टीही त्यांनी शिकविल्या.

दिवसेनुदिवस तालमीला अधिकच जोर चढला. गणपतराव नुसते बसून शिकवीत; पण जणू काही उभे राहून कामच करीत आहेत असा भास होई. पण एकदा तर फारच विलक्षण घटना घडली. ४ थ्या अंकातील धैर्यधराचे स्वगत मी म्हणत होते. पण ते काही त्यांना पटत नव्हते. एकदा झाले, दोनदा झाले, तीन वेळा झाले आणि मग त्या अवस्थेत गणपतरावच उठले. मी घाबरले, म्हटले, " डॉक्टरांनी तुम्हांस उठण्यास मनाई केली आहे. तुम्ही कशाला उठता ! तुम्ही बसून सांगा. मी पुन्हा करते ! " त्यावर ते उत्तरले– " छे छे, ते नाही ! तुला अॅक्शनही दाखवायची आहे ! " आणि काय सांगू ! १०–१२ मिनिटांचे ते स्वगत येरझारा घालीत मला

संपूर्ण म्हणून दाखविले. जरासुद्धा थकवा आला नव्हता !

त्यांचा तो उत्साह पाहून मलाच लाजल्यासारखे झाले.

'मानापमान' चा हा अनुभव लक्षात घेऊन 'स्वयंवर' बसविण्याचे वेळीही मी पुण्यात त्यांच्याकडून काही दिवस तालीम घेतली.

त्यांनी दिलेल्या या शिक्षणामुळे त्यांच्यातील काही गुण तर माझ्या फारच प्रत्ययास आले. एक म्हणजे त्यांची दृष्टी आधुनिक होती. जुन्या जमान्यात त्यांचा सारा जन्म गेला तरी नव्याचेही स्वागत ते तितक्याच आत्मीयतेने करीत. मात्र याचा अर्थ असा नव्हे की, त्यांना वाटेल तो धांगडधिंगा खपत असे. योग्य शिस्तीत घडलेल्या सर्वच गोष्टींचे ते स्वागतच करीत. शब्द, त्यावरील आघात आणि हालचाली एकसंध वाटल्या पाहिजेत. प्रत्येक वाक्य हे जणू श्वासोच्छ्वासाप्रमाणे सहज आले पाहिजे, असाच त्यांचा आग्रह असे. मला त्यांच्याकडून मिळालेल्या शिक्षणात ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची वाटली.

गाण्याच्या दृष्टीने त्यांनी फारशा तालमी जरी घेतल्या नव्हत्या, तरी काही पदांची आऊट लाइन, म्हणण्यातील थाट मला त्यांनीच शिकविला. त्यांचे एक सांगणे असे– "पदातील पहिली ओळ अगदी स्पष्ट ऐकू आली पाहिजे. मग नंतर त्यात गायकीच्या करामती करा. नाहीतर होते काय पहिल्या शब्दापासूनच गायक नट कसरती करू लागतात आणि मग पदाचा पार विचका उडतो. ही दृष्टी खरोखरीच उपयुक्त वाटली. ★

## □ सौ. योगिनी जोगळेकर

आकाशवाणीच्या पुणे केंद्रात श्री. सीताकांत लाड जेव्हा नाट्यविभागाचे प्रमुख म्हणून काम करीत होते, तेव्हा जुनी गाजलेली नाटके नभोवाणीवरून श्रोत्यांना नव्याने ऐकविण्याचा चंग बांधला होता. 'रामराज्य-वियोग' चा प्रयोग त्यात प्रथम झाला. विनायकबुवा पटवर्धन, रामभाऊ गुळवणी, रावसाहेब जोगळेकर इ. अनुभवी नटांबरोबर माझ्यासारख्या नवोदित गायिकेलाही काम करण्याची संधी मिळाली होती. मला कोण धडकी भरली ! कधी न ऐकलेलं, न पाहिलेलं नाटक, त्यात बरोबर काम करणारी मातबर माणसे ! यातच भर पडली ती दिग्दर्शकांचे नाव ऐकताच भीती अधिकच वाढली. गणपतराव बोडसांसारख्या श्रेष्ठ कलावंताची त्यासाठी नेमणूक झाली होती. मी भीतभीतच तालमीला गेले. माझे नाव, पत्ता वगैरे सर्व कळले तशी ते म्हणाले, "अग, आमच्या अप्पाची मुलगी ना तू ! मग

भितेस काय अशी !" माझे वडील अप्पासाहेब एक गानलुब्ध रसिक प्रेक्षक होते. त्या वात्सल्ययुक्त विचारपुशीने माझे दडपण कमी झाले आणि मग त्यांनी माझ्या जिभेवरून जी मंथरा खेळविली तिचे विस्मरण अशक्य आहे.

नाट्यसंगीत म्हणजे नुसते रागसंगीत नसून राग आणि रस हातात हात घालून गेले पाहिजेत ही दृष्टी त्यांनी मला दिली. म्हणूनच "रामासि अनुकूल असतिल त्यांचे पाडीन दात तरीच खरी मी !" ही द्रुत गतीतील ठाशीव चीज अक्षरशः दातओठ खाऊन म्हणून, मंथरेच्या करारी व कारस्थानी स्वभावाचा आविष्कार गद्याच्या साहाय्याशिवाय मी करू शकले.

त्याच नाटकातील "उद्या बघ जाते नृपसिंहासन रामाते" या पदातील टप्प्याचा झोक, त्यातील अवघड चढउतार व स्वरांच्या वेलबुट्टया यांच्यासह एखाद्या खाँसाहेबाच्या सफाईने गणपतरावांनी मला शिकविल्या. बोलताना सहजपणा दाखविता येईल पण गातानाही तो दाखवित येतो हे मंथरेच्या पदात शिकविले.

त्यानंतर 'शापसंभ्रम' मधील महाश्वेतेची भूमिका ! त्यातील पहिल्या प्रवेशातील ठुमरीवजा पद—"मधुर किती कुसुम गंध सुटला—" त्यातील ढंगासहित शिकविले तर तो लतामंडप किती गार दिसतोय या वाक्यातील 'गार' हा शब्द इतक्या विविध तऱ्हांनी शिकविला की, जणू अंगावर शीतल वाऱ्याची झुळूकच यावी.

पुंडरिकाच्या मृत्यूनंतरची महाश्वेतेची विलापिका "अति कठीण हृदय हे माझं म्हणूनच की फुटले नाही" हे पद मी रडत स्फुंदत म्हटले. त्यातला शोकावेग, त्यातले उसासे, उन्मनस्क स्थितीला अनुसरून लय, पुढे-मागे होणे आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे खरंच स्वरांना रडता येते हे त्याच दिवशी मी प्रथम अनुभवले.

त्यानंतर 'मानापमान' मधील भामिनी ! केवळ दोनच दिवस शिकविली पण तहानभूक, वेळ अवेळ यांची पर्वा न करता त्यातल्या अवघड पदांसह गद्यपद्य दोन्ही मला शिकविले.

भामिनी आपली मैत्रिण कुसुम हिला उद्देशून म्हणते, "हा काय ग कुसुम तुझा लोचटपणा" हे एवढेसे वाक्य. पण गद्याला लय असावी आणि लयीत लडिवाळपणा असावा हे तेव्हा समजले.

"खरा तो प्रेमा" या पदाला जोडून असलेलं उत्कट प्रीतीवरचं महाभाष्य, खाडीलकरांच्या गद्यपद्याचा तो उत्तम वेचा. हे मोती गुंफायला शब्दाचे व स्वरांचे तितकेच मुलायम रेशीम हवे, हे दादांच्या पेढीवरच कळले.

★

## □ दाजी भाटवडेकर

मुंबई मराठी साहित्य संघाच्या ' म्युनिसिपालिटी ' नाटकात मी पांडोबाचे काम केले, तेव्हाची आठवण झाली की, अजूनही मला लाजल्यासारखे होते. मी त्यात गायलो होतो आणि काय सांगू ? प्रेक्षकांनी मला चक्क उचलले की हो! काय घाबरलो म्हणता! समवयस्कांनी टिंगल केली; पण त्यातही समाधानाची गोष्ट हीच की, गणपतरावांनी माझी पाठ थोपटली होती. मला प्रोत्साहन दिले होते. खरोखरच, माझा नष्ट होणारा उत्साह त्यांनीच टिकवून धरला. नाहीतर काय झाले असते कोणास ठाऊक ?

पण गणपतरावांनी मला नुसते प्रोत्साहनच दिले नाही तर मार्गदर्शनही करण्याची तयारी दाखवली. माझी जिद्द नवे रूप धारण करून फुलून आली.

गणपतरावांचा मुक्काम त्या वेळी मुंबईतच होता. साहित्य संघाच्या महोत्सवात होणाऱ्या नाटकांच्या ते तालमी घेत असत. ' मृच्छकटिक ', ' शापसंभ्रम ', ' शाकुंतल ' ही नाटके ते शिकवीत. डॉ. भालेरावांच्या घरी तालमी चालत. त्या सर्व तालमी मी अगदी बारकाईने पाहात असे. २–२, ३–३ तास नुसता बाजूला बसून गणपतराव प्रत्येकाला काय सांगतात, कसे सांगतात, हे बारकाईने पाहात असे. अर्थात एवढेच करून थांबलो नाही, तर घरी येऊन त्यावर विचार करीत असे. गणपतरावांनी अप्रत्यक्षपणे मला दिलेले नाट्यशिक्षण हे असे होते.

अर्थात प्रत्यक्ष शिक्षण दिले ते फाल्गुनराव बलराम. आणि सुधाकराच्या भूमिकेचे ! फक्त पंधरा–वीस दिवसच; पण त्यांचे मोल अवर्णनीय आहे.

या भूमिका करायचे जेव्हा मी ठरविले तेव्हा त्यांनी दररोज सकाळी सात वाजता दादरला ते राहात होते तिथे येण्यास सांगितले. तसे पाहिले तर लवकर उठायचा मला भारी कंटाळा; पण गणपतरावांची प्रत्यक्ष तालीम मिळणार म्हणून कंटाळा न करताही गिरगावातून दादरला हजर होत असे. सात ते नऊपर्यंत तालीम चाले आणि मग मी तसाच ऑफिसला पळत असे.

फाल्गुनरावाच्या कामातील बारीक सारीक गोष्टी, जागा बोलक्या कशा कराव्यात हे जणू गणपतरावांनी सांगावे. वाक्य कशा ठसक्यात उच्चारावे, त्या वेळी नजरेची फेक कशी करावी. चेहऱ्यावरील भाव कसे बदलावे या गोष्टी फारच बहारीने सांगितल्या. फाल्गुनरावाच्या कामातील नाना गमती तर एखाद्या अमोल ठेव्याप्रमाणे त्यांनी मला दिल्या.

बलरामाच्या कामातूनही त्यांनी मला खूपच नव्या नव्या गोष्टी शिकविल्या. बलराम हा विनोदी नाही तर एक साधाभोळा, सरळवृत्तीचा, खोटे न पटणारा असा उदारधी आहे. अर्थात जसा सरळ तसाच तापटही आहे. असा त्याच्या स्वभा-

वातील विरोध त्यांनी फारच उत्कटपणे समजून दिला. ' सौभद्र 'च्या २ऱ्या अंकात कृष्ण बलरामाच्या प्रवेशात कृष्ण ज्या पदातून यतीची निंदा करतो, त्या वेळी पदाच्या चढ्या लयीत बलरामाने भाषण सुरू करावे तर त्या प्रवेशाला गंमत येते ही गोष्टही महत्त्वाची होती.

सुधाकराच्या कामात त्याची पल्लेदार वाक्ये कशी सहजतेने म्हणावी, गडकऱ्यांची जी कठीण शब्दांची लांब लांब वाक्ये आहेत ती वाक्ये कशी तोडावीत हेदेखील त्यांनी मोठ्या आत्मीयतेने सांगितले.

एकंदरीत या गोष्टी मला स्वत:ला एकट्याला जमल्या नसत्या असे नाही, अधिक प्रयत्न केले असते तर सहज जमल्या असत्या. पण गुरुमुखातून या गोष्टींचे ज्ञान झाल्याने अधिक सुकर झाले. त्यांनी मला सूत्र दिले हीच त्यांची मला मिळालेली देणगी.

## ☐ सुधीर फडके

तीन–चार वर्षे झाली त्या गोष्टीला! तोपर्यंत गणपतराव बोडस यांना मी केवळ अभिनयसम्राट गद्यकलाकारच समजत होतो; पण ते गायक नटही होते ही गोष्ट मला तेव्हाच कळली. काय झाले, पुणे रेडिओ केंद्राने माझी दोन नाट्यगीते रेकॉर्ड करण्याचे ठरविले होते व त्याचे मार्गदर्शन गणपतराव करणार असे सांगितले, तेव्हा मला वाटले ते फक्त चालीच सांगणार असतील. पण जेव्हा का ती दोनही पदे त्यांनी अगदी रेखीवपणे म्हणून दाखविली, तेव्हा तर मी थक्कच झालो. या वयातही आवाज जरा देखील अस्पष्ट तर नव्हताच, पण ताना आणि जागा अशा झकास येत होत्या म्हणता! म्हणण्यातील हातोटीही मोठी लोभसवाणी होती. गणपतरावां-विषयीचा माझा आदर शतपटीने वाढला.

' सौभद्रा 'तील ' पावना वामना ' आणि ' प्रिये पहा ' ही दोनच पदे त्यांनी शिकविली. पण तो अनुभव अपूर्व होता. प्रत्येक शब्दामागे कोणती दृष्टी ठेवावी, त्यावर अन्याय न करता तो तोलून मापून कसा फेकावा ही गोष्ट खरोखर फारच उत्तम तऱ्हेने शिकविली. अर्थात त्यांना हवे तसे येईपर्यंत शिकविण्याची चिकाटी जबरदस्त होती. नाहीतर होते काय की, प्रसिद्ध गायकाला मार्गदर्शन करतेवेळी अधिकारी व्यक्ती फार तर २–३ वेळा एखादी गोष्ट सांगते. आणि मग त्या गायका-वरच सर्व गोष्टी सोपवतात. पण गणपतराव त्यांना जसे हवे तसे पद येईपर्यंत पुनः पुनः सांगत. हा गुण मला फार महत्त्वाचा वाटतो. ही माझी दोनही पदे लोक-प्रिय झाली आहेत, याचे सर्व श्रेय गणपतरावांनाच आहे, हे कसे नाकारून चालेल?

त्यानंतर मात्र माझी इच्छा असूनही अधिक पदे शिकता आली नाही. त्यांचीही खूप इच्छा होती, पण योग आला नाही हेच खरे! माझ्या दृष्टीने माझ्या आयुष्या-तील ती एक फार मोठी उणीव आहे असेच मी मानतो. *

## □ राम मराठे

माझ्या थोड्याबहुत शक्तीनुसार मी रंगभूमीची जी काही थोडी सेवा करीत आहे, त्याचे सर्व श्रेय गणपतरावांना आहे या गोष्टीचा मला कधीही विसर होत नाही. मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाटयमहोत्सवात मी ' सौभद्रा 'त कृष्णाचे काम प्रथमत: करून माझ्या रंगभूमीवरील नव्या आयुष्याला सुरुवात केली ती केवळ गणपतरावांच्या आग्रहामुळेच ! त्यापूर्वी मी गाण्याच्या बैठकी करीत असे पण नाटकातून केव्हाच उभा राहिलो नव्हतो. असाच एकदा दादर येथील श्रीकृष्ण बोर्डिंगमध्ये मालकांच्या स्नेहामुळे मी रात्री गायला बसलो होतो. तिथेच गणपतरावही येऊन उतरले होते पण मला काही कल्पनाच नव्हती. रात्रीची ११॥ ची वेळ असावी. मी ' सत्यवदे वचनाला नाथा ' हे पद गाऊ लागलो आणि त्याच वेळी गणपतराव अचानक बैठकीत उपस्थित झाले. जरा घाबरलोच, पण तसाच गाऊ लागलो. गणपतरावांचा चेहरा आनंदी दिसत होता. त्यामुळे तर उत्साह अधिकच वाढला. मग आणखीही ४–६ पदे होऊन बैठक संपली. गणपतराव मुद्दाम जवळ आले. माझी पाठ थोपटली आणि म्हणाले, " तुझा आवाज एवढा चांगला आहे. गातोसही मोठा छान ! मग नाटकात कामं का नाही करीत ? " मी म्हटले, " छे ! ती गोष्ट मला कशी जमणार ? तो प्रांत आपला नव्हे ! " त्यावर ते उत्तरले, " का ? मी तुला शिकवीन. करशील काम ? " मी तेवढ्यापुरते का होईना " हो " म्हटले आणि ती भेट तशीच संपली. निदान मला तरी तसेच वाटले. गणपतराव विसरले असतील असे वाटले, पण छे ! गणपतराव काय विसरतात !

संघाच्या महोत्सवात जुनी नाटके बसविण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. आणि माझा शोध घेत ते हजर झाले. मी त्यांना हो हो म्हणत असे आणि तेही न चुकता पुन्हा पुन्हा येऊन मला आठवण करीत. अखेरीस एवढेच करून ते थांबले नाहीत तर एक दिवस चक्क डॉ. मालेरावांनाच घेऊन माझ्याकडे हजर झाले आणि मग मात्र माझा नाइलाजच झाला. मी तालमीला जाऊ लागलो.

गणपतरावांच्या तालमीचे भांडार मात्र सदैव खुले असे. त्याला वेळेचे बंधन नव्हते. केव्हाही जा. गणपतरावांची तालीम द्यायची तयारीच असे. साहजिकच आमच्यासारख्या नवोदितांची काम करण्याची भीती नष्ट झाली. मी स्टेजवर कामे करू लागलो. अर्थात ते जेवढे शिकवीत त्यातील एक आणाही आम्ही आज करू शकत नाही हेही कबूल केले पाहिजे.

काही लोक गणपतराव कुचकट बोलत असत, असा त्यांच्यावर आरोप करतात. पण मला हा अनुभव कधीच आला नाही. उलट माझ्या दृष्टीने तर त्यांच्यासारखे प्रेमळ शिक्षक खरोखरच दुर्मिळ असतात.

* * *

: ३ :

# □ माझे दादा : गणेश गोविंद बोडस

## सौ. लीला कृष्णकुमार गोळे

आज बरोबर तीन आठवडे झाले, माझे परमप्रिय वडील तोपर्यंत आमच्या सर्वांच्या संगतीत होते. परंतु आज ? आज काय आम्ही फक्त त्यांच्या आठवणीच काढीत आहोत.

गेल्या एप्रिलपर्यंत माझे दादा मिरजेस राहात होते. दर मे महिन्यात आम्ही सर्व बहिणी मिरजेस एकत्र जमत होतो. प्रत्येक मे महिना संपला की, आम्ही बहिणी म्हणत असू " हा मे महिना आपण एकत्र जमलो आता पुढच्या मे महिन्यात आपण एकत्र जमू या ! " १९५८ साली आम्ही पाच बहिणी शेवटच्या एकत्र जमलो. त्यानंतर आमचा मे महिना जो रोडावला तो अगदी शेवटपर्यंत. परवाच्या एप्रिल-मध्ये माझ्याकडे एकदम दुपारी ४ वाजता दादांची तार आली की, सौ. लीलाला तावडतोब धाडून द्या. माझ्या यजमानांनी क्षणाचाही विचार न करता माझी रवानगी केली. सबंध प्रवासात मला क्षणोक्षणी असे वाटत होते की, माझी आईच आजारी असेल. मी अगदी घावरत घाबरतच प्रवेश केला. पण दार आईनेच उघडले अन् पाहाते तो माझे दादाच आजारी होते ! त्यांची विकलांग स्थिती पाहून माझ्यातर हातापायांतील शक्तीच गेली. माझ्या इतक्या वर्षांच्या आयुष्यात ते दुखण्याने इतके खालावलेले कधी पाहिलेच नव्हते. परंतु, दोन तीन दिवसांत ताप थांबल्यावर केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर ते आठच दिवसांत हिंडू फिरू लागले.

मी परत पुण्यास आले तेव्हा ह्यांनी त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. मी सांगितलेल्या हकीकतीवरून क्षणाचाही विचार न करता त्यांना पुण्यास आणण्याचा निर्णय घेतला. परंतु दादांना आपले हातपाय चालत आहेत तोपर्यंत कोणाच्याही दारात जायचे नव्हते, परंतु ह्यांनी त्यांना पत्र टाकले की, कोणताही विचार न करता तावडतोब यावे. दादा नेहमी म्हणायचे " लीले, जावयाच्या घरी येऊन राहण्याचा मला संकोच वाटतो. " ह्यांनी त्यांना परत पत्र टाकले की, " तुम्ही जावयाचे घर म्हणून न येता, माझ्या मुलीचे घर म्हणून या. " ह्यांच्या पत्राचे उत्तर म्हणून दादांनी ह्यांना २२-३-६५ रोजी पत्र टाकले. " पत्र पोहोचले पत्रातील धीराच्या लिहिण्याने आनंद वाटला. मुलगा नाही याबद्दल मी खेद मानला नाही, याला कारण माझ्या प्रेमळ मुली आणि त्यांना लाभलेले त्यांचे पती. तुम्ही पत्रात लिहिलेत की " जावयाच्या घरी संकोच वाटत असेल. परंतु मुलीच्या घरी संकोचा-यचे कारण नाही " म्हणजे माझ्या मुलीला आमच्या संबंधीचा मॅग्नाचार्टाच आहे

असे मी समजतो. तुम्हांला धन्यवाद देतो माझी नातवंडे खरोखरच रत्ने आहेत. यापेक्षा त्यांचे यथार्थ वर्णन जास्त काय करणार ! "

अखेर ते २४ मे १९६५ रोजी माझे घरी राहावयास आले. प्रत्यक्ष ' विठ्ठल रखुमाई 'च माझ्या घरी आल्याचा आम्हांला आनंद झाला. त्यांचेबरोबर मी मागे यात्रेस गेले तेव्हापासून दादा मला ' पुंडलीक ' म्हणत असत. जितक्या मोकळेपणाने, आणि मोठ्या मनाने, आदराने माझ्या यजमानांनी त्यांना बोलावले तितक्याच मोकळ्या मनाने ते माझ्या घरात मिसळून गेले.

तसं पाहिलं तर मिरजेला आडगाव असल्यामुळे त्यांचे इष्टमित्र, स्नेही सोबती त्यांना फारसे भेटत नसत. परंतु पुण्यास आल्यापासून मात्र त्यांचे स्नेही त्यांना भेटायला येत असत. त्यांपैकी एक म्हणजे मिरजेचे राजेसाहेब, श्रीमंत तात्यासाहेब पटवर्धन यांनी एकदा दादांना सांगितले की " गणपतराव, तुम्ही पावडर मिल्क घेत जा म्हणजे तुम्हांला त्रास होणार नाही " लगेच संध्याकाळी दादांनी त्यांच्या नातवाकडून डबा आणविला. ह्या वयातही त्यांची ट्रायल्स घेण्याची तयारी असावयाची ! त्यांचेकडे येणारे त्यांचे दुसरे स्नेही म्हणजे श्री. रामभाऊ साठे, ते आले म्हणजे त्यांच्याशी विविध विषयांवर त्यांची बोलणी व्हायची. तिसरे श्री. रामभाऊ पटवर्धन – श्री. विनायकबुवांचे चिरंजीव – त्यांच्याशीही नाट्यविषयावर खूप बोलत असत. तेसुद्धा मोठ्या जिज्ञासेने प्रश्न विचारीत. श्री. मास्तर कृष्णरावसुद्धा त्यांच्या सवडीनुसार गप्पा मारावयास येत, आले म्हणजे तीन-तीन चार-चार तास कसे निघून जात ते कळतही नसे. मनाने दोघेहीजण गंधर्व नाटक मंडळीच्या वैभवाच्या काळात जात व त्या वेळी घालविलेल्या सुखदु:खाच्या क्षणांचा आस्वाद घेत. भारत गायन समाजातील श्री. रावसाहेब केळकर हेही येत असत. व्हीनस बुक स्टॉलचे मालक श्री. अनंतराव लिमये व सौ. सुलोचनाबाई लिमये हे तर काय ? आमच्या कुटुंबियांतीलच होऊन गेले. माझे आतेभाऊ श्री. दत्तात्रय दीक्षित व त्यांच्या कुटुंबातील मंडळी वगैरेही आमचेकडे येत असत; त्यामुळे आपण एकटेच कोठेतरी आलो आहोत असे त्यांना कधीच वाटले नाही.


माझा मुलगा धनंजय हा अगदी लहान वयापासून नाटकात कामे करतो. यंदा पुरुषोत्तम करंडक नाट्य स्पर्धा झाल्या, त्याच्या बक्षीस समारंभाला ते अध्यक्ष म्हणून गेले होते. धनंजयने त्यात भाग घेतला होता. खरोखर, त्यापेक्षा दादांनाच त्यांच्या नाटकाची काळजी ! ते रोज त्याच्यामागे लागायचे की तुझ्या ग्रूपला घेऊन ये आणि त्यांना माझ्यासमोर एकांकिका करावयास सांग. त्याप्रमाणे त्या मुलांच्या त्यांनी दोन दिवस तालमीही घेतल्या. माझ्या मुलाचे मित्र व मैत्रिणीसुद्धा एवढ्या वयात त्यांचा तालमी घेण्याचा उत्साह बघून थक्क होत असत. स्टेट कॉम्पिटिशनमध्ये येथील महाराष्ट्रीय कलोपासकांनी भाग घेतला होता. श्री. शं. गो. साठेकृत " धन्य मी कृतार्थ मी " या नाटकातही धनंजयने भाग घेतला होता. " तुझ्या नाट-

काचा विषय काय आहे, त्यात तुला कोणती भूमिका दिली आहे, त्याच्यावर विचार कसा करावयाचा वगैरे बाबतींतही त्याच्याशी त्यांनी चर्चा केली. त्याला त्यांनी हॅम्लेट, झुंझारराव, जाधवराव वगैरे भूमिकांचेही शिक्षण दिले. माझी मुलगी वीणा हिने शारदा नाटकात वल्लरीचे काम केले होते. त्यांनी त्यांच्या लहानपणी स्वतः तीच भूमिका केली होती. अर्थातच तिलाही ते काम त्यांनी शिकविले सौ. सुहासिनी मुळगावकर ह्या त्यांच्या ' एकपात्री स्वयंवर ' नाटकाची तालीम घेण्यासाठी आमच्या घरी येत असत. दुपारी दोनपासून पाच वाजेपर्यंत तालीम सुरू असायची. भाषणे अन् अभून मधून संगीतसुद्धा !

पुण्यात आल्यापासून ते क्वचितच घराबाहेर जात असत. एकदा पुरुषोत्तम करंडकाच्या बक्षीस समारंभास, माझ्या मुलाचे व मुलीचे नाटक व ललितकलेचे ' पंडितराज जगन्नाथ ' पाहण्यास ते गेले होते. त्या वेळेस प्रकृती बरी नसतानासुद्धा, केवळ आईची इच्छा म्हणूनच गेले.

## दिनचर्या

दादांच्या दिवसाची सुरुवात पहाटे प्रातःस्मरणाने होत असे. पहाटेच्या नीरव शांततेत शांत आवाजात ' कराग्रे वसते लक्ष्मी ' वगैरे म्हटलेल्या त्यांच्या आवाजानेच मी पहाटे जागी होत असे. चहाचे आधण ठेवताना माझी चाहूल ऐकून दादा म्हणायचे, " काय लिलुबेन ! चहा झाला का ? " मग चहापान, त्यानंतर आईने व त्यांनी एकमेकांची चौकशी करायची. " काय बनुताई, आज कॅरेक्टर साफ का ?" कारण पोटात रोज त्यांना चूर्णाचा पोलीस धाडावा लागतच असे. सकाळी आठ वाजता दुसरा चहा. नंतर दहा वाजता जेवण. जेवण झाल्यावर केळे, भाजलेले दाणे ! अर्धे केळे रोज आईसाठी ठेवावयाचे, पण एकादशी असेल त्या दिवशी तिलाच ते ठेवावयास सांगत. त्यांनी कधी उपास वगैरे केले नाहीत. परंतु आईच्या भावनेला आणि श्रद्धेला ते कायम जपत असत. दुपारी एक दीड तास झोप की त्यानंतर चार वाजेपर्यंत अखंड वाचन. कथा, कादंबऱ्या, रहस्यकथा, मासिके वगैरे काहीही त्यांना चालत असे. ' मराठा ' म्हणजे त्यांचे दैवत होते. तो जर एखादे दिवशी वेळेवर आला नाही तर ते अस्वस्थ होत. चार वाजता चहा, नंतर साडेपाच वाजता गॅलरीत फेऱ्या ! सकाळ–संध्याकाळच्या जेवणाचा मेनू काय हे विचारल्याशिवाय त्यांचा एक दिवसही जात नसे. संध्याकाळी साडेसात वाजता दशमी खाऊन झाली की रात्री अकरा वाजेपर्यंत पुन्हा वाचन ! भारत–पाक युद्ध सुरू झाले तेव्हा दिवसभरातील सर्व वेळेच्या बातम्या ते ऐकत असत. ही त्यांची दिनचर्या अगदी २३ डिसेंबरपर्यंत चालू होती. त्या दिवशी सकाळी आम्हा घरातील लोकांना कल्पनासुद्धा नव्हती की, आजचा त्यांच्या आयुष्यातील शेवटचा दिवस असेल म्हणून ! सकाळी ८।।–९ च्या सुमारास आचार्य अत्रे त्यांना भेटावयास आले होते. त्यांचेबरोबर



धन्यो गृहस्थाश्रमः

त्यांनी गप्पा मारल्या. आचार्यांनी अंगारा व प्रसादाचे कुंकू लावले व म्हणाले, " गणपतराव, तुम्ही बरे होणार ! शंभर वर्षे जगणार ! ! " त्यांच्या या बोलण्याने दादांनासुद्धा समाधान वाटले. मी म्हटलेसुद्धा, " अत्रेसाहेब ! आपण आलात त्यांना आता खूपच हुषारी वाटत आहे. " पण मृत्यूची चाहूल त्यांना लागली होती की काय न कळे ! मी जेव्हा त्यांना थोडासा भात खायला दिला तेव्हा ते मला म्हणाले, " लीले, जीव जगवायचा म्हणून जेवायचे. नाहीतर अन्नावरची माझी वासनाच गेली आहे ! " कितीही आजारपण आले तरी अन्नावरची त्यांची वासना कधीच गेलेली नव्हती. संध्याकाळी त्यांचा मोठा नातू, त्याच्या बायकोला व मुलाला घेऊन भेटावयाला आला होता. पण रात्रभराच्या जागरणाने त्यांना झोप लागली असेल म्हणून त्याने त्यांना उठविले नाही. परंतु दुपारी ते निजले तेव्हा ती त्यांची शेवटची काळझोपच आहे हे आम्हांला कळलेच नाही. आमच्या दादांना इतका शांतपणे मृत्यू आला की, घड्याळाचा लंबक जसा कमी कमी होत अखेरीस नकळत थांबतो तसा त्यांचा श्वास कमी कमी होत, अगदी नकळत थांबला. एखाद्या योग्यासारखा त्यांना मृत्यू आला. चेहरा अत्यंत शांत, तृप्त आणि मृत्यूला हसतमुखाने सामोरा गेल्यासारखा दिसत होता. ● ● ●

# पुण्यातील ‘ युवक महोत्सव ’

समीक्षक : श्री. शरद गोखले

पुणे विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेल्या युवक-महोत्सवाचा सोहळा फर्ग्युसन महाविद्यालयाचे ॲम्फी थिएटरमध्ये ता. ५, ६, ७ जाने. ६६ रोजी पार पडला. महोत्सवासाठी जळगाव, नाशिक, अमळनेर, अलिबाग, भुसावळ, उल्हासनगर इ. ठिकाणच्या महाविद्यालयांतून सुमारे पंचाहत्तर कलावंत आले होते. या खेरीज पुण्याच्या विविध महाविद्यालयांतील कलावंत वेगळेच. महोत्सवात नाटच, नृत्य, काव्यवाचन, नाटच लेखन, शास्त्रोक्त संगीत, वाद्य संगीत, इ. विविध विभागांच्या स्पर्धा ठेवलेल्या होत्या.

एकूण दहा एकांकिका सादर करण्यात आल्या. कोणतीही एकांकिका उत्कृष्ट दर्जाची नव्हती. परंतु, एच्. पी. टी. महाविद्यालय (नाशिक) यांनी सादर केलेली ‘ बारा पस्तीस ’ समाधानकारक होती. विशेष म्हणजे कलावंतांना नक्की काय करावयाचे आहे ह्याची कल्पना होती. दिग्दर्शक श्री. वसंत पेठे यांनी परिणामांचा वापर (Effects) चांगला केला. रंगभूमी रचनेकडे अधिक लक्ष देणे जरूर होते. कु. हिरा कुलकर्णी (बिन्दू) व श्री. विलास लोणारी (किरीट) यांची कामे उत्तम झाली. ज्या नाटिकेचे बाबतीत अतिरेकी अभिनय सहजशक्य होता, तेथे कलावंतांनी उत्कृष्ट संयम दाखविल्याने नाटक प्रथम क्रमांक मिळवून गेले.

अलिबाग व भुसावळमधील महाविद्यालयांतून आलेल्या एकांकिका अतिसामान्य होत्या. पुणे पाहण्यासाठी यावे व सहज आपले नाटक करावे, असा त्यांचा थाट होता; तर उल्हासनगर, अमळनेर, जळगावमधील महाविद्यालयांनी सादर केलेल्या एकांकिकात काही गुणी कलावंत होते. श्री. दिवाकर बजाज (शाम–सतरा वर्षे), सुधाकर कुणकवळेकर (डॉ. तपस्वी) यांची नावे घेता येतील. मात्र सांघिक प्रयत्न कोठेच आढळला नाही. पाठांतराकडे कमालीचे दुर्लक्ष होते, परंतु तरीही योग्य मार्गदर्शन मिळाल्यास वरील ठिकाणच्या महाविद्यालयांकडून पुढील वर्षी अधिक चांगली अपेक्षा करण्यास हरकत नाही.

पुण्याच्या महाविद्यालयांनी एकंदरीत निराशाच केली. त्यातल्या त्यात एम्. इ. एस्. चे ‘ अस्वस्थ रात्र ’ व फर्ग्युसनचे ‘ नाटक बसते आहे ’ चांगले आहे. त्याचे श्रेय कलावंतांपेक्षाही दिग्दर्शक श्री. मो. बा. केळकर (अस्वस्थ रात्र) व श्री. मधू जोशी यांचेकडे जाते. कु. मंगला राजे (विमल–अस्वस्थ रात्र) यांचेकडून समजूतदार

अभिनयाची अपेक्षा होती. कारण स्पर्धांत त्या नवख्या नाहीत. उत्कृष्ट संघ म्हणून उभे राहण्यात फक्त फर्ग्युसन यशस्वी झाले. या नाटिकेच्या वाट्यास एकही पारितोषिक येऊ नये (विशेषत: उत्तेजनार्थ बक्षिसे देऊनही) याचे सखेद आश्चर्य वाटले. स. प. महाविद्यालयाने 'शामभटाचा ऐरावत' ही अतिसामान्य एकांकी का निवडली हे समजले नाही. दिग्दर्शक श्री. श्रीराम खरे यांनी पुरुषोत्तम करंडक स्पर्धेतील त्यांच्या कार्यापासून अपेक्षा वाढवल्या होत्या; पण येथे त्यांनी कमालीची निराशा केली. स. प. चे नेहमीचे चेहरे टाळून नवीन कलावंतांना संधी दिली एवढीच जमेची बाजू. कॉमर्सचे 'नाही आसू नाही माया,'च्या यशात पानसे मास्तर (हरी देसाई) व कुलकर्णी मास्तर (चंद्रकांत हिंगे) यांचा सिंहाचा वाटा आहे. रंगभूमीवर 'शिक्षकांचे विश्रांतिगृह' चांगले उभे केले होते. नाटिकेवर दिग्दर्शक श्री. एम्. सी. दीक्षित यांनी चांगली मेहनत घेतली होती. दुसरा क्रमांक मिळाल्याने त्यांच्या श्रमाचे चीज झाले.

मराठी नाट्य लेखनासाठी तीन स्पर्धकांनी भाग घेतला, तर हिन्दी नाट्य लेखनाबद्दल श्री सुंदरी तोलानी (सुधा) ह्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

## शास्त्रोक्त व वाद्य संगीत

शास्त्रोक्त संगीतासाठी एकूण तेरा स्पर्धक होते. अकरा विद्यार्थिनी व दोन विद्यार्थी. महाविद्यालयीन दर्जाचे स्पर्धांतून तेरा स्पर्धक म्हणजे समाधानाची बाब आहे. नऊ मुलींच्या ताफ्यापुढे बेताच्या तयारीने आलेल्या श्री. सुवीर दातार व पारगावकरांचा प्रभाव पडू शकला नाही. मुलींची तयारी समाधानकारक होती. कु. लता लिमये खरोखरच अप्रतिम गायल्या. खुला आवाज, आलापी, विलंबित व द्रुत गतींना वेळेची योग्य वाटणी झाल्याने गाणे रंगले. फार मोठ्या अपेक्षा ठेवाव्यात, असा एवढा एकच कलावंत स्पर्धेत आढळला. सौ. कुलकर्णींची तयारी चांगली होती, आवाजात माधुरी होती, त्यांनी मुलतानी व्यवस्थितपणे गायला. कु. वंदना भोळे ह्यांना स्पर्धेच्या वेळेचे मर्यादित बैठक रंगवणे जमले नाही. त्यांची आलापी जास्त होऊन द्रुत गतीला एक दोन मिनिटेही मिळू शकली नाहीत.

वाद्य संगीतासाठी केवळ चारच स्पर्धक होते. बारा मिनिटांचे मर्यादित वेळेत कु. सुषमा पटवर्धन यांनी सतारीवर किरवाणी राग चांगला वाजवला. सुराचा पक्केपणा व रागाची सुंदर मांडणी ही त्यांची वैशिष्ट्ये होती. मात्र सुरामागून पडद्यांची खटखट जाणवत होती. ती टाळणे जरूर होते. वझे व रायबागकरांचे वादन ठीक झाले. रायबागकरांनी जलतरंगाचे सूर लावलेले नव्हते, हे कदाचित त्यांचा क्रमांक तिसरा जाण्याचे कारण असावे.

तयारी करून स्पर्धेसाठी उतरण्याची जिद्द एक कु. लता लिमये यांचा अपवाद वगळता बेताचीच दिसली. बहुतेकांची वृत्ती 'तेवढाच नंबर लागला तर बघू' अशा स्वरूपाची वाटली.

# भिंतीच्या तुंबड्या

## सुधाकर राजे

### परमेश्वर–स्वरूप गोळी

आजच्या जगात परमेश्वराइतकी सर्वव्यापी अशी दुसरी गोष्ट कुठली ?–जाहिरात अन् परमेश्वराइतकी सर्वशक्तिमान् ? – गोळी. दुखणारे डोके गोळीमुळे थांबते, तर होणारी मुले गोळीमुळे थांबतात. सर्दी पडशापासून टायफॉइड–न्युमोनियापर्यंत यच्चयावत् रोग कुठल्या ना कुठल्या गोळीपुढे नमतात. सपाटून भूक लागणारी गोळी आहे, तर आठ–आठ दिवस भूक न लागू देणारी गोळी आहे, एक गोळी पाण्यात टाकल्याबरोबर रुचकर पेय मिळते, तर दुसरी गोळी तोंडात टाकल्याबरोबर भरगच्च जेवणाचा ढेकर येतो. एक गोळी खाऊन मनाला शांती मिळते, तर दुसरी खाऊन मनाला उत्साह वाटतो.

एवढ्यावर संपले का ? नाही. आता एक गोळी निघाली आहे, तिने एकीकडे स्मरणशक्ती वाढते; तर दुसरीकडे बुद्धी वाढते. म्हणजे आता बेरीज–वजावाकी न येणाऱ्या बाळचा-बंड्यापासून ' विसरशील का मजला ? ' असा आर्त प्रश्न विचारणाऱ्या प्रियकर–प्रेयसीपर्यंत सगळ्यांचीच सोय झाली म्हणायची. मेंदूतल्या कुठल्या रसायनावर परवचाचीच घोकंपट्टी अवलंबून असते अन् कुठल्यावर भागिले–गुणिलेंचे कंत्राट हे पाहून दोन–चार गोळ्या तोंडात टाकल्या की, बाळ्याचे काम फत्ते. आणि प्रेयसीच्या हृदयाची साक्ष ठेवून कधी न विसरण्याच्या शपथेबरोबरच कधी न विसरण्याची गोळी घेणाऱ्या प्रेमवीराला " माझी काय छाती नाय विसरायला " असेच कबूल करावे लागणार ! ऑफिसातला बाबू शिपाई नेहमीप्रमाणे टायपिस्ट अष्टीकरने पाच रुपये मागितल्यावर कर्जाबरोबरच स्मरण–गोळ्या देणार, इतकेच काय, पण लोकसभेत मंत्र्याने एखादे आश्वासन दिले, की लगेच प्रतिपक्षातली मंडळी स्मरण गोळ्यांची चंची पुढे करून म्हणणार–" घ्या ! " कहर म्हणजे आपल्या बथ्थड चिरंजिवांची " अगदी ह्यांच्या वळणावर गेलंय् कार्टं ! " अशी संभावना करणारी आर्य-स्त्री यापुढे " अहो, जरा त्या कोपऱ्यावरच्या केमिस्टकडून गणिताच्या दोन गोळ्या आणा याच्यासाठी " असे पतिराजांना फर्मावून वर अनार्य स्त्रीप्रमाणे पुस्ती जोडणार–" अन् तुम्ही पण घेतल्यात तर बिघडायचं नाही–रोज मेला भाजीवाला फसवतो हिशेबात ! "

स्मरणशक्ती वाढविणारी गोळी निघते तर विस्मरणशक्ती वाढविणारी गोळी का नको ? आपल्या आयुष्यात घडलेल्या दुःखद प्रसंगांची आठवण बुजविणारी गोळीदेखील निघणार आहे म्हणे. या गोळीचा तर फारच उपयोग होईल. साभार परतलेल्या कथेचा लेखक, पडेल नाटकाचा दिग्दर्शक, पन्नास टक्के प्रेमात गटांगळ्या खाणारा प्रेमवीर, आदल्या दिवशी राष्ट्रीय रक्षा–निधीला सुवर्णदान करण्याबद्दल वर्तमानपत्रांत फोटो आल्यावर दुसऱ्याच दिवशी गुप्त तिजोरीतले वीस–पंचवीस लाख रुपये इन्कम–टॅक्सवाल्यांना सापडलेली सिनेमा-नटी, निवडणुकीत डिपॉझिट जप्त झालेला उमेदवार, मंत्रिमंडळांत न घेतलेला एम्. पी.; इतकेच काय, पण शास्त्रीजींनी जगभर पाठविलेल्या भाराभर "स्पष्टीकरण–शिष्टमंडळां" पैकी एकांतही वर्णी न लागलेला दुय्यम मंत्री या तमाम दुःखी जीवांना या गोळीत आपले दुःख विसरता येईल. थोडक्यात काय, ब्रह्मानंदी टाळी लावणारी पूर्वीची अफूची गोळी आता नवीन पॅकिंगमध्ये नवीन नावाने मिळणार ! पु. ल. देशपांड्यांची उसनवारी करायची म्हणजे 'चिकीची-टाफी' होणार.

## येऱ्या गबाळ्याचे शास्त्रीय काम

जग पुढे चालले आहे यात शंका नाही, पण ते किती झपाट्याने पुढे चालले आहे याची कल्पना परवा "पाहिजे" ची एक इंग्रजी जाहिरात वाचल्यानंतरच आली. जाहिरातीत म्हटले होते : "न्यूक्लिअर फिशनेबल् आयसोटोप मोलेक्युलर रिॲक्टिव्ह् काऊंटर आणि थ्री फेज सायक्लोनिक युरेनियम फोटो सिंथेसायझरवर काम करण्यासाठी माणूस पाहिजे–अनुभवाची आवश्यकता नाही." आता बोला ; कळले काय काय आहे ते ? पण कळण्याची आवश्यकताच नाही; कारण अनुभवाची आवश्यकता नाही.

हल्लीच्या जगात टायपिस्ट घेताना 'अनुभव किती ?' असे विचारतात, पण न्यूक्लिअर फिशनेबल् आयसोटोप वगैरे वगैरे चालवायला विचारीत नाहीत. तेव्हा टाइपरायटर चालविणे हे मोलेक्युलर रिॲक्टिव्ह् काऊंटर किंवा सायक्लोनिक युरेनियम फोटो–सिंथेसायझर असली खेळणी चालविण्यापेक्षा अधिक कठीण आहे, हे ओघानेच आले. हिंदुस्थानात कुंभाराचा मुलगा बापाच्या हाताखाली मडकी घडवायचा अन् न्हाव्याचा पोरगा डोकी तासायचा अनुभव घेतो. पण ते वाजवीच आहे. कारण घाटदार मडके काय, किंवा तासीव डोके काय, ती एक फॅशनेबल् चीज आहे, फिशनेबल् नाही. तेव्हा तेथे पाहिजे जातीचे, येऱ्या गबाळ्याचे अणुशास्त्रीय काम नोहे.

●

**जगाच्या पाठीवर**
**वा. दा. रानडे**

## □ श्रीप्रकाशांचे आत्मचरित्र

पाकिस्तानचे संस्थापक कायदे आझम जिना ताठर वृत्तीचे म्हणून प्रसिद्ध होते. पण त्यांनाही नमविणारा एक परराष्ट्र वकील भेटला. वकिलाने अधिकारपत्रे सादर करण्याचा समारंभ पार पडेपर्यंत राष्ट्रप्रमुखाने उभे राहिले पाहिजे, असा संकेत आहे. पाकिस्तानच्या स्थापनेनंतर अफगणिस्तानचा वकील आपली अधिकार-पत्रे सादर करण्यासाठी आला. जिना त्या वेळी आजारी होते. ते बसूनच अधिकार-पत्रे स्वीकारतील, असे पाक अधिकाऱ्यांनी अफगाण वकिलास कळविले; पण जिनांना उभे राहिलेच पाहिजे असा आग्रह त्या वकिलाने धरला. अखेर जिनांना ते मान्य करावे लागले आणि समारंभ पार पडेपर्यंत उभे राहावे लागले. पाकिस्तान-मधील भारताचे पहिले हायकमिशनर श्री. श्रीप्रकाश यांनी ' पाकिस्तान : बर्थ अँड अर्ली डेज ' या आपल्या पुस्तकात ही आठवण दिली आहे.

जिना स्वतःला फार मोठे व अहंमन्य समजत. फाळणीनंतर हिंद-पाक संबंध सुधारण्याचे दृष्टीने त्यांची भेट घेण्याची इच्छा महात्मा गांधींनी प्रदर्शित केली होती, पण जिनांनी त्यांना नकार दिला. जिना पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल होते. गांधीजीही हिंदचे गव्हर्नर जनरल म्हणून भेटीस येणार असतील तरच मी भेट घेईन, असे त्यांनी कळविले. लॉर्ड मौंटबॅटन लंडनला कराचीमार्गे जात त्या वेळी विमानतळावर त्यांच्या स्वागतासाठी जिना कधीच जात नसत. जिनांची स्वतः-बद्दलची अहंमन्यता गांधीजींच्या निधनासंबंधी दुखवटयाचे वेळीसुद्धा दिसून आली. जिनांकडून दुखवटयाचे पत्र आले, पण त्यावर त्यांची स्वतःची सही नव्हती, त्यांच्या सेक्रेटरीची सही होती.

जिनांच्या निधनाची बातमी जगाला तर उशीरा कळलीच, पण पाकचे पंतप्रधान लियाकत अलीखान आणि इतर मंत्र्यांनासुद्धा पाच तास उशिरा कळविण्यात आली. जिनांचा वारस ठरविण्यासाठी पहाटे चारपर्यंत मंत्रिमंडळाची बैठक चालू होती; पण मंत्रिमंडळातील अल्पसंख्याकांचे प्रतिनिधी जोगेंद्रनाथ मंडल यांना या बैठकीस बोलावले नव्हते. अल्पसंख्यकांना पाकमध्ये काय किंमत होती याचेच ते निदर्शक होते.

### लीग नेत्यांनाही पाकिस्तान नको होते

पाकिस्तानच्या स्थापनेसंबंधी मुस्लीम लीग नेत्यांच्या काय प्रतिक्रिया होत्या यावरही श्रीप्रकाशांनी प्रकाश पाडला आहे. " आम्हांला पाकिस्तान खरोखर नको

होते. मुस्लिमांसाठी जास्तीत जास्त सवलती व हक्क मिळवावे, यासाठी ती मागणी होती " असे मत सिंधचे लीग नेते खुर्रो यांनी श्रीप्रकाशांजवळ व्यक्त केले होते. झाफरुल्लाखान १९३९ साली श्रीप्रकाशांजवळ म्हणाले होते, जिना मूर्ख आहेत. पाकिस्तान झाले तर हिंदूंपेक्षा मुस्लिमांचीच अधिक हानी होईल." पाकिस्तानची स्थापना झाल्यावर आठ वर्षांनी श्रीप्रकाशांनी त्यांना या उद्गारांची आठवण करून दिली, तेव्हा झाफरुल्लाखान म्हणाले, " मला अजूनही तसेच वाटते. " पण पाक-मधील आपले ' स्थान ' टिकविण्यासाठी एका उर्दू पत्रात त्यांनी या विधानाचा इन्कार केला.

परराष्ट्र वकिलातीत राजकीय पुढाऱ्यांऐवजी आय्. सी. एस्. किंवा आय्. ए. एस्. अधिकाऱ्यांना नेमण्याची प्रथा पडत आहे. त्याबद्दल श्रीप्रकाशांनी नापसंती व्यक्त केली आहे. याबाबत त्यांचा स्वतःचा अनुभव लक्षात घेण्यासारखा आहे. कराचीचा डेप्युटी हायकमिशनर एक आय्. सी. एस्. अधिकारी होता. श्रीप्रकाशांच्या सूचना तो मानीत नसे. फाळणीनंतर पाकमध्ये आपणास सुखाचे जीवन जगायला मिळेल या अपेक्षेने बनारसमधील अनेक मुसलमान पाकिस्तानात गेले. पण त्यांची निराशा झाली. अखेर पाकमधील अडचणींना कंटाळून त्यांनी पुनः हिंदमध्ये जाण्यासाठी परवाने मागितले. त्यांना परवाने देण्याच्या सूचना श्रीप्रकाशांनी दिल्या होत्या. पण डेप्युटी हायकमिशनरने नकार दिला. सहा जानेवारीस काही शीख कराचीस गाडीने येणार असल्याची तार आली. श्रीप्रकाश त्या वेळी दौऱ्यावर होते पण अधिकाऱ्याने ती तार खिशात ठेवून दिली. श्रीप्रकाश आदल्या दिवशी आले पण तारेची काहीच कल्पना नसल्याने त्यांना काहीच व्यवस्था करता आली नाही व त्या ११७ शीखांची कत्तल झाली.

पाकिस्तानची स्थापना व सुरुवातीच्या दिवसांतील घटनांचा चित्रपट हे पुस्तक वाचताना डोळ्यांपुढे उभा राहातो. *

## □ आजचा पदव्युत्तर विद्यार्थी

आजच्या विद्यार्थिवर्गात वैफल्य व निराशेची भावना आढळून येते, अशी तक्रार करण्यात येते. पुण्यातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या बाबतीत तरी ती खरी नाही असा एका पाहणीचा निष्कर्ष आहे. पुणे विद्यापीठाच्या गणित व संख्याशास्त्र विभागाने ही पाहणी केली. आपण घेत असलेल्या शिक्षणाने जीवनात आपणांस अपेक्षित स्थान मिळेल, अशी खात्री ८० टक्के विद्यार्थ्यांना वाटते. आर्टस्कडच्या ८७ टक्के व सायन्सकडच्या ८४ टक्के विद्यार्थ्यांना भावी जीवनाबद्दल आत्मविश्वास वाटतो. शिक्षण पुरे झाल्यावर नोकरी करण्याचा आपला विचार आहे, असे उत्तर ८७ टक्के विद्यार्थिनींनी दिले.

कायदा, शेती, व्यापार व वैद्यक या विषयांचे विद्यार्थी, तसेच पीएच्. डी. चे विद्यार्थी सोडून पुणे शहरातील बाकी सर्व पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा समावेश १९६२-६३ च्या या पाहणीत केला होता. आठशे विद्यार्थ्यांपैकी १४० जणांनी कोणत्याही प्रकारची माहिती दिली नाही. विद्यार्थ्यांच्या पालकांचे सरासरी वार्षिक उत्पन्न ३९५४ रु. म्हणजे महिना ३२५ रु. च्या जवळपास आहे. एकसष्ट टक्के विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न महिना २५० रु. पेक्षा कमी आहे. बाराशे रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांना सरकारी शिष्यवृत्ती मिळत असल्याने अशा विद्यार्थ्यांचेही प्रमाण मोठे आहे. शिष्यवृत्ती मिळाली तरी तेवढ्याने सारा खर्च भागत नाही. नऊ टक्के विद्यार्थ्यांना नोकरी, शिकवण्या वगैरे मार्गाने हा पैसा उभारावा लागतो. त्यांपैकी ६ टक्के विद्यार्थी अर्ध वेळ व ३ टक्के पूर्ण वेळ नोकरी करतात. नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण १९५५–५६ च्या नमुना पाहणीत २८ टक्के व १९६०–६१ च्या पाहणीत २० टक्के होते. ते कमी झाले, याचे एक कारण सरकारी शिष्यवृत्त्या अधिक प्रमाणांत मिळू लागल्या हे असावे. नोकऱ्या करणारांपैकी ८० टक्के विद्यार्थी शिक्षणक्षेत्रातच नोकऱ्या किंवा शिकवण्या करतात. ६६ टक्के जणांची नोकरी त्यांच्या अभ्यासविषयाशी संबंधित असते. आर्टस्‌कडच्या विद्यार्थ्याला महिना सरासरी १०३ रु. व सायन्सच्या विद्यार्थ्याला १२९ रु. मिळतात. पूर्ण वेळ नोकरी करणारांचे प्रमाण अर्ध वेळ नोकरी करणारांच्या दुप्पट असल्याचे १९६०–६१ च्या पाहणीत दिसून आले. पण या पाहणीत हे प्रमाण नेमके उलटे झाल्याचे आढळले. या नोकरीवाल्या विद्यार्थ्यांपैकी ५१ टक्के विद्यार्थी १८०० रुपयांहून कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील आहेत व २९ टक्के तर १२००रु. पेक्षा कमी उत्पन्नाच्या कुटुंबांतील आहेत. याचा अर्थ चांगली आर्थिक परिस्थिती असलेल्या पालकांची मुले नोकऱ्या करीतच नाहीत असे नाही. पण त्यांचे प्रमाण थोडे आहे. या पाहणीत ५००० रु. पेक्षा अधिक वार्षिक उत्पन्न असलेल्या चार पालकांची मुले नोकरी करीत असल्याचे आढळले. यांपैकी एकतर पूर्ण वेळ नोकरी करून महिना २५० रु. मिळवीत होता.

हे विद्यार्थिवर्गाला सरासरी १२१ रु. कपड्यांवर खर्च करतात. १९५५-५६ च्या पाहणीत हा आकडा ८४ रु. व १९६०–६१ च्या पाहणीत १०० रु. होता. विद्यार्थिनींच्या कपड्यांवरचा सरासरी खर्च वर्षाला १४८ रु. आहे व पुरुषांच्या बाबतीत हे प्रमाण ११३ रु. आहे. विद्यार्थ्यांना पुस्तके, स्टेशनरी वगैरेंसाठी सरासरी ९१ रु. खर्च येतो. वाढत्या महागाईचा परिणाम येथेही दिसून येतो. १९५५–५६ च्या पाहणीत हा खर्च ५५ रु. व १९६०–६१ च्या पाहणीत ६७ रु. होता. पुस्तकांवर मुलींपेक्षा मुले अधिक खर्च करतात व मुलींचा खर्च ८४ रु. तर मुलांचा खर्च १४८रु. आहे. धूम्रपानाची सवय विद्यार्थ्यांत किती प्रमाणात आहे यासंबंधी या पाहणीत मिळालेल्या माहितीवरून असे दिसते की, ७७ टक्के विद्यार्थी धूम्रपान मुळीच करीत

नाहीत. १३ टक्के विद्यार्थी धूम्रपानावर महिन्याला सरासरी ६ रु. खर्च करतात. धूम्रपान करणारांत दोन विद्यार्थिनीही आहेत. दहा टक्के विद्यार्थ्यांनी या प्रश्नाचे उत्तरच दिले नाही यावरून धूम्रपान करणारांचे प्रमाण यापेक्षाही जास्त असावे असा अंदाज आहे. विद्यार्थी सिनेमावर महिन्याला सरासरी चार रु. खर्च करतात. चौदा टक्के विद्यार्थी सिनेमावर काहीही खर्च करीत नाही व सिनेमा न पाहणारांत मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण जास्त आहे.

## मुली अभ्यास कमी करतात

विद्यार्थ्यांच्या अभ्यास–सवयीबद्दल या पाहणीत मिळालेल्या माहितीवरून असे दिसते की हे विद्यार्थी रोज सरासरी २·१० तास आणि परीक्षेच्या दिवसांत ४·९२ म्हणजे जवळजवळ पाच तास अभ्यास करतात. एम्. एस्‌सी. पेक्षा एम्. ए. चा विद्यार्थी रोज अधिक तास अभ्यास करतो. मुली अधिक वेळ अभ्यास करतात अशी आपली कल्पना असेल तर ती खरी नाही. मुलींपेक्षा मुलेच अधिक वेळ अभ्यास करीत असल्याचे आढळून आले. तसेच वसतिगृहात किंवा खोली घेऊन राहणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा घरी राहणारे विद्यार्थी कमी वेळ अभ्यास करीत असल्याचे दिसून आले. एम्. ए. च्या विद्यार्थ्यांत मराठीचे विद्यार्थी सर्वांत कमी वेळ आणि तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी सर्वांत अधिक वेळ अभ्यास करतात. सायन्सच्या विद्यार्थ्यांत गणिताचे विद्यार्थी सर्वांत अधिक वेळ व भूगर्भ शास्त्राचे विद्यार्थी सर्वांत कमी वेळ अभ्यास करीत असल्याचे आढळले. एम्. एस्सी. पेक्षा एम्. ए. चे विद्यार्थी ग्रंथालयाचा उपयोग अधिक प्रमाणांत करतात. फक्त ९ टक्के विद्यार्थी केवळ वर्गातल्या टिपणांवर विसंबतात, ८९ टक्के विद्यार्थी क्रमिक पुस्तकांशिवाय इतर संदर्भ ग्रंथ वाचतात, ६३ टक्के विद्यार्थी अभ्यास विषयाशी संबंधित नियतकालिके वाचतात. साठ टक्के विद्यार्थी प्राध्यापकांना भेटून, चर्चा करून विषय समजून घेतात.

वाचन हाच विद्यार्थ्यांचा सर्वांत आवडता छंद असल्याचे दिसून येते. त्या खालोखाल स्थान खेळांना आहे. खेळात क्रिकेट सर्वांत लोकप्रिय असून त्या खालोखाल टेबल टेनिस व देशी खेळ आवडतात. विद्यार्थिनींना टेबल टेनिस व बॅडमिंटनची अधिक आवड आहे. पण ४२ टक्के विद्यार्थी कोणत्याही खेळात पारंगत नाहीत. हे प्रमाण फार मोठे असून जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत उद्या जबाबदारीच्या जागा स्वीकारणारे हे विद्यार्थी कोणत्याही खेळात पारंगत नसावेत हे त्यांच्या व्यक्तित्वाच्या विकासाचे दृष्टीने योग्य नाही. ●

# सरळ चालीची, मराठी मनाची आणि पोलादी पिळाची

# साधी माणसं

" आमची मराठी चित्रं ही अशी असतात !" असं अभिमानानं मान ताठ करून आणि छाती पुढं काढून सांगायचा काळ आता राहिलेला नाही. गेले ते दिवस. हिंदी चित्रपटांत दिसणारा आचरट धिंगाणा आम्हीही मराठी चित्रांत घालू शकतो अशा इरिशिरीची माणसं ह्या सृष्टीत उभी आहेत. विड्यांची बंडलं विकून किंवा गुळाच्या भेल्या खपवून कमावलेला पैसा पिक्चर काढून उधळायचा आणि पिक्चर बाहेर ' पडलं ' की, पुन: विड्या वळायला किंवा भेल्या पाडायला जायचं, अशा उमेदीचे (अ)कलेचे खंदक मराठी चित्रसृष्टीत धिंगाणा घालीत आहेत. ' प्रभात 'ची परंपरा संपली आहे. सरस्वती सिनेटोनचं नाव इतिहासजमा झालं आहे. मा. विनायकांना त्यांचे चेलेही विसरले आहेत. इतकंच काय, पण शांतारामबापूंतही शांताराम उरलेला नाही.

पण एक इमानी शिलेदार मात्र हजारो संकटांना तोंड देत पहिल्याच पिळानं मराठी चित्रसृष्टीत उभा आहे. ह्या शिलेदाराची छाती फार मोठी आहे. जिद्द जबरदस्त आहे. गुंडांनी ह्या माणसाचा उभा स्टुडिओ जाळला, तरीही ह्याचा पीळ उलगडला नाही. ह्या माणसाचं नाव भालजी पेंढारकर. साधा माणूस. पण वेड लागलेला माणूस. भालजींना वेड लागलं आहे महाराष्ट्र धर्माचं. तो धर्म चित्रसृष्टीत त्यांनी इमानाने पाळला आहे. भालजींना स्वत:चं असं खास व्यक्तिमत्त्व आहे. ते कोणावर भाळणारे, भुरळणारे नाहीत. त्यांची निष्ठा जबर आहे. म्हणूनच त्यांच्या प्रत्येक चित्रात महाराष्ट्रधर्म दिसतो.

' साधी माणसं ' हे ताजं प्रत्यंतर. चित्रपट अगदी साधा आहे. पण साध्या माणसांच्या मनाची पकड घेणारा आहे. ' मीठ भाकर ' नंतर त्यांनी काढलेल्या सामाजिक चित्रपटांत सर्वांत यशस्वी हाच चित्रपट ठरेल. ' साध्या माणसा ' नी अपेक्षेपलीकडे मुंबई गाजवली आहे व गाजवीत आहेत हे त्या यशाचं एक द्योतक.

' साध्या माणसा ' त सर्वच काही अगदी साधं आहे. इथं भरजरी, नखरेल असं काहीही नाही; तरीही ते यशस्वी आहे. हिंदी धिंगाणावाल्यांनी हा चित्रपट अवश्य पाहावा. ह्यात नाच नाहीत. उडत्या चालीची गाणी नाहीत. लावण्या नाहीत. तमाशा नाही. जॉनी वॉकर छाप विनोद नाही. उत्तान शृंगार नाही. प्रचंड सेटिंग्ज नाहीत. इतकंच नव्हे तर चित्राची तांत्रिक बाजूसुद्धा समृद्ध नाही. तरीही हा चित्रपट अतिशय यशस्वी व प्रभावी आहे. ह्या चित्रात कामं करणारी पात्रं

रंगभूषा न करताच पडद्यावर आली आहेत, हे एक आणखी वैशिष्ट्य. चित्राची कथा, पद्यलेखन आणि संगीत साधे, सरळ आहे. तरीही हा चित्रपट प्रेक्षकांचं मन जिंकतो !

## कथा-दिग्दर्शन

कथा आणि दिग्दर्शन आहे भालजींचं. शंकर लोहार आणि पार्वती लोहारणीची ही कथा आहे. हे तरुण जोडपं उत्कर्षाची उमेद धरून शहरात येतं. पार्वतीच्या सौंदर्यावर टपलेला छक्कडराव ह्या जोडप्यावर नाही नाही ती संकटं आणतो, शंकरला तुरुंगात जावं लागतं. तिथंही एक भला माणूस भेटतो. तो त्याला जिद्द शिकवतो. शंकर तुरुंगात गेल्यावर छक्कडराव पार्वतीच्या मागे लागतो. अखेर ती त्याचा अब्रूसाठी खून करते. तिला शिक्षा होते. शंकर सुटतो आणि त्याच दिवशी पार्वती तुरुंगात प्रवेशते. तरीही जिद्द आटत नाही. मनं आणि शरीरं झुंजतच राहतात. पार्वतीची शिक्षा संपते, तेव्हा हा जिद्दीचा शंकर लोहार स्वतःची मोटार घेऊन पार्वतीला तुरुंगातून घरी घेऊन येतो. ही आहे कथा. अगदी सरळ साधी. कोणतेही आढेवेढे नसलेली.

भालजींचे संवाद चांगले आहेत. त्यांच्या नेहमीच्या शैलीची टोकदार वाक्यं वारंवार कानांवर पडतात. विनोदी पात्रं आणि मुद्दाम विनोदी संवाद न घालताही चित्रपट यशस्वी करता येतो ही गोष्ट ठळकपणे लक्षात येते. जगदीश खेबूडकरांची गीतरचना आहे. कथेला पोषक अशीच त्यांची मांडणी आहे. संगीत आनंदघन यांचं आहे. गाणी फक्त पाच आहेत. चाली साध्या आहेत. पण वातावरणाला पोषक आहेत. चाली देतानाही, ही गाणी लोहारणींच्या तोंडी घालायची आहेत ही जाणीव ठेवून चाली दिल्या आहेत. पार्वतीच्या तोंडी घातलेलं भावाच्या मळ्याच्या कौतुकाचं गाणं आणि नणंदा-भावजयांनी म्हटलेलं 'गडणीग सजणी' हे गाणं गोड आहे.

दिग्दर्शनात काही बारकावे सुरेख टिपले गेले आहेत. उतू जाणाऱ्या दुधाचा उपयोग अचूक आहे. शंकर आपलं घर गहाण टाकायला गावी येतो तेव्हा 'अखेरचा हा तुला दंडवत' हे गाणं ऐकू येत असतं, ते फार सूचक वाटतं. कारखान्यात उडणाऱ्या ठिणग्या आणि चक्रांची गती नेमक्या जागांवर टिपली गेली आहे.

आनंदघन यांनी दिलेलं पार्श्वसंगीत अप्रतिम आहे. मराठी चित्राला इतकं चांगलं पार्श्वसंगीत बऱ्याच वर्षांत लाभलं नव्हतं.

ह्या 'साध्या माणसा'तला सर्वांत वैभवशाली भाग म्हणजे अभिनय. सूर्यकांत यांनी शंकरची भूमिका आपलं सारं कसब पणाला लावून केली आहे. ते त्या लोहाराशी तनमनाने एकरूप झाले आहेत. चेहऱ्यावरचे भाव त्यांनी खरोखरच फार सुरेख व्यक्त केले आहेत. कारखान्यात मॅनेजरशी बोलताना, पुतळ्या चोरीस गेल्यानंतर मनाची उलघाल व्यक्त करताना, पोलीस धरून नेत असताना, तुरुंगात

मास्तरांशी वागताना सूर्यकांतांनी उभा केलेला शंकर थिएटरमधून बाहेर पडल्यावरही डोळ्यांपुढं वावरत राहातो. आजवर त्यांनी केलेल्या भूमिकांत ही शंकरची भूमिका वेगळी आहे. वैशिष्ट्यपूर्ण आहे. अविस्मरणीय आहे.

जयश्री गडकर यांनी पार्वतीची भूमिका तितकीच उत्तम केली आहे. नेहमीच तमाशातल्या बाईची भूमिका केलेल्या जयश्रीबाईंनी ही पोलादी ताठ्याची लोहारीण इतकी नेमकी उभी केली आहे की, जयश्रीबाई म्हणजे नाच आणि लावणी हे समीकरण मनात ठेवून आलेला प्रेक्षक फसावा, पण न रुसावा ! मुख्यत: सूर्यकांत व जयश्री गडकर यांचाच चित्रात मोठा वाटा आहे. दोघांनीही अभिनयात एकमेकांवर ताण करण्याचा प्रयत्न केला आहे. दोघांच्याही भूमिका उत्कृष्ट झाल्या आहेत. मागे एकदा 'सांगते ऐका' चं परीक्षण 'माणूस' मध्ये लिहिताना आम्ही म्हटलं होतं की, सूर्यकांत यांच्यात देखणेपण आहे, पण अभिनय कमी आहे. त्यांनी आपल्या थोरल्या भावापाशी थोडंफार शिकावं !—पण 'साधी माणसं' पाहिल्यावर आपण अभिनयही तितकाच देखणा करूं शकतो, हे सूर्यकांत यांनी दाखवून दिलं आहे. ही वहिवाट आता मोडू नये !

मा. विठ्ठल, सुलोचना, चंद्रकांत गोखले, बर्चो बहाद्दर आणि अलीकडेच पुढं येत चाललेला राजशेखर यांच्या भूमिकाही सुरेख आहेत. पण लहानशीच भूमिका करून भाव खातो दोन रुपये उसने मागणारा दारुबाज ! सुलोचना आणि विठ्ठल यांना वाव नाही. पण त्यांनी आपली हजेरी चोख दिली आहे. मा. विठ्ठल म्हातारपणीही तरुणच वाटतात !

हल्ली चित्रपटांत काही कुणी सांगा–शिकवायला गेलं की, चित्रपट पडतोच. पण 'साधी माणसं' मात्र महाराष्ट्रधर्म सांगतोय शिकवतोय, तरीही यशस्वितेचं शेलापागोटं मिळवतोय हे कौशल्य भालजींचं. त्यांना साथ सूर्यकांत आणि जयश्री गडकर यांची.

— प्रियदर्शी

## लता आणि भविष्य

● सुप्रसिद्ध पार्श्वगायिका लता मंगेशकर एकदा काही कामासाठी मद्रासला चालल्या होत्या. गाडी सुटण्यास बराच वेळ होता. समोर एक वजनाचे यंत्र दिसत होते. सहज म्हणून लताबाई तिकडे गेल्या व त्यांनी अपाले वजन केले, परंतु तिकिटावर वजन पाहण्याऐवजी त्यांनी उत्सुकतेने त्या वरील भविष्य वाचले— त्यावर लिहिले होते—संगीत क्षेत्रात लौकरच तुम्हांला फार मोठे यश मिळेल.


तारापूर कँटीन
भारताचा 'घरगुती'
अणुस्फोट [!]


राम मनोहरचे 'मनोहर' स्वप्न – म्हणे इरेड्.पी.च्या तख्यांत 'पोलीस' खाते द्या!
हा तुमचा विरोधक आहे–
ना? आपला पकडून xxx!
RAJENDRA GAIKWAD

MANOOS (Fortnightly) : 15 Jan. 1966 : 40 Paise : Regd. No. M H-649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



Parkerson/srp/12

स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **श्री. ग. माजगावकर**